MS, PIN-414605,
Mob- 9822336921
E-Mail: sambhajidkale@gmail.com

5] **Dr. Mutkule Rambhau R.,**
Member, Associate Professor,
Bahirji Smark College,
Vasmat, Dist-Hingoli.
Mob-9850639897
E-Mail: mutkuleram@gmail.com

BUSINESS

1] Confirmation and signing of the minutes of the last meeting.
2] **To prepare & finalize the syllabus with Structure of 50:50 Marks for B.A. Ist to IIIrd Year in the subject of Thoughts of Mahatma Phule and Dr. Ambedkar as per the Pattern approved by the Academic Council to be implemented from the Academic Year 2014-2015 and onwards.**
3] Any Other Item with the permission to the Chair.

BOS Member
Dean/New Arts Ahmednagar

Ahmednagar Jilha Maratha Vidya Prasarak Samaj's
NEW ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE
(AUTONOMOUS)
Laltaki Road, Ahmednagar - 414 001 (MS)
TEL.: 0241-2324024, FAX: 0241-2324715, AISHE Code : C-41908
Email : nacasce@rediffmail.com, Website: www.newartscollege.com

PRINCIPAL
DR. B. H. ZAWARE
M.Sc., Ph.D.

Ref. No. 492 |2021-2022|

Date - 17 AUG 2021

To,
Dr.Sambhaji Kale
Head, Department of Economics
Jijamata College of Arts and
Science Bhande Tu: Newasa
Dist: Ahmednagar - 414 605.

Subject: Nomination as postgraduate meritorious Alumnus on the Board of Studies in Economics.

Reference No: 1. UGC Letter No. F.22-1/2017(AC) dated 17th February 2021.

Dear Sir/Madam,
We are pleased to inform you that UGC has conferred the Autonomous Status to our college for the next ten years from the academic year 2021-22 in the standing committee meeting held on 11th February 2021.
As per the provisions of UGC regulation of Autonomous Colleges, 2018 and Uniform Statutes No. 03 (2019), under the Maharashtra Public University Act, 2016, the board of studies of the autonomous colleges has a provision of one postgraduate meritorious Alumnus nominated by the principal.
We would like to congratulate you, as you have been nominated as meritorious postgraduate alumni on the **Board of Studies in Economics of New Arts, Commerce and Science College, Ahmednagar (Autonomous) - 414 001.**
The tenure of your appointment on the Board of Studies in **Economics** of the college will be for **Three Years** from the date of nomination.
If any, the college will pay the T. A. and D. A. for attending the board of studies meeting, as per the rules.
Kindly convey your acceptance and oblige us.
Thanking you.

PRINCIPAL
New Arts, Commerce and Science College
Ahmednagar-414001

New Arts, Commerce, and Science College Ahmednagar 414001

Copy to:
1. Chairman, BoS in Economics

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

Pune

दूरध्वनी क्रमांक :
०२०—२५६९१२३३
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
ई—मेल : boards@pun.unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीबीएस / १२६१

दिनांक : 21/12/18

सभेची सूचना

अर्थशास्त्र अभ्यासमंडळाची सभा सोमवार दि. १०.१२.२०१८ रोजी दुपारी १२.३० ते १.३० वाजेपर्यंत संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे—४११००७ येथे आयोजित करण्यात आली आहे.

सा. सदस्यांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

21/12/18

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

प्रति,

१. डॉ. बोबडे मंजुश्री (अध्यक्ष)
रयत शिक्षण संस्थेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
८५, शिंदे सरकार वाडा, औंध,
पुणे—४११०६७
E-mail : bobademv1961@rediffmail.com

२. डॉ. धनमंजिरी साठे
विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे—४११००७.
E-mail : dhan.sathe@gmail.com

३. प्रा. शेलार अरविंद
महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे
श्री. सिध्दिविनायक महिला महाविद्यालय,
कर्वेनगर, पुणे—४११०५२
E-mail : arvindshelarg@hotmail.com

४. प्रा. पवार डी. बी.
सर परशुरामभाऊ महाविद्यालय,
टिळक रोड, सदाशिव पेठ,
पुणे—४११०३०
E-mail : dhonpawar@gmail.com

५. प्रा. पाटील आशा शिवाजीराव
महात्मा गांधी विद्यामंदिर,
एल.व्ही.एच. पंचवटी, मुंबई—आग्रा रोड,
कन्नमवार ब्रीजजवळ, पंचवटी, नाशिक
E-mail : ashapatil793@com

६. प्रा. पाटील वैशाली धनराज
रयत शिक्षण संस्थेचे
एस.एम. जोशी कॉलेज,
माळवाडी, हडपसर, ता.जि. पुणे.
E-mail : sambhajidkale@gmail.com

७. प्रा. काळे संभाजी भाऊराव
श्री. मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे
जिजामाता कॉलेज ऑफ सायन्स अॅण्ड आर्टस्,
ज्ञानेश्वरनगर, पोस्ट—भेंडे,
ता. नेवासा, जि. अहमदनगर
E-mail : patilvaishali23@gmail.com

८ डॉ. धनश्री जयंत महाजन
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद—४३१००४

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

(Formerly University of Pune)

NOTICE OF MEETING

Faculty of Humanities

Meetings of the Committees appointed under the provisions of the Section 48 (3) (a) of the Maharashtra Public Universities Act 2016, for recommending names of the persons for appointments as paper-setters/examiners/moderators/co-ordinators etc. for the University Examinations to be held in **Second Half of the year 2021** under the Faculty of Humanities will be held on **Thursday, 2nd December, 2021 at 03.00 P.M.** in the Paper-setting Hall, on 1st floor, New Examination Building of Savitribai Phule Pune University, Ganeshkhind, Pune-411007.

The Panels of Paper-Setters, Examiners and Moderator prepared by the Board of Studies, conventions regarding appointments of examiners and lists of Paper-Setters, Examiners and Moderators appointed in the First half of the year 2021 will be provided at the time of meeting.

Request that, kindly make it convenient to attend the meeting.

The office copy has been approved by Hon. Chairman of 48 (3) (a) committee.

Ganeshkhind, Pune-411007.
Ref.No. : XC/Humanities/309
Date : 27/11/2021

Assistant Registrar
Exam. coordination Section

To,

Dr. Kurne Anjali., Dean, Faculty of Humanities (Arts & Mental Moral)

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६२११८८
२५६२११५६
२५६२११५७
२५६२११६१

##21110001

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७.

टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल : affiliation@pun.unipune.ac.in

जावक क्र. :CA/LIC/२१/AN/ACS/७५ जावक दि. :१८/११/२०२१

प्रती,

१. **Prof. Mr Landage Patil Shirish Rajaram**
(Chairman)
Shri Marutrao Ghule Patil Shikshan Sanstha Jijamata College of Science & Arts Addr: Dnyanehshwarnagar Post Bhende Ta: Nevasa Dist: Ahmednagar
Email ID -landageshirish@gmail.com
Mobile No.-9404980324

२. **Prof. Dr Nagarkar Sanjay Pandurang**
Rayat Shikshan Sanstha Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalay Addr: 85 Shinde Sarkar Vada Aundh Pune-411067 Ta: Haweli(excluding Corporation Area) Dist: Pune
Email ID -sapan.09@rediffmail.com
Mobile No.-9096875737

३. **Prof. Dr Bhailume Rajabhau Vinayak**
S.S. Prasark Mandal C.T. Bora College Addr: Shirur Ta: Shirur Dist: Pune
Email ID -rajbhailume@gmail.com
Mobile No.-9822215388

४. **Prof. Dr Sangale Sandeep Vitthalrao**
Shikshan Prasarak Mandal Sahebrao Shankarrao Dhamdhere Arts And Commerce College Addr: Talegao Dhamdhere Ta: Shirur Dist: Pune
Email ID -sandeepvsangale@gmail.com
Mobile No.-9822445177

विषय :- १)मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या संशोधन केंद्राच्या नुतनीकरणाबाबत.....

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, खालील संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संशोधन संस्था यांच्या कडून खाली नमूद केलेल्या तपशीलानुसार संशोधन केंद्रे सुरु करण्या करीता/नुतनीकरण करण्याकरीता अर्ज/प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

सदर प्रस्तावांवर विचार करून त्यावर कार्यवाही करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम (१११) अनुसार शिफारस करण्यासाठी आपल्या तज्ञ समितीचे गठन करण्यात आले आहे.

भारत सरकारने प्रसिध्द केलेल्या राजपत्र क्र. २७८, दि. ५ जुलै,२०१६ नुसार क्र. १० मध्ये खालील प्रमाणे..

10. Academic, administrative and infrastructure requirement to be fulfilled by Colleges for getting recognition for offering M.Phill./Ph.D. programmes:

10.1 Colleges may be considered eligible to offer M.Phill./Ph.D. programmes only if they satisfy the availability of eligible Research Supervisors, required infrastructure and supporting administrative and research promotion facilities as per these Regulations.

10.2 Post-graduate Departments of colleges, Research laboratories of Government of India/State Government with at least two Ph.D. qualified teachers/scientists/other academic staff in the Department concerned along with required infrastructure, supporting administrative and research promotion facilities as per these Regulations, stipulated under sub-clause 10.3. shall be considered eligible to offer M.Phill/Ph.D. programmes. College should additionally have the necessary recognition by the Institution under which they operate to offer M.Phill/Ph.D programme.

10.3 Colleges with adequate facilities for research as mentioned below alone shall offer M.Phill/Ph.D.

THIS IS A COMPUTER-GENERATED DOCUMENT AND IT DOES NOT REQUIRE A SIGNATURE. THIS DOCUMENT SHALL NOT BE ACCEPTED AS EVIDENCE IN ANY LEGAL PROCEEDINGS.

Programmes.

10.3.1 In case of science and technology disciplines. Exclusive research Laboratories with sophisticated equipment as specified by the institution concerned with provision for adequate space per research scholar along with computer facilities and essential software, and uninterrupted power and water supply.

10.3.2 Earmarked library resources including latest books, Indian and International journals, e-journals,extended working hours for all disciplines, adequate space for research scholars in the Department/library for reading, writing and strong study and research materials.

10.3.3 Colleges may also access the required facilities of the neighbouring Institutions/Colleges or of those Institutions/Colleges/R&D laboratories/Organizations which have the required facilities.

उपरोक्त राजपत्रातील नियमानुसार संबंधीत संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त संशोधन संस्था यांना प्रत्यक्ष भेट देऊन अंतर्गत सुविधांची पाहणी करून परिसंस्थेतील नव्याने/नुतनीकरण संशोधन केंद्रास परवानगी द्यावी किंवा नाही या बाबत स्पष्ट शिफारशींसह व सदस्यांच्या स्वाक्षऱ यासह (www.unipune.ac.in-academic-affiliation) उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यामध्ये एक महिन्याच्या आत समितीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यासाठी आपली चौकशी समिती नियुक्त केलेली आहे.

विद्यापीठ नियमानुसार आपणास विद्यापीठाचे वाहन उपलब्ध करून हवे असल्यास कमीत कमी तीन सदस्यांनी एकत्रित भेट देणे आवश्यक आहे.

तसेच वाहन विषयक मागणी पत्र प्रत्यक्ष भेट देण्यापूर्वी कमीत कमी आठ दिवसात कार्यालयास देणे आवश्यक आहे. काही कारणाने आपणास समितीवर काम करणे अशक्य असल्यास कृपया हे पत्र मिळताच आपल्या चौकशी समितीचे मा.अध्यक्ष यांनाही त्वरीत कळवावे जेणे करून या विषयी विद्यापीठास योग्य ती कार्यवाही करणे शक्य होईल.

कृपया अहवालासोबत हे पत्र जोडावे.तसेच प्रवासभत्ता देयक एकत्रित पाठवावेत.

महाविद्यालय/संस्थेचे नाव	शैक्षणिक वर्ष	संलग्निकरणाचा प्रकार	अभ्यासक्रम	विद्यार्थी प्रवेश क्षमता
हिंद सेवा मंडळ पेमराज सरडा महाविद्यालय पत्ता: सावेडी रोड ता.: अहमदनगर जि: अहमदनगर पिनकोड: 414001 **महाविद्यालयाचा दूरध्वनी क्र. -** ०२४१-२४३१३३७ **प्राचार्यांचे नाव -** राजेंद्र यशवंतराव शिंदे **भ्रमणध्वनी क्र. -** ९४२३७९१०४१	२०२१-२०२२	नूतनीकरण (संशोधन)	मानवविज्ञान - एम.फील. मराठी	
			मानवविज्ञान - पीएच.डी. मराठी	
	२०२२-२०२३	नूतनीकरण (संशोधन)	मानवविज्ञान - एम.फील. मराठी	
			मानवविज्ञान - पीएच.डी. मराठी	
	२०२३-२०२४	नूतनीकरण (संशोधन)	मानवविज्ञान - एम.फील. मराठी	
			मानवविज्ञान - पीएच.डी. मराठी	
	२०२४-२०२५	नूतनीकरण (संशोधन)	मानवविज्ञान - एम.फील. मराठी	
			मानवविज्ञान - पीएच.डी. मराठी	
	२०२५-२०२६	नूतनीकरण (संशोधन)	मानवविज्ञान - एम.फील. मराठी	
			मानवविज्ञान - पीएच.डी. मराठी	

कळावे,

आपला,

(मुंजाजी रासवे)
(स. द. डावखर)
उपकुलसचिव
संलग्नता कक्ष

THIS IS A COMPUTER-GENERATED DOCUMENT AND IT DOES NOT REQUIRE A SIGNATURE. THIS DOCUMENT SHALL NOT BE VALID FOR ANY LEGAL PURPOSE.

<u>प्रत महितीसाठी सादर रवाना:-</u>

१) मा. प्राचार्य, संबंधित महाविद्यालय.

यांना विनंती की, समितीच्या भेटीच्या वेळी योग्य ती कागदपत्रे दाखून समितीस सहकार्य करावे. तसेच आपल्या संस्थेस चौकशी समिती चे पत्र मिळताच समितीच्या अध्यक्ष व इतर सदस्यांची त्वरीत संपर्क साधून भेटीची तारीख निश्चित करून घ्यावी व चौकशी समितीने भेट दिल्या नंतर अहवाल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाकडे सादर करण्याबाबत वेळोवेळी मदत करण्यात यावी.
तसेच हे पत्र निर्गमित झालेल्या तारखेपासून एक महिन्याच्या आत अहवाल सादर करावा अन्यथा आपला स्थायी संल्ग्निकरणाचा प्रस्ताव निकाली काढण्यात येईल.

२) मा. वित्त व लेखा अधिकारी,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.

३) गृहव्यवस्थापक ,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

THIS IS A COMPUTER-GENERATED DOCUMENT AND IT DOES NOT REQUIRE A SIGNATURE. THIS DOCUMENT SHALL NOT BE

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

सभेची कार्यक्रमपत्रिका

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मा. विद्यापरिषदेची सभा **गुरूवार, दि. २३ डिसेंबर, २०२१** रोजी सकाळी ११.३० वाजता संत ज्ञानेश्वर सभागृह येथे आयोजित करण्यात आली आहे. सभेची कार्यक्रमपत्रिका सोबत जोडली आहे.

मा. सदस्यांना विनंती की, सदर सभेस उपस्थित रहावे.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७)

जावक क्रमांक : सी.बी.व्ही.पी./८९४)
दिनांक : १४ डिसेंबर, २०२१)

मा. कुलगुरू यांच्या आदेशावरून

(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

प्रति,

मा.विद्यापरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य

प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी :

सर्व संबंधित प्रशासकीय अधिकारी,
प्रस्तुत विद्यापीठ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी कमांक :
०२०—२५६२११५६
२५६२११५७
२५६२११६०

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
वेबसाइट : www.unipune.ac.in
ई—मेल : boards@pun.unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीबीएच/ 1L3L

दिनांक : २.१२.२०२१

सभेची सूचना

मा. अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा यांच्या प्राप्त आदेशानुसार **मानवविज्ञान विद्याशाखेची सभा, शुक्रवार दि. १० डिसेंबर, २०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता** शैक्षणिक विभाग सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे—४११००७ येथे आयोजित करण्यात आली आहे.

मा. सदस्यांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

मुंजाजी रासवे
(उपकुलसचिव)

कार्यक्रमपत्रिका

१. मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांनी पाठविलेल्या दि. १८.११.२०२१ रोजीच्या पत्रानुसार गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा, १९९४ सुधारित २००३ व तसेच स्त्री—पुरूष असमानतेबाबत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती होण्याच्या दृष्टीने त्यांच्या शैक्षणिक क्रमिक पुस्तकांमध्ये या विषयाचा समावेश करणेबाबत चर्चा करणे.
३. तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी पाठविलेल्या दि. १५.९.२०२१ रोजीच्या पत्रानुसार स्थानिक भागातील विकासविषयक प्रश्नांवर अभ्यास व संशोधन करण्याच्या दृष्टीने पदवी अभ्यासक्रमात २ क्रेडिटवर आधारित केस स्टडीज हा ऐच्छिक कोर्स समाविष्ट करणेबाबत चर्चा करणे.
४. बी.ए. आराखडयामध्ये ऐच्छिक क्रेडिट कोर्सचा समावेश करणे.
५. २०१३ पॅटर्नच्या अभ्यासक्रमास समकक्षता देणे.
६. आयत्यावेळी येणा—या विषयांवर चर्चा करणे.

प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी :

- मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे—४११ ००७.

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
(Formerly University of Pune)

Telephone Nos : 25601258, 25601259
Telegraph:' UNIPUNE'
Fax No. : 25691233
E-mail: rr@unipune.ac.in

ACADEMIC SECTION
Ganeshkhind, Pune 411007

Ref.No./RR/Marathi /265

Date : 09/11/2021

NOTICE OF MEETING

Meeting of the Research and Recognition Committee constituted under Section 37 (2) (a) of the Maharashtra Public Universities Act, 2016 to consider the applications and to recommend to the Board of Deans, received for recognition as a Post Graduate Teacher & Research Guide of the University in the subject **Marathi** under the **Faculty of Humanities** will be held on **Tuesday, 16th November , 2021 at 12.00 Noon** in the Academic Section Hall, Savitribai Phule Pune University, Ganeshkhind, Pune 411007.

Kindly make it convenient to attend the meeting.

10/11/21
Assistant Registrar
(Academic Section)

1 **Dr. N. S. Umarani (Chairman)**
Pro-Vice-Chancellor
Savitribai Phule Pune University,
Pune-411 007
Mob.No. 9890476191
Email.: nsumarani@yahoo.com

2. **Dr. A. D. Kurane (Dean)**
Dept. of Anthropology
Savitribai Phule Pune University,
Pune - 411007
Mob. No.9422517048
Email.: anjali@unipune.ac.in

3. **Dr. Prabhakar B. Desai**
(Officiating Associate Dean)
Head, Department of Marathi,
Savitribai Phule Pune University,
Pune – 411007
Mob. No. 9881908020
Email : prabhakardesai@unipune.ac.in

4. **Dr. Shirish Rajaram Landge-Patil**
(B.O.S Chairman)
Shri. Marutrao Ghule Patil Shikshan Sansthan Jijamata College of Science & Arts, At. Dnyaneshwer Nagar, Bhinde, Nevasa, Dist. Ahmednagar -414605.
Mob.No.9404980324
Email: landageshirish@gmail.com

5. **Dr. Manohar Jadhav (Expert)**
Department of Marathi
Savitribai Phule Pune University
Pune-411007
Mob.No. 9822850290
Email: manohar2013@gmail.com

6. **Dr. Randhir S.Shinde(Expert)**
Department of Marathi
Shivaji University, Vidyanagar,
Kolhapur - 416 004
Mob. No. 9890913031
Email : randhirshinde76@gmail.com

Copy f.w.c.s. for information and necessary action to :

3. The Finance and Accounts Officer } Savitribai Phule Pune University,
4. The Deputy Registrar, Admission Section } Pune 411 007

Note: You are requested to follow the Governmental directives related with taking precautions during Pandemic of Covid -19

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

इतिवृत्त

विद्यापरिषद सभा

==========

दि. १० ऑगस्ट, २०२१

इतिवृत्त

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मा. विद्यापरिषदेच्या सभेचे आयोजन **मंगळवार, दि. १० ऑगस्ट, २०२१** रोजी **सकाळी ११.३० वाजता** संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे करण्यात आले होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

१	डॉ. नितीन करमळकर मा. कुलगुरू (अध्यक्ष)	२५	डॉ. अविनाश कुंभार
२	डॉ. एन. एस. उमराणी, मा. प्र—कुलगुरू	२६	डॉ. डी.सी.घारपुरे
३	डॉ. मनोहर चासकर	२७	डॉ. ज्योतीराम मोरे
४	डॉ. पराग काळकर	२८	डॉ. एस.बी.गायकवाड
५	डॉ. अंजली कुरणे	२९	डॉ. सुचेता पाटील
६	डॉ. संजीव सोनवणे	३०	डॉ. गोटन जैन
७	डॉ. यशोधन मिठारे	३१	डॉ. अभय खंडागळे
८	डॉ. अपूर्वा पालकर	३२	डॉ. श्रीनिवास लोंढे
९	डॉ. चंद्रशेखर मुरूमकर	३३	डॉ. एस. एस. परदेशी
१०	डॉ. गंगाराम ढाकणे	३४	डॉ. डी. एस. बोरमणे
११	डॉ. राजेंद्र झुंजारराव	३५	डॉ. अभिजित नातू
१२	डॉ. मोहन वामन	३६	डॉ. प्रविण चौधरी
१३	डॉ. एस. एल. लावरे	३७	डॉ. सोहन चितलांगे
१४	डॉ. भास्कर झावरे	३८	डॉ. चंद्रशेखर उपासनी
१५	डॉ. किर्ती धारवाडकर	३९	डॉ. अरूण गायकवाड
१६	डॉ. अशोक भोसले	४०	डॉ. नितीन घोरपडे
१७	डॉ. विलास खरात	४१	डॉ. भास्कर जंगले
१८	डॉ. प्रसन्न देशमुख	४२	डॉ. रामचंद्र रसाळ
१९	डॉ. सुधाकर जाधवर	४३	डॉ. अनिल अडसुळे
२०	डॉ. सुनिता आढाव	४४	डॉ. आनंद दडस
२१	डॉ. सुधाकर शेलार	४५	डॉ. शैलेश कासंडे
२२	श्री. उदय गुजर	४६	डॉ. आनंद देशमुख
२३	श्री. पांडुरंग बलकवडे	४७	डॉ. शिरीष लांडगेपाटील
२४	डॉ. महेश काकडे	४८	डॉ. सदानंद भोसले

४९	डॉ. अशोक चासकर	७१	डॉ. अमिता रवीकुमार
५०	डॉ. संभाजी काळे	७२	डॉ. अभिजात विचारे
५१	डॉ. बाळकृष्ण कांबळे	७३	डॉ. एस. पवित्रम्
५२	डॉ. विजय खरे	७४	गुप. कॅ. (निवृत्त) दिलीप दाणी
५३	डॉ. श्रुती तांबे	७५	डॉ. राकेश कुमार जैन
५४	डॉ. मेघा उपलाने	७६	डॉ. मिहीर अर्जुनवाडकर
५५	डॉ. प्रफुल्ल पवार (मा. कुलसचिव तथा सदस्य सचिव)	७७	डॉ. पल्लवी मेश्राम
५६	डॉ. उज्ज्वला जोगळेकर	७८	डॉ. संजय तांबट
५७	डॉ. अनघा भट बेहेरे	७९	डॉ. नागेश लोंढे
५८	डॉ. स्वाती आचार्य	८०	डॉ. दिपक माने
५९	डॉ. पंडित विद्यासागर	८१	डॉ. सुमन पांडे
६०	डॉ. सुरेश गोसावी	८२	डॉ. सुरेखा दप्तरे
६१	डॉ. चेतन दीवाण	८३	डॉ. वैभव जाधव
६२	डॉ. संजय चाकणे	८४	डॉ. अब्दुल बारी अब्दुल वहाब
६३	डॉ. माधवी रेड्डी	८५	डॉ. श्रीधर आकाशकर
६४	डॉ. शैलेश गुजर	८६	डॉ. सुप्रिया पाटील
६५	डॉ. एस. आर. कुचेकर	८७	डॉ. संजय धर्माधिकारी
६६	डॉ. एस. के. हरम	८८	डॉ. नितीन मुजुमदार
६७	डॉ. सुरभि जैन	८९	डॉ. जयंत कुलकर्णी
६८	डॉ. दिपाली जोशी	९०	डॉ. रेमण्ड दुराईस्वामी
६९	डॉ. गिरीश टिल्लू	९१	डॉ. टी. रामनाथन
७०	डॉ. आदित्य अभ्यंकर	९२	डॉ. कल्पना पै

१. मा. कुलगुरू महोदय आणि सर्व सन्माननीय सदस्यांचे मा. कुलसचिव यांनी हार्दिक स्वागत केले.

२. मा. कुलगुरू यांच्या परवानगीने सभेच्या कामकाजास सुरूवात झाली.

३. सभेचे कामकाज विद्यापीठगीताने सुरू झाले.

४. **अभिनंदनाचा ठराव** :

- विद्यापरिषदेवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ३२(३) च (१) अन्वये नियुक्त झालेल्या खालील सदस्यांचे अभिनंदन करण्यात आले.

  १) प्राचार्य (डॉ.) गंगाराम ढाकणे, बाबुरावजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी
  २) प्राचार्य (डॉ.) राजेंद्र झुंजारराव, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स, शिवाजीनगर, पुणे

- नियमित अभ्यासमंडळावरील अध्यक्ष पदांवर नव्याने नियुक्ती झाल्याबद्दल खालील सदस्यांचे अभिनंदन करण्यात आले.

  १) डॉ. गोटन जैन — फिजिक्स अभ्यासमंडळ
  २) डॉ. सुचेता पाटील — मायक्रोबायोलॉजी अभ्यासमंडळ

- विविध तदर्थ अभ्यासमंडळांवरील अध्यक्ष पदांवर नव्याने नियुक्ती झाल्याबद्दल खालील सदस्यांचे अभिनंदन करण्यात आले.

१) डॉ. संजय चाकणे — एन.सी.सी. तदर्थ अभ्यासमंडळ

२) डॉ. शैलेश गुजर — जैन स्टडिज तदर्थ अभ्यासमंडळ

३) डॉ. सुमन पांडे — शारीरिक शिक्षण अध्यापक शिक्षण तदर्थ अभ्यासमंडळ

४) डॉ. सुरेखा दप्तरे — शारीरिक शिक्षण क्रिडा व खेळ तदर्थ अभ्यासमंडळ

५) डॉ. वैभव जाधव — मुक्त व दूरस्थ अध्ययन तदर्थ अभ्यासमंडळ

६) डॉ. आरती नगरकर — हेल्थ सायन्स तदर्थ अभ्यासमंडळ

७) डॉ. एस. आर. कुचेकर — होम सायन्स तदर्थ अभ्यासमंडळ

८) डॉ. विनोद शहा — बेसिक मेडीकल सायन्स तदर्थ अभ्यासमंडळ

९) डॉ. संजय धांडे — लिबरल आर्टस् तदर्थ अभ्यासमंडळ

१०) डॉ. गिरीश टिल्लु — आयुष रिसर्च तदर्थ अभ्यासमंडळ

११) डॉ. संजीव तांबे — केमिकल ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी तदर्थ अभ्यासमंडळ

१२) डॉ. ए. ए. वराडे — समन्वयक — केमिकल ॲण्ड पेट्रोलियम इंजिनिअरींग

१३) डॉ. रेमंड ए. दुराईस्वामी — समन्वयक — जिऑलॉजी अभ्यासमंडळ

१४) डॉ. कल्पना पै — समन्वयक — बायोटेक्नॉलॉजी ॲण्ड बायोइन्फॉरमेटीक्स अभ्यासमंडळ

५. अनुपस्थित सदस्य :

खालील सदस्यांनी काही कारणास्तव उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविल्याने त्यांची रजा मंजूर करण्यात आली.

१) डॉ. बी.व्ही. सांगवीकर
२) डॉ. सोमक रायचौधरी
३) डॉ. किसन आंबेडे
४) डॉ. विनोद शहा

५) डॉ. प्रदीप भार्गवा	६) डॉ. शुभदा नगरकर
७) डॉ. वर्षा पाटील	८) डॉ. वृंदा जोशी
९) डॉ. संजीव तांबे	१०) डॉ. ए. ए. वराडे
११) डॉ. एस. व्ही घैसास	१२) श्रीमती सुनेत्रा पवार

६ माननीय कुलगुरू यांनी आपला अहवाल मा. विद्यापरिषदेस सादर केला.

अभिनंदनाचा ठराव :

डॉ. संजीव सोनवणे यांनी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. नितीन करमळकर यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला.

आपल्या विद्यापीठाचे जागतिक स्तरावरील रॅंकिंग वाढलेले असून ते २०० इतके पुढे गेलेले आहे ही फार मोठी घटना आहे. मा. कुलगुरू यांच्या काळात अनेक चांगल्या गोष्टी झालेल्या आहेत. त्यांनी खूप चांगले काम केलेले आहे. जवळपास १०—२० वर्षांनी असे कुलगुरू विद्यापीठाला मिळाले आहेत. मा. विद्यापरिषदेच्या वतीने मा. कुलगुरू यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडतो.

यास डॉ. संजय चाकणे आणि डॉ. प्रसन्न देशमुख यांनी अनुमोदन दिले.

याशिवाय खालील सदस्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला व त्यास सभागृहाने मान्यता दिली.

डॉ. दत्तात्रय बोरमाने हे ए.आय.टी.ई. वर निवडून आल्याबद्दल

डॉ. संजीव सोनवणे यांची राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य म्हणून नेमणूक झाल्याबद्दल

डॉ. सदानंद मोरे यांची महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती.

डॉ. सतीश आळेकर यांची महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती.

डॉ. राजा दीक्षित यांची महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती.

७. यानंतर कार्यक्रमपत्रिकेनुसार सभेचे कामकाज सुरू झाले.

'अ' प्रस्ताव

अ १ पीए/१/२०२१ दि. १ एप्रिल, २०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

ठराव

वि. प. क्र अ १ पीए /१/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, विद्यापरिषदेच्या दि. १ एप्रिल, २०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून दुरूस्तीसह कायम करण्यात येत आहे.

अ २ पीए/२/२०२१ दि. १ एप्रिल, २०२१ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या सभेच्या इतिवृत्तावर केलेली कार्यवाही.

ठराव

वि. प. क्र अ २ पीए /२/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, विद्यापरिषदेच्या दि. १ एप्रिल, २०२१ रोजी झालेल्या सभेत घेतलेल्या निर्णयांवर केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येत आहे.

अ ३ पीए/३/२०२१ **प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, सर विश्वेश्वरैय्या इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, चिंचोली, ता. सिन्नर, जि. नाशिक या अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील बी.व्होक. अभ्यासक्रमाच्या मान्यतेबाबत..**

(टीप: प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, सर विश्वेश्वरैय्या इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, चिंचोली, ता. सिन्नर, जि. नाशिक या अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१८—१९ पासून उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांनी शासन निर्णय क्र.टीईएम—२०१८/प्र.क्र.२१४/तांशि—४, दि. १० जुलै, २०१८ नुसार शैक्षणिक वर्ष २०१८—१९ पासून एनएसक्यूएफ (NSQF) अंतर्गत बी.व्होक अभ्यासक्रमाच्या खालील नमूद अभ्यासक्रमांस मान्यता दिलेली आहे. तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी खालील नमूद अभ्यासक्रमांस मान्यता दिलेली आहे.

विद्यापीठ परिपत्रक क्र. १७७/२०२०, संदर्भ सीबी/एसअॅण्डटी/३६४, दि. २९/०६/२०२० नुसार अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांमधील बी.व्होक अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आलेली आहे.

अनु क्र.	बी.व्होक. अभ्यासक्रम	विद्यार्थी प्रवेश क्षमता
१	रेफ्रिजरेशन अॅण्ड एअर कंडिशनिंग	२५
२	प्रोडक्शन टेक्नॉलॉजी	२५

मा. अधिष्ठाता मंडळाने छाननी व पडताळणी करुन संबंधित महाविद्यालयात उक्त बी.व्होक. अभ्यासक्रम सुरु करण्याची परवानगी/संलग्नीकरण देणेबाबत (डॉ.) खराटे गजानन यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीने महाविद्यालयास दि. २६/०३/२०२१ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन अहवाल सादर केलेला आहे. समितीकडून प्राप्त झालेल्या अहवालातील मुद्दा क्र. १३ मधील माहितीवरुन दिसून येते की, शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९ आणि २०१९—२०२० करिता महाविद्यालयात विद्यार्थी प्रवेशित झालेले नाहीत. समितीने महाविद्यालयास उक्त बी. व्होक अभ्यासक्रम सुरु करण्यास महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाच्या विनंतीनुसार परवानगीची शिफारस केलेली नाही.

तसेच मा. अधिष्ठाता मंडळाच्या दि. २४/०६/२०२१ रोजी झालेल्या सभेमधील ठराव क्र. १७२/२४०६२०२१ नुसार मा. विद्यापरिषदेकडे बी.व्होक अभ्यासक्रमांस पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणास परवानगीची शिफारस केलेली नाही.

उक्त शासन आदेशांन्वये मंजूर करण्यात आलेल्या बी. व्होक. अभ्यासक्रमास संलग्नीकरण देण्याचे किंवा नाकारण्याचे अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ

अधिनियम, २०१६ चे कलम ११० (२) मधील तरतूदींनुसार विद्यापीठाच्या मा. विद्यापरिषदेस असल्यामुळे सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या विचारार्थ सादर.)

ठराव

वि.प. अ ३ पीए/३/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, सर विश्वेश्वरैय्या इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, चिंचोली, ता. सिन्नर, जि. नाशिक या अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात बी.व्होक. अभ्यासक्रमास उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांनी शासन निर्णय टीईएम—२०१८/प्र.क्र.२१४/तांशि—४, दि. १० जुलै, २०१८ नुसार दिलेल्या मंजूरीस अनुसरुन पुढील विवरणात नमूद केलेल्या बी.व्होक. अभ्यासक्रमांस संलग्नीकरणास परवानगीची शिफारस समितीने केलेली नसल्यामुळे या महाविद्यालयातील खालील बी.व्होक अभ्यासक्रमांस संलग्नीकरणाची परवानगी देण्यात येऊ नये.

अनु क्र.	बी. व्होक. अभ्यासक्रम	विद्यार्थी प्रवेश क्षमता
१	रेफ्रिजरेशन ॲण्ड एअर कंडिशनिंग	२५
२	प्रोडक्शन टेक्नॉलॉजी	२५

अ ४ पीए/४/२०२१ कायम संलग्नीकरण संदर्भातील सुधारित निकषांबाबत.

(टीप महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा दिनांक. १ मार्च, २०१७ पासून अंमलात आलेला आहे. सदर अधिनियमातील कलम ११६ अन्वये संलग्न महाविद्यालयांना आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांना स्थायी/कायम संलग्नीकरण (Permanent Affiliation) देणे संदर्भात तरतूद करण्यात आली आहे.

सदर तरतूदीस अनुसरून संलग्न महाविद्यालयांना/मान्यताप्राप्त परिस्थांना स्थायी/कायम संलग्नीकरण (Permanent Affiliation) देणेबाबत मा. विद्यापरिषदेने २३ जानेवारी, २०२० रोजी झालेल्या सभेतील ठराव क्र.वि. प.क्र.अ.४.पी.ए/४/२०२० अन्वये, स्थायी/कायम संलग्नीकरण (Permanent Affiliation) निकष ठरवण्यासाठी मा. कुलगुरू यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार मा. कुलगुरू यांनी मा. डॉ. एन. एस. उमराणी प्र—कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केलेली होती. सदर समितीने कायम संलग्नीकरणाचे प्रचलित निकष/नियमांवर सविस्तर चर्चा करून सुधारित निकष तयार केलेले आहेत. (सोबत प्रत) सदर निकष लागू करण्यासाठी मा. विद्यापरिषदेच्या विचारार्थ सादर)

ठराव

वि.प. अ ४ पीए/४/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील अभ्यासक्रमांना स्थायी/कायम संलग्नीकरण (Permanent Affiliation) देण्याबाबतचे सुधारित निकष योग्य त्या दुरूस्त्यांसह मान्य करण्यात येत आहेत.

अ ५ पीए/५/२०२१ अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ पासून विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत अस्तित्वात असलेल्या विनाअनुदानित अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांमध्ये NSQF अंतर्गत बी.व्होक पदवी अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेश क्षमतेत वाढ व अभ्यासक्रम बंद करण्यास परवानगी/मान्यता देण्याबाबत...

(टीप: महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. टीईएम—२०२०/प्र.क्र.१११/तांशि—४, दि. २२ जुलै, २०२१ व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२०—२१ पासून विनाअनुदानित अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेमध्ये / महाविद्यालयांमध्ये NSQF अंतर्गत बी.व्होक पदवी अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेश क्षमतेत वाढ व अभ्यासक्रम बंद करणे इ. बाबत शासनाची मान्यता मिळालेली आहे. (सोबत शासन निर्णय)

उक्त शासन निर्णयामध्ये परिशिष्ट 'अ' आणि 'ब' मध्ये नमूद महाविद्यालयांच्या नावासमोरील बी.व्होक अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ पासून नव्याने सुरु करणे, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास शासन मान्यता मिळालेली आहे.

तसेच शासन निर्णयासोबत असलेल्या परिशिष्ट 'क' मध्ये नमूद महाविद्यालयांच्या नावासमोरील बी.व्होक अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ पासून बंद करण्याकरिता शासन मान्यता मिळालेली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ मधील तरतुदींनुसार नवीन अभ्यासक्रम/विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढ करण्यास मा. विद्यापरिषदेची मान्यता असणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२१ मधील तरतुदींनुसार अभ्यासक्रम बंद करण्याकरिता मा. विद्यापरिषदेची मान्यता असणे आवश्यक आहे.

उक्त शासन आदेशांन्वये मंजूर करण्यात आलेल्या बी.व्होक. अभ्यासक्रमास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०९ नुसार नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास परवानगी/मान्यता देणे आणि कलम १२१ नुसार अभ्यासक्रम बंद करण्यास परवानगी/मान्यता देण्याबाबतचे अधिकार संबंधित तरतूदींनुसार विद्यापीठाच्या मा. विद्यापरिषदेस असल्यामुळे सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या विचारार्थ सादर.)

ठराव

वि.प. अ ५ पीए/५/२०२१ दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, दि. २२ जुलै, २०२१ रोजीच्या शासन आदेशांन्वये मंजूर करण्यात आलेल्या व या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' आणि 'ब' मध्ये नमूद बी.व्होक अभ्यासक्रम महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०९ नुसार नव्याने सुरु करण्यास, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास संबंधित महाविद्यालयांनी मागणी केल्यानंतर आवश्यक शुल्क भरून घेऊन बी.व्होक. अभ्यासक्रमाच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणास परवानगी/मान्यता देण्यात येत आहे.

पुढे असा ही ठराव करण्यात येतो की, उक्त शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट 'क' मध्ये नमूद बी.व्होक अभ्यासक्रम महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२१ नुसार बंद करण्यास संबंधित महाविद्यालयांनी मागणी केल्यानंतर आवश्यक प्रक्रिया करून हे अभ्यासक्रम बंद करण्यास परवानगी/मान्यता देण्यात येत आहे.

अ ६ पीए/६/२०२१ परिपत्रक क्र. १२५ मध्ये अंर्तभूत वास्तुशास्त्र पदव्युत्तर अभ्यासक्रमांमधील सात अभ्यासक्रम पुन:श्च विद्यापीठाकडे वर्ग करणेबाबत...

(टिप: परीक्षा विभागाच्या परिपत्रक क्र. १२५, दिनांक ०१ जून २०११ नुसार एकापेक्षा जास्त परंतु कमाल ३ महाविद्यालयात/संस्थात/विद्यापीठ शैक्षणिक विभागात जो बारावी परीक्षेनंतरचा पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविला जातो, अशा अभ्यासक्रमाची परीक्षा व तत्संबंधीची सर्व कामे संबंधित महाविद्यालयात/संस्थात/विद्यापीठ शैक्षणिक विभागात वर्ग करण्यात येतात. या नियमाचा उपयोग करून वास्तुशास्त्र पदव्युत्तर अभ्यासक्रमांमधील खालील नमूद शाखांचे अभ्यासक्रम परिपत्रक क्र. १२५ अन्वये महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१६—१७ पासून महाविद्यालयात वर्ग करण्यात आले आहेत.

1. M.Arch – Landscape Architecture
2. M.Arch – Environmental Architecture
3. M.Arch – Digital Architecture
4. M.Arch – Urban Design
5. M.Arch- Construction Management
6. M.Arch- Architectural Conservation
7. M.Arch – Computer Application

उपरोक्त नमूद केलेले सर्व अभ्यासक्रम हे वास्तुशास्त्र पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या शाखा (branches) आहेत. परिपत्रक क्र. १२५ चा सविस्तर अभ्यास केला असता खालील बाबीं निदर्शनास आलेल्या आहेत.

Master of Architecture हा पदव्युतर अभ्यासक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्नित वास्तुशास्त्र महाविद्यालयातून राबविला जातो. त्यामध्ये ७ शाखांचा समावेश असून परिपत्रक क्र. १२५ मध्ये काही शांखांचा अभ्यासक्रम वर्ग करण्याबाबत कोठेही उल्लेख नाही. त्यामुळे काही वर्षापासून तांत्रिक त्रुटींमुळे वर निर्देशित शाखांच्या परीक्षेसंबंधी सर्व काम महाविद्यालय स्तरावर करण्यात येत आहे.

उपरोक्त नमूद एम.आर्च. पदव्युतर अभ्यासक्रमांच्या सात शाखांच्या महाविद्यालय स्तरावर परीक्षा घेऊन सदर परीक्षेचे निकालपत्र (Ledger) महाविद्यालय स्तरावर तयार होऊन विद्यापीठाच्या छाननी व तालिनीकरण कक्षाकडे तपासण्यास येते. त्या निकालपत्रामध्ये अभ्यासक्रमांतील नमूद तरतुदी व नियमांच्या (Rules and Regulations) अनुषंगाने विविध त्रुटी आढळतात व दुरूस्तीसाठी ते पुन:श्च महाविद्यालयाकडे पाठविण्यात येते. या सर्व प्रक्रियेमध्ये निकाल जाहीर करण्यास विलंब लागतो. बहुतांश वेळा सदर निकाल हे परीक्षेनंतर ४५ दिवसांच्या आत जाहीर होत नाही व त्यामुळे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ८९ च्या तरतुदीचा भंग होतो. तसेच बरीच महाविद्यालये निकालाची soft copy देत नाहीत. जुन्या पॅटर्नच्या निकालपत्रकामध्ये बरेचदा विद्यार्थी कमी असल्याने निकाल पत्राची अत्यंत कमी म्हणजे एक किंवा दोनच पाने असतात. त्यामुळे निकालाची हॉर्डकॉपी

(लेजर) इतर निकालपत्रामध्ये लागून शोधणे अवघड होते. कालांतरानंतर एखाद्या विद्यार्थ्याने दुय्यम गुणपत्रक अथवा पडताळणी (व्हेरीफिकेशन) साठी अर्ज केल्यास सदर रेकॉर्ड संगणकावर उपलब्ध नसल्याने संबंधित प्रकरण प्रलंबित रहाण्याची शक्यता निर्माण होते.

या बाबींचा विचार करता वास्तुशास्त्र पदव्युत्तर अभ्यासक्रमातील सर्व विद्यार्थ्यांना एकसमान नियम व निकष लावून निकाल विहीत मुदतीमध्ये जाहीर होण्याच्या दृष्टीने परिपत्रक क्र. १२५ मध्ये अंर्तभूत केलेल्या वास्तुशास्त्र पदव्युत्तर परीक्षेतील सात शाखांच्या परीक्षा पुन:श्च विद्यापीठाकडे वर्ग करणेबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. असे कार्यालयाचे मत आहे.

सदर प्रस्ताव मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दिनांक १५ मे, २०२१ रोजी प्रस्ताव क्र. ०६/प्रवममूमं/३४/२०२१ मध्ये झालेल्या ठराव क्र. ३४/२०२१ (१५.०५.२०२१) अन्वये सदर बाब मा. विद्यापरिषदेच्या विचारार्थ सादर.)

ठराव

वि.प. अ ६ पीए/६/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, सदर प्रस्ताव मागे घेण्यात येत आहे.

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, परीक्षा विभागाचे परिपत्रक क्र. १२५चा फेरविचार करण्यासाठी समिती नेमण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना प्रदान करण्यात येत आहेत.

अ ७ पीए/७/२०२१ प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न लॉ कॉलेज, गणेशखिंड, पुणे—४११ ०१६ या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी बी.बी.ए.एलएल.बी. हा अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देणेबाबत

(टिप: मा. अध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युेशन सोसायटी, शिवाजीनगर, पुणे— ४११ ००५ यांचे संदर्भ क्र. ३१/२०२१.२०२२, दिनांक २५/०६/२०२१ रोजीचे पत्रान्वये संबंधित महाविद्यालयाने बी.बी.ए.एलएल.बी. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून सुरू करण्यास मान्यता देण्याबाबत अर्ज केलेला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (४) व त्याखालील परंतुकांमधील तरतूदींनुसार आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी—२०१७/(२०८/१७)/मशि—४, दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ अन्वये विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दती आणि निकषांनुसार शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० साठी विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत अस्तित्वात असलेल्या कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अभ्यासक्रमांची महाविद्यालये आणि परिसंस्था यांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० साठी नवीन अभ्यासक्रम, विषय, विशेषस्तर विषय, तुकडी, विद्याशाखा इ. सुरू करण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांसंदर्भात प्रक्रिया करण्यात आलेली असून सदरहू प्रस्तावांसंदर्भात विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसारच्या शिफारशीस अनुसरून उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून पुढील विवरणात नमूद केलेल्या विधी महाविद्यालयास नवीन अभ्यासक्रम व नवीन अतिरिक्त तुकडीस उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय अनुक्रमे एनजीसी २०१९/(१३१/१९)/मशि—४, दिनांक १५ जून, २०१९ व एनजीसी २०१९/(१३४/१९)/मशि—४, दिनांक १५ जून, २०१९ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.

अनु. क्र.	संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव	प्रस्तावित नवीन अभ्यासक्रम व नवीन तुकडी
१	प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न लॉ कॉलेज, गणेशखिंड, पुणे— ४११ ०१६	**नवीन अभ्यासक्रम:—** मानवविज्ञान— बी.बी.ए.एलएल.बी. (तुकडी क्र. १)
		नवीन तुकडी:— मानवविज्ञान—एलएल.बी. (तीन वर्षे) (तुकडी क्र. ३)

उपरोक्त नमूद शासन निर्णयांन्वये शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० साठी मंजूर करण्यात आलेले नवीन अभ्यासक्रम व नवीन अतिरिक्त तुकडी सुरू करण्यासंदर्भात संबंधित

महाविद्यालयास मा. शिक्षण सह–संचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे यांनी प्रमाणपत्र जा.क्र. शिससं/उशि/पुवि/पुणे/नमवि/साफुपुवि/ २०१९–२०/१७१४, दिनांक २१ जून, २०२० अन्वये कळविलेले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ११० मधील तरतूदींनुसार उक्त शासन आदेशांन्वये मंजूरी देण्यात आलेल्या नवीन अभ्यासक्रम, विषय, विशेषस्तर विषय, तुकडी, विद्याशाखा इत्यादींना पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्याचे अधिकार हे विद्यापीठाच्या मा. विद्या परिषदेस आहेत. नजीकच्या काळात मा. विद्यापरिषदेची सभा होणार नसल्याने मा. कुलगुरू यांनी मान्य केलेल्या टिपणीनुसार या कार्यालयाचे पत्र क्र. सीए/१०५९, दिनांक ०२/०७/२०१९ नुसार उक्त नमूद महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१९–२० करीता वरील रकान्यात नमूद नवीन अभ्यासक्रम व नवीन अतिरिक्त तुकडीस **बार कौन्सिल ऑफ इंडिया यांचे मान्यतेच्या अधीन संलग्नीकरण देण्यात आलेले होते.**

बी.सी.आय. यांनी त्यांच्या ११ ऑगस्ट, २०१९ (प्रकरण क्र. २४१/२०१९) प्रसिध्द निर्णयानुसार प्रमुख बाब पुढीलप्रमाणे:–

It is hereby unanimously RESOLVED that **a MORATORIUM is to be imposed for a period of Three Years at least for grant of approval of affiliation to New Law Centers of Legal Education/Institutions, New Law Colleges, New Law Schools, New Universities, New Deemed to be Universities, New University Constituent Units, State Government New University/ies,** Departments, New State Private Universities, or by whatever nomenclature the same may be known as, who are teaching and wish to teach Law as a professional degree course and also to grant of New Law Course/s or even to grant of additional sections in existing Law centers/Law Departments, Universities or by whatever nomenclature they may be known as, inclusive of the phrases referred to herein above.

मा. अध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युेशन सोसायटी, शिवाजीनगर, पुणे– ४११ ००५ यांचे संदर्भ क्र. ३१/२०२१–२०२२, दिनांक २५/०६/२०२१ रोजीचे पत्रान्वये संबंधित संस्थेचे म्हणणे खालीलप्रमाणे:–

महाविद्यालयाने महाराष्ट्र शासन व प्रस्तुत विद्यापीठाने बी.बी.ए.एलएल.बी. या अभ्यासक्रमास दिलेल्या मान्यतेस अनुसरून बार कौन्सिल ऑफ इंडिया यांचे कडे अर्ज केला असता ११ ऑगस्ट, २०१९ (प्रकरण क्र. २४१/२०१९) प्रसिध्द निर्णयानुसार संबंधित अभ्यासक्रम सुरू करता आला नाही. तथापि मा. पंजाब व हरियाणा उच्च न्यायालय येथे चंदिगढ एज्युकेशन सोसायटी विरूध्द बार कौन्सिल ऑफ इंडिया व इतर (CWP No. 7441

of 2020 (O&M). D/d. 4.12.2020) दाखल केलेल्या याचिकेवरील निर्णयानुसार बी.सी.आय. चा स्थगिती कालावधी मागे घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार बी.सी.आय. ने दिनांक १६ जून, २०२१ रोजी दिनांक ११ ऑगस्ट, २०१९ (प्रकरण क्रत्र २४१/२०१९) चा निर्णय मागे घेतलेला असून महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून बी.बी.ए. एलएल.बी. हा अभ्यासक्रम सुरू करू इच्छित आहे. तरी उच्च शिक्षण विभाग येथे आणि केंद्रीय प्रवेश प्रक्रियेसाठी नवीन अभ्यासक्रम समाविष्ट करण्यासाठी विद्यापीठाच्या पत्राची आवश्यकता आहे.

उपरोक्त बाबी मा. पंजाब व हरियाणा उच्च न्यायालय येथे चंदिगढ एज्युकेशन सोसायटी विरूध्द बार कौन्सिल ऑफ इंडिया व इतर (CWP No. 7441 of 2020 (O&M). D/d. 4.12.2020) दाखल केलेल्या याचिकेवरील निर्णयानुसार तसेच बार कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे दिनांक १६ जून, २०२१ रोजीच्या प्रसिध्दिपत्रानुसार महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२१—२२ करीता बी.बी.ए.एलएल.बी. या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणविषयक परवानगीबाबत प्रक्रिया करणेकरीता सदरप्रकरणी विद्यापीठाच्या वरिष्ठ कायदा अधिकारी, कायदा विभाग यांचेकडून टिपणी क्र. सीए/११९, दिनांक १४ जुलै, २०२१ नुसार कायदेशीर अभिप्राय घेण्यात आले. सदर अभिप्राय पुढीलप्रमाणे:—

> **मा. पंजाब व हरियाणा उच्च न्यायालय येथे चंदिगढ एज्युकेशन सोसायटी विरूध्द बार कौन्सिल ऑफ इंडिया व इतर (CWP No. 7441 of 2020 (O&M). D/d. 4.12.2020) दाखल केलेल्या याचिकेवरील निर्णय तसेच बार कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे दिनांक १६ जून, २०२१ रोजीच्या प्रसिध्दिपत्रक यांचा विचार करता शैक्षणिक वर्ष २०२१—२२ करिता बी.बी.ए.एलएल.बी. अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणास परवानगी देण्यास हरकत नाही.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ३३(१)(ड), कलम ३३(१)(ढ) व कलम ११० मधील तरतूदींनुसार संलग्नीकरण देण्याचे अधिकार हे विद्यापीठाच्या मा. विद्यापरिषदेस आहेत. तरी सदर प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या विचारार्थ सादर)

ठराव

वि. प. क्र. अ ७ पीए/७/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, **प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न लॉ कॉलेज, गणेशखिंड, पुणे—४११ ०१६ या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी बी.बी.ए.एलएल.बी.** (विद्यार्थी प्रवेशक्षमता—६०) या अभ्यासक्रमांस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०८ मधील तरतूदी तसेच प्रस्तावात नमूद शासन आदेशातील अटी व शर्तींच्या आणि विद्यापीठ अनुदान आयोग/बार कौन्सिल ऑफ इंडिया/परिषद/नियामक मंडळ/प्राधिकरण व भारत सरकार, महाराष्ट्र शासन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित आणि निर्गमित करण्यात आलेल्या नियम, आदेश, परिनियम, अध्यादेश इत्यांदीमधील तरतूदींच्या/मान्यतेच्या अधीन राहून पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ ८ पीए/८/२०२१ श्री ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे यमुनाबाई कुऱ्हे बी.एड. कॉलेज, मु.पो. वडाळा बहिरोबा, ता. नेवासा, जि. अहमदनगर– ४१४ ६०२ या महाविद्यालयातील बी.एड. या अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२०–२०२१ साठीच्या संलग्नीकरणाच्या नूतनीकरणाबाबत.

(टिप: श्री ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे यमुनाबाई कुऱ्हे बी.एड. कॉलेज, मु.पो. वडाळा बहिरोबा, ता. नेवासा, जि. अहमदनगर– ४१४ ६०२ या विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयात बी.एड. हा अभ्यासक्रम चालविण्यात येतो. श्री ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे यमुनाबाई कुऱ्हे बी.एड. कॉलेज, मु.पो. वडाळा बहिरोबा, ता. नेवासा, जि. अहमदनगर– ४१४ ६०२ या महाविद्यालयास एन.सी.टी.ई.रेग्युलेशनस्, २०१४ अन्वये राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद(एन.सी.टी.ई.), पश्चिम क्षेत्रीय समिती यांचे संदर्भ क्र. WRC/APW04255/123505/2015/142995, दि. ३१.०५.२०१५ रोजीच्या सुधारित आदेशान्वये बी.एड. (विद्यार्थी प्रवेशक्षमता–१००, युनिट–२) या अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आलेली होती तसेच एन.सी.टी.ई., पश्चिम क्षेत्रीय समिती यांचे संदर्भ क्र. WRC/APW044255/123505/2017/186599, दि. ०६.०६.२०१७ रोजीच्या आदेशान्वये बी.एड. या अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेशक्षमता–१०० (युनिट–२) वरून विद्यार्थी प्रवेशक्षमता–५० (युनिट–१) करण्यास मान्यता देण्यात आलेली होती.

मा. प्रादेशिक संचालक, राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, पश्चिम क्षेत्रीय समिती, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र. WRC/APW04255/123505/311th/2019 /206661, दि. १०.१०. २०१९ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त नमूद महाविद्यालयाची **बी.एड. अभ्यासक्रमाची चालू शैक्षणिक सत्राच्या शेवटापासून (शैक्षणिक वर्ष २०२०–२१ पासून) मान्यता काढून घेण्यात आलेली असल्याचे कळविण्यात आले आहे.** सदर पत्रांस अनुसरून या कार्यालयाचे पत्र क्र. सीए/१८१३, दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ अन्वये महाविद्यालयाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. त्यास अनुसरून महाविद्यालयाने संदर्भ क्र. B.Ed./43/2019-20, दिनांक ०९/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, पश्चिम क्षेत्रिय समिती, नवी दिल्ली या कार्यालयात संस्थेचे प्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष भेट देवून यासंदर्भात राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, पश्चिम क्षेत्रिय समिती यांच्या नियमानुसार आवश्यक ती फी भरून त्यासंदर्भातील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याबाबत कळविले आहे.

मा. प्रादेशिक संचालक, राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, पश्चिम क्षेत्रीय समिती, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र. WRC/APW04255/123505/329th/2021/215013, दि. ११.०३. २०२१ रोजीच्या पत्रान्वये (Continuation order) श्री ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे यमुनाबाई कुऱ्हे बी.एड. कॉलेज, मु.पो. वडाळा बहिरोबा, ता. नेवासा, जि. अहमदनगर–

४१४ ६०२ या महाविद्यालयाची बी.एड. (विद्यार्थी प्रवेशक्षमता–५०, युनिट–१) या अभ्यासक्रमाची मान्यता सुरू ठेवलेली आहे.

मा. सेक्रेटरी, श्री ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, खरवंडी (भोग्याची), ता. नेवासा, जि. अहमदनगर यांनी संदर्भ क्र. sdspmk/2021-22/01, दिनांक ०२/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, पश्चिम क्षेत्रिय समिती, नवी दिल्ली यांची दिनांक १७ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या मिटी नं. ३२९ मध्ये झालेल्या निर्णयानुसार महाविद्यालयास पुन्हा Continuation order मिळाली असल्याने शैक्षणिक वर्ष २०२०–२०२१/२०२१–२२ करीता महाविद्यालयास संलग्नीकरण पत्र मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे.

अभियांत्रिकी, वास्तूशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन शास्त्र, विधी आणि शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्याले/परिसंस्था यांना शैक्षणिक वर्ष २०२०–२०२१ च्या संलग्नीकरणाविषयकची परवानगी देणे आवश्यक असल्याच्या तातडीच्या परिस्थितीमुळे मा. कुलगुरू यांनी उक्त अधिनियमातील कलम १२ (७) मधील तरतूदींस अनुसरून टिपणी क्र. सीए/७८, दिनांक ०५/०८/२०२० नुसार 'मा. विद्यापरिषदेच्यावतीने' संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये व परिसंस्थां यांना संबंधित अभ्यासक्रमांची संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ इ. शैक्षणिक वर्ष २०२०–२०२१ साठी सुरू ठेवण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०८ तसेच संबंधित शिखर संस्था/परिषद/नियामकमंडळ/ प्राधिकरण, भारत सरकार, महाराष्ट्र शासन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे कडून वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या तरतूदींनुसार त्याचप्रमाणे संबंधित शासन मान्यतेच्या अधीन राहून (लागू असल्यास) तसेच स्वयंमूल्यमापन अहवालांच्या व त्या सोबतच्या कागदपत्रांच्या छाननी व तपासणी अंतीच्या अटी व शर्तीच्या तसेच संबंधित त्रुटी पूर्तता अर्जांवरील निर्णयाच्या अधीन राहून परवानगी देण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना शैक्षणिकवर्ष २०२०–२०२१ साठी संलग्नीकरणाचे नूतनीकरण/नैसर्गिकवाढ इ. चे पत्र निर्गमित करण्यात आलेले आहे व येत आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० व कलम ११४ अन्वये संलग्नीतकरण करण्यासाठी कार्यपध्दती व संलग्नीकरण किंवा मान्यता चालू ठेवणे याबाबतची तरतूद आहे. त्यानुसार संलग्नीकरण देण्याबाबतचे अधिकार मा. विद्यापरिषदेस आहे.

तरी उक्त नमूद राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेचे दिनांक ११.०३.२०२१ रोजीच्या पत्रास अनुसरून तसेच सेक्रेटरी, संबंधित संस्था यांच्या अर्जास अनुसरून उक्त नमूद महाविद्यालयास बी.एड. (विद्यार्थी प्रवेशक्षमता–५०, युनिट–१) या अभ्यासक्रमास संलग्नता सुरू ठेवण्याबाबतचा सदर प्रस्ताव अवलोकनार्थ व आदेशार्थ मा. अधिष्ठाता मंडळाच्या दिनांक ०८ जुलै, २०२१ रोजी झालेल्या सभेपुढे सादर करण्यात आला असता त्यावर पारित झालेला **ठराव क्र. १५४/०८०७२०२१** पुढीलप्रमाणे:

असा ठराव करण्यात येतो की, श्री ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे यमुनाबाई कुऱ्हे बी.एड. कॉलेज, मु.पो. वडाळा बहिरोबा, ता. नेवासा, जि. अहमदनगर– ४१४ ६०२ या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२०–२०२१ करीता बी.एड. (विद्यार्थी प्रवेशक्षमता–५०, युनिट–१) या अभ्यासक्रमास संलग्नता सुरू ठेवण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ तसेच राष्ट्रीय अध्यापक शिक्षक परिषद, नवी दिल्ली/विद्यापीठ अनुदान आयोग/संबंधित शिखर संस्था/परिषद/नियामक मंडळ इ. तसेच केंद्र शासन, महाराष्ट्र शासन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेले आणि येणाऱ्या नियम/आदेश/मार्गदर्शक तत्वे/परिनियम/अध्यादेश इ. तरतूदींनुसार तसेच संबंधित अभ्यासक्रम व प्रवेश क्षमता मान्यतेच्या त्याचप्रमाणे संबंधित स्वयं मूल्यमापन व त्रृती पूर्तता अहवालांच्या छाननी व तपासणीअंतीच्या अटी व शर्तींची विहीत मुदतीत पूर्तता करण्याच्या अधीन राहून परवानगी देण्यास मा. विद्यापरिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

तरी सदर प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या विचारार्थ सादर.)

ठराव

वि. प. क्र. अ ८ पीए/८/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, श्री ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे यमुनाबाई कुऱ्हे बी.एड. कॉलेज, मु.पो. वडाळा बहिरोबा, ता. नेवासा, जि. अहमदनगर– ४१४ ६०२ या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२०–२०२१ करीता बी.एड. (विद्यार्थी प्रवेशक्षमता–५०, युनिट–१) या अभ्यासक्रमास संलग्नता सुरू ठेवण्यास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ तसेच राष्ट्रीय अध्यापक शिक्षक परिषद, नवी दिल्ली/विद्यापीठ अनुदान आयोग/नियामक मंडळ इ. तसेच केंद्र शासन, महाराष्ट्र शासन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेले आणि येणाऱ्या नियम/आदेश/मार्गदर्शक तत्वे/परिनियम/अध्यादेश इ. तरतूदींनुसार तसेच संबंधित अभ्यासक्रम व प्रवेश क्षमता मान्यतेच्या त्याचप्रमाणे संबंधित स्वयं मूल्यमापन व त्रुटी पूर्तता अहवालांच्या छाननी व तपासणीअंतीच्या अटी व शर्तींची विहीत मुदतीत पूर्तता करण्याच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

अ ९ पीए/९/२०२१ शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत अस्तित्वात असलेल्या फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या परवानगीस अनुसरून शासन मान्यता मिळालेल्या विनाअनुदानित औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ. च्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाबाबत...

(टीप: मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचा शासन निर्णय क्र. टीईएम—२०२१/प्र.क्र.११०/तांशि—४, दि. २९ जुलै, २०२१ नुसार व फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून विनाअनुदानित औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ. बाबत शासनाची मान्यता मिळालेली आहे.

या शासन निर्णयामध्ये परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद महाविद्यालयांच्या नावासमोरील अभ्यासक्रमांस शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ. करण्यास शासन मान्यता मिळालेली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मधील तरतुदींनुसार नवीन अभ्यासक्रम/विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढ करण्यास मा. विद्यापरिषदेची मान्यता असणे आवश्यक आहे.

उक्त शासन आदेशांन्वये मंजूर करण्यात आलेल्या नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०९ नुसार परवानगी/मान्यता देण्याबाबतचे अधिकार संबंधित तरतूदींनुसार विद्यापीठाच्या मा. विद्या परिषदेस असल्यामुळे सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या विचारार्थ सादर.)

ठराव

वि.प. अ ९ पीए/९/२०२१ दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, दि. २९ जुलै, २०२१ च्या शासन आदेशांन्वये मंजूर करण्यात आलेल्या व या शासन आदेशास जोडलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद अभ्यासक्रमांस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०९ नुसार नव्याने सुरु करण्यास, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास संबंधित महाविद्यालयांनी मागणी केल्यानंतर आवश्यक शुल्क भरून घेऊन संबंधित अभ्यासक्रमाच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणास परवानगी/मान्यता देण्यात येत आहे.

अ १० पीए/१०/२०२१ **अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ पासून विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत अस्तित्वात असलेल्या विनाअनुदानित मान्यताप्राप्त व्यवस्थापन संस्था/परिसंस्थांमध्ये NSQF अंतर्गत बी. व्होक पदवी अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेश क्षमतेत वाढ व अभ्यासक्रम बंद करण्यास परवानगी/मान्यता देण्याबाबत.**

(टीप: मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचा शासन निर्णय क्र. टीईएम—२०२०/प्र.क्र.१११/तांशि—४, दि. २२ जुलै, २०२१ नुसार व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२०—२१ पासून विनाअनुदानित **मान्यताप्राप्त व्यवस्थापन संस्था/परिसंस्थांमध्य** NSQF अंतर्गतबी. व्होक पदवी अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेश क्षमतेत वाढ व अभ्यासक्रम बंद करणे इ. बाबत शासनाची मान्यता मिळालेली आहे.

या शासन निर्णयामध्ये परिशिष्ट 'अ' आणि 'ब' मध्ये नमूद महाविद्यालयांच्या नावा समोरील बी. व्होक अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ पासून नव्याने सुरु करणे, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास शासन मान्यता मिळालेली आहे.

तसेच शासन निर्णयासोबत असलेल्या परिशिष्ट 'क' मध्ये नमूद महाविद्यालयांच्या नावासमोरील बी. व्होक अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ पासून बंद करण्याकरिता शासन मान्यता मिळालेली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मधील तरतुदींनुसार नवीन अभ्यासक्रम/विद्यार्थीप्रवेश क्षमता वाढ करण्यास मा. विद्यापरिषदेची मान्यता असणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२१ मधील तरतुदींनुसार अभ्यासक्रम बंद करण्याकरिता मा. विद्यापरिषदेची मान्यता असणे आवश्यक आहे.

उक्त शासन आदेशांन्वये मंजूर करण्यात आलेल्या बी. व्होक. अभ्यासक्रमास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०९ नुसार नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास परवानगी/मान्यता देणे आणि कलम १२१ नुसार अभ्यासक्रम बंद करण्यास परवानगी/मान्यता देण्याबाबतचे अधिकार संबंधित तरतूदींनुसार विद्यापीठाच्या मा. विद्यापरिषदेस असल्यामुळे सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या विचारार्थ सादर.)

ठराव

वि.प. अ १० पीए/१०/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, दि. २२ जूलै २०२१ च्या शासन आदेशांन्वये मंजूर करण्यात आलेल्या या शासन आदेशास जोडलेल्या परिशिष्ट 'अ' आणि 'ब' मध्ये नमूद बी.व्होक.अभ्यासक्रम महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०९ नुसार नव्याने सुरु करण्यास, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास संबंधित परिसंस्थांनी/महाविद्यालयांनी मागणी केल्यानंतर आवश्यक शुल्क भरून घेऊन बी.व्होक. अभ्यासक्रमाच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणास परवानगी/मान्यता देण्यात येत आहे.

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, उक्त शासन आदेशाच्या परिशिष्ट 'क' मध्ये नमूद बी. व्होक अभ्यासक्रम महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२१ नुसार बंद करण्यास संबंधित परिसंस्थांनी/महाविद्यालयांनी मागणी केल्यानंतर आवश्यक प्रक्रिया करून बी.व्होक. अभ्यासक्रम बंद करण्यास परवानगी/मान्यता देण्यात येत आहे.

अ ११ पीए/११/२०२१ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी, सेक्टर नं. २१ यमुनानगर, निगडी, पुणे—४४ या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून 'विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील एम. फार्मसी (फार्मास्युटिकल केमिस्ट्री) (प्रवेश क्षमता ०६), एम. फार्मसी (फार्मास्युटिक्स) (प्रवेश क्षमता १५), एम. फार्मसी (फार्माकोलॉजी) (प्रवेश क्षमता ०६) आणि एम. फार्मसी (फार्मास्युटिकल क्वालिटी ॲश्युरन्स) (प्रवेश क्षमता १५) या अभ्यासक्रमाच्या स्थायी संलग्नीकरणासाठी प्राप्त अर्जावरील तज्ज्ञ समितीच्या अहवालाचा विचार करणे.

(टीप: प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी, सेक्टर नं. २१ यमुनानगर, निगडी, पुणे—४४ या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून 'विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील एम. फार्मसी (फार्मास्युटिकल केमिस्ट्री) (प्रवेश क्षमता ०६), एम. फार्मसी (फार्मास्युटिक्स) (प्रवेश क्षमता १५), एम. फार्मसी (फार्माकोलॉजी) (प्रवेश क्षमता ०६) आणि एम. फार्मसी (फार्मास्युटिकल क्वालिटी ॲश्युरन्स) (प्रवेश क्षमता १५) या अभ्यासक्रमास स्थायी संलग्नीकरणाच्या अर्जास अनुसरून सदर महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम ११६ अन्वये स्थायी संलग्नीकरण निकषांची पूर्तता होत आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल सादर करणेसाठी मा. अधिष्ठाता मंडळाने डॉ. चितलांगे एस. एस. यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ समिती नियुक्त केलेली होती. सदर समितीने दिनांक २३ जुलै, २०२१ रोजी उपरोक्त महाविद्यालयास भेट देऊन दिनांक २६ जुलै, २०२१ रोजी विद्यापीठास अहवाल सादर केलेला आहे.

उक्त अभ्यासक्रमांस स्थायी संलग्नीकरण देणेबाबत उपरोक्त समितीने शिफारस केलेली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ चे कलम ११६ मधील तरतुदीनुसार स्थायी संलग्नीकरणासाठीच्या अहवालास मा. अधिष्ठाता मंडळाच्यावतीने मा. प्र—कुलगुरू यांनी टिपणी क्र. सीए/१४४, दि. ०९ ऑगस्ट, २०२१ नुसार मा. विद्यापरिषदेकडे शिफारस करण्याकरिता परवानगी/मान्यता दिलेली आहे. .

सदर अहवाल महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६, कलम ११६ नुसार मा. विद्यापरिषदेस विचारार्थ सादर.)

ठराव

वि.प. अ ११ पीए/११/२०२१ दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी, सेक्टर नं. २१ यमुनानगर, निगडी, पुणे—४४ या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून 'विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील एम. फार्मसी (फार्मास्युटिकल केमिस्ट्री) (प्रवेश क्षमता ०६), एम. फार्मसी (फार्मास्युटिक्स) (प्रवेश क्षमता १५), एम. फार्मसी (फार्माकोलॉजी) (प्रवेश क्षमता ०६) आणि एम. फार्मसी (फार्मास्युटिकल क्वालिटी ॲश्युरन्स) (प्रवेश क्षमता १५) या अभ्यासक्रमास स्थायी संलग्नीकरणास परवानगी/मान्यता देण्यात येत आहे.

अ १२ पीए/१२/२०२१ पूना जेस्युट स्कूल्स एज्युकेशन सोसायटीचे सेंट व्हिन्सेंट कॉलेज ऑफ कॉमर्स, २००४, सेंट व्हिन्सेंट स्ट्रीट, पुणे — ४११ ००१ या महाविद्यालयाच्या 'स्थानांतरण' आणि 'रात्र अध्यापन' ऐवजी 'दिवस (सर्वसाधारण) अध्यापनाच्या' परवानगीबाबत.....

(टिप: पूना जेस्युट स्कूल्स एज्युकेशन सोसायटीचे सेंट व्हिन्सेंट कॉलेज ऑफ कॉमर्स, २००४, सेंट व्हिन्सेंट स्ट्रीट, पुणे — ४११ ००१ या महाविद्यालयाच्या स्थानांतरण आणि रात्र अध्यापन ऐवजी दिवस (सर्वसाधारण) अध्यापनाच्या परवानगीबाबतचे कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. स्थलांत—२०२०/(२८४/१९)/मशि—४, दिनांक २१ डिसेंबर, २०२० आणि मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र जा. क्र. शिससं/उशि/पुवि/सेंट व्हिसेंट महाविद्यालय/२०२१—२१/ २२३१, दिनांक ५ ऑगस्ट, २०२१ सोबत अवलोकनार्थ जोडले आहे

उपरोक्त महाविद्यालय हे सेंट जोसेफ टेक्निकल इन्स्टिट्यूट ॲण्ड ज्युनिअर कॉलेज कॅम्पस, मिरा सोसायटी जवळ, मोलेदिना हायस्कूलच्या मागे, शंकरशेठ रोड, पुणे — ४११ ०३७ या ठिकाणी स्थानांतरित करण्याच्या शासन मान्यतेकामी मा. व्यवस्थापन परिषदेच्या ठराव क्रमांक म : ८२/०५०५१७ नुसार विद्यापीठ पत्र संदर्भ क्र. सीए/६५६, दिनांक ०७ जुलै, २०१७ अन्वये 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यात आलेले आहे.

तथापि, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा दिनांक ०१ मार्च, २०१७ पासून अंमलात आला असून उपरोक्त महाविद्यालयाच्या वरीलप्रमाणेच्या स्थानांतरणाबाबत उपरोक्त अधिनियमातील कलम ११८ मधील तरतूदीनुसार सविस्तर प्रस्ताव आवश्यक त्या सर्व कागदपत्रं व आपले सुस्पष्ट अभिप्रायासह फेरसादर करण्याबाबत मा. प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पत्र क्र. अशाम/ २०१९/१९८७९/६५८/महा. स्थलां/संकिर्ण/पुवि/मवि—२/१६०१७, दिनांक १० डिसेंबर, २०१९ अन्वये निर्देश दिलेले आहेत.

तसेच मा. प्राचार्य, पूना जेस्युट स्कूल्स एज्युकेशन सोसायटीचे सेंट व्हिन्सेंट कॉलेज ऑफ कॉमर्स यांनी पत्र क्र. १५५/२०२०—२१, दिनांक १५ जून, २०२० अन्वये सदरहू महाविद्यालयास 'रात्र अध्यापन' ऐवजी 'दिवस (सर्वसाधारण) अध्यापनास' परवानगी देणेबाबत विनंती केलेली आहे.

सदरबाबत मा. प्र—कुलगुरू यांचे आदेशानुसार उपरोक्त महाविद्यालयाच्या वरीलप्रमाणेच्या स्थानांतरणाच्या तसेच 'रात्र अध्यापन' ऐवजी 'दिवस (सर्वसाधारण) अध्यापनास' परवानगी निर्धारणाकामी पुढील बाबींची तपासणी व पडताळणी करून तसेच सदरहू महाविद्यालयाच्या ठिकाणास भेट देऊन आवश्यक त्या बाबींची तपासणी करून अहवाल सादर करणेकामी शैक्षणिक विभागाच्या पत्र संदर्भ क्र. सीए/४७५,

दिनांक १०/०७/२०२० अन्वये डॉ. साठे प्रशांत विठ्ठल यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समिती नियुक्त करण्यात आलेली होती.

अ) उपरोक्त महाविद्यालयाच्या वरीलप्रमाणेच्या स्थानांतरणाच्या परवानगीकामी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११८ मधील बाबी:

१. अशा स्थानांतरणामुळे महाविद्यालय जेथून स्थानांतरित करण्यात येणार आहे त्या ठिकाणच्या शैक्षणिक विकासाला अडथळा येतो किंवा कसे.

२. जर असे नवीन ठिकाण हे, वार्षिक सम्यक योजनेत दर्शविल्याप्रमाणे, उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्याच्या ठिकाणापासून पाच किलोमीटरच्या परीघाच्या आत आहे किंवा कसे.

३. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि—४, दिनांक १५/९/२०१७ अन्वये विहित करण्यात आलेल्या तरतूदी, कार्यपद्धती आणि निकषांनुसार उपरोक्त महाविद्यालयाच्या ठिकाणी आवश्यक त्या पायाभूत सोयी व अन्य सुविधा पर्याप्त तसेच सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसारच्या तपासणी सूचीप्रमाणे संबंधित संस्थेची तयारी आहे किंवा कसे.

४. उपरोक्त महाविद्यालय हे अनुदानित असल्याने तसेच सदरहू महाविद्यालयास/ संस्थेस अल्पसंख्याक दर्जा प्राप्त असल्याने उक्त महाविद्यालयाच्या वरीलप्रमाणेच्या स्थानांतरणाच्या मंजूरीकामी आवश्यकतेनुसार मा. अल्पसंख्याक आयोगाचे आणि मा. शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन, पुणे यांचे 'ना हरकत प्रमाणपत्र' सदरहू संस्थेकडून प्राप्त करून घेण्यात यावे.

५. समितीस आवश्यक वाटतील त्या अन्य बाबी स्पष्ट शिफारसींसह उल्लेखित कराव्यात.

ब) उपरोक्त महाविद्यालयास 'रात्र अध्यापन' ऐवजी 'दिवस (सर्वसाधारण) अध्यापनास' परवानगी परवानगी देणेकामी खालील बाबी:

१. उपरोक्त महाविद्यालयास रात्र ऐवजी दिवसा अध्यापनाची परवानगी दिल्याने त्या ठिकाणच्या शैक्षणिक विकासाला अडथळा येतो किंवा कसे.

२. उपरोक्त महाविद्यालय अनुदानित असून सदरहू महाविद्यालयाचे व्यवस्थापन करणाऱ्या व्यवस्थापनास व महाविद्यालयास अल्पसंख्याक दर्जा प्राप्त आहे. सदरहू अध्यापनास रात्र ऐवजी दिवसा अध्यापनास परवानगीने सदरहू महाविद्यालयाच्या अनुदानित बाबींवर तसेच अल्पसंख्यांक दर्जामध्ये बदल संभवतो किंवा कसे याबाबत स्पष्ट अभिप्राय देण्यात यावेत. तसेच सदरबाबतचे आवश्यकतेनुसार मा. अल्पसंख्याक आयोगाचे आणि मा. शिक्षण संचालनालय (उच्च

शिक्षण), महाराष्ट्र शासन, पुणे यांचे 'ना हरकत प्रमाणपत्र' सदरहू संस्थेकडून प्राप्त करून घेण्यात यावे.

३. उपरोक्त महाविद्यालयास रात्र ऐवजी दिवसा अध्यापनाची परवानगीकामी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि—४, दिनांक १५/९/२०१७ अन्वये विहित करण्यात आलेल्या तरतूदी, कार्यपद्धती आणि निकषांनुसार उपरोक्त महाविद्यालयाच्या ठिकाणी आवश्यक त्या पायाभूत सोयी व अन्य सुविधा पर्याप्त तसेच उक्त पत्रासोबत परिशिष्टानुसारच्या तपासणी सूचीप्रमाणे संबंधित संस्थेची तयारी आहे किंवा कसे.

४. विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन, संबंधित शिखर संस्था/परिषद/ मंडळ व प्रस्तुत विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या निर्णय, आदेश, मार्गदर्शक तत्त्वे इ. नुसार उपरोक्त महाविद्यालयाच्या रात्र ऐवजी दिवसा अध्यापनाच्या परवानगीकामी सदरहू संस्थेकडे/महाविद्यालयाकडे आवश्यक ते अर्हताधारक अध्यापक व अध्यापकेतर मनुष्यबळ व अनुषंगिक बाबी उपलब्ध आहेत किंवा कसे.

५. राज्य शासनाची सहमती घेतल्यानंतर विद्यापीठाकडून परवानगी देण्यात येईल याबाबतचे सदरहू संस्थेचे महाविद्यालयाचे लेटरहेडवर हमीपत्र घेण्यात यावे.

६. समितीस आवश्यक वाटतील त्या अन्य बाबी स्पष्ट शिफारसींसह उल्लेखित कराव्यात.

उपरोक्त बाबींची तपासणी करून संबंधित तज्ज्ञ समितीने उपरोक्त महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन दिनांक २८ जुलै, २०२० रोजीच्या अहवालान्वये उक्त महाविद्यालयाच्या वरीलप्रमाणेच्या स्थानांतरणाच्या व 'रात्र अध्यापन' ऐवजी 'दिवस (सर्वसाधारण) अध्यापनास' परवानगीची शिफारस केलेली आहे.

उक्त पत्रांच्या व अहवालाच्या अनुषंगाने मा. अधिष्ठाता मंडळाने दिनांक २८ ऑगस्ट, २०२० रोजीच्या सभेतील ठराव क्र. १७२/२८०८२०२० अन्वये केलेली शिफारस पुढीलप्रमाणे :

सेंट व्हिन्सेंट कॉलेज ऑफ कॉमर्स या महाविद्यालयास सेंट जोसेफ टेक्निकल इन्स्टिट्यूट ॲण्ड ज्युनिअर कॉलेज कॅम्पस, मिरा सोसायटी जवळ, मोलेदिना हायस्कूलच्या मागे, शंकरशेठ रोड, पुणे — ४११ ०३७ या ठिकाणी स्थानांतरित करण्यासाठीचा आणि 'रात्र अध्यापना' ऐवजी 'दिवस (सर्वसाधारण) अध्यापनाच्या' परवानगी देणेबाबत मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

मा. अधिष्ठाता मंडळाच्या उपरोक्त ठरावास आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ११८ मधील तरतूदी व उक्त बाबी विचारात घेऊन उपरोक्त महाविद्यालयाच्या वरीलप्रमाणेच्या स्थानांतरणास आणि रात्र अध्यापन' ऐवजी 'दिवस (सर्वसाधारण) अध्यापनास' परवानगी देण्यास सहमती देणेकामी मा.

व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक रोजीच्या सभेतील ठराव क्र. म : / नुसार उक्त बाबींविषयकचा प्रस्ताव हा महाराष्ट्र शासनास प्रस्तुत विभागाच्या पत्र संदर्भ क्र. सीए/८७३, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२० अन्वये सादर करण्यात आला होता.

उक्त पत्र दिनांक १८ नोव्हेंबर, २०२० च्या अनुषंगाने कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. स्थलांत—२०२०/(२८४/१९)/मशि—४, दिनांक २१ डिसेंबर, २०२० पूना जेस्युट स्कूल्स एज्युकेशन सोसायटीचे सेंट व्हिन्सेंट कॉलेज ऑफ कॉमर्स, २००४, सेंट व्हिन्सेंट स्ट्रीट, पुणे — ४११ ००१ हे महाविद्यालय सेंट जोसेफ टेक्निकल इन्स्टिट्यूट ॲण्ड ज्युनिअर कॉलेज कॅम्पस, मिरा सोसायटी जवळ, मोलेदिना हायस्कूलच्या मागे, शंकरशेठ रोड, पुणे — ४११ ०३७ या ठिकाणी स्थानांतरण करण्यास तसेच रात्र अध्यापनाऐवजी 'दिवस सत्रात चालविण्यासंदर्भात शिफारस केलेल्या प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आलेली आहे.

- **सदर स्थानांतरणामुळे तसेच महाविद्यालय रात्र अध्यापनाऐवजी दिवस सत्रात बदल केल्यामुळे विद्यार्थ्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही. तसेच इतर महाविद्यालयातील विद्यार्थी संख्येवर कोणताही परिणाम होणार नाही.**

- **प्रस्तावित जागेच्या ठिकाणी शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार व विद्यापीठाच्या नियमानुसार आवश्यक त्या भौतिक सोयी—सुविधा उपलब्ध करण्यात याव्यात.**

- **सदर स्थानांतरणामुळे तसेच रात्र अध्यापनाऐवजी दिवस सत्रात बदल केल्यामुळे शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.**

- **स्थानांतरणासंदर्भातील विद्यापीठाच्या अटी व शर्तींची पूर्तता करणे संस्थेवर बंधनकारक राहील.**

- **महाविद्यालयात सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा अबाधित राहतील. महाविद्यालय रात्र अध्यापनाऐवजी दिवस सत्रात कदल केल्यामुळे कोणत्याही नवीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नव्याने नियुक्ती केल्यास शासन कोणतेही आर्थिक दायित्व स्विकारणार नाही.**

- **स्थानांतरणामुळे तसेच रात्र अध्यापनाऐवजी दिवस सत्रात बदल केल्यामुळे मूळ मान्यता आदेशात मंजूर केलेल्या विद्याशाखेमध्ये कोणताही बदल करता येणार नाही.**

तसेच मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र जा. क्र. शिससं/उशि/पुवि/सेंट व्हिसेंट महाविद्यालय/२०२१—२१/२२३१, दिनांक ५ ऑगस्ट, २०२१ अन्वये उक्त शासन पत्र दिनांक २१ डिसेंबर, २०२० मध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून उपरोक्त महाविद्यालय हे सेंट जोसेफ टेक्निकल इन्स्टिट्यूट ॲण्ड ज्युनिअर कॉलेज कॅम्पस, मिरा सोसायटी जवळ, मोलेदिना हायस्कूलच्या मागे, शंकरशेठ रोड, पुणे — ४११ ०३७ या ठिकाणी शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून दिवसा सुरू करणेबाबत तसेच सदरहू आदेशाची त्वरित

अंमलबजावणी करण्यात येऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्यांचे कार्यालयास पाठविणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम १०८ आणि कलम ११० मधील तरतूदींनुसार उपरोक्त महाविद्यालयाच्या वरीलप्रमाणेच्या स्थानांतरणास आणि 'रात्र अध्यापन' ऐवजी 'दिवस (सर्वसाधारण) अध्यापनास' परवानगी देणेसंदर्भात मा. विद्या परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, सदर प्रस्ताव मा. विद्या परिषदेस अवलोकनार्थ व आदेशार्थ सादर.)

ठराव

वि. प. क्र. अ १२ पीए/१२/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०८ आणि कलम ११० व कलम ११८ मधील तरतुदींच्या तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. स्थलांत—२०२०/(२८४/१९)/मशि—४, दिनांक २१ डिसेंबर, २०२० व सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग यांचे पत्र जा. क्र. शिससं/उशि/पुवि/सेंट व्हिसेंट महाविद्यालय/२०२१—२१/ २२३१, दिनांक ५ ऑगस्ट, २०२१ अन्वयेंच्या आदेशातील अटींच्या अधीन राहून, सेंट व्हिन्सेंट कॉलेज ऑफ कॉमर्स हे महाविद्यालय २००४, सेंट व्हिन्सेंट स्ट्रीट, पुणे — ४११ ००१ या ठिकाणाहून सेंट जोसेफ टेक्निकल इन्स्टिट्यूट ॲण्ड ज्युनिअर कॉलेज कॅम्पस, मिरा सोसायटी जवळ, मोलेदिना हायस्कूलच्या मागे, शंकरशेठ रोड, पुणे — ४११ ०३७ या ठिकाणी शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून 'स्थानांतरित' करण्यास तसेच सदरहू महाविद्यालयास 'रात्र' ऐवजी 'दिवस अध्यापनास' परवानगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ १३ पीए/१३/२०२१ **B.Sc (Fashion Design) Choise Based Credit – System Syllabus या अभ्यासक्रमाच्या शिक्षकांच्या शैक्षणिक अर्हतेबाबत**

(टिप :– विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या विविध महाविद्यालयांमध्ये B.Sc (Fashion Design) Choise Based Credit System हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९–२०२० पासून नव्याने सुरू करण्यात आलेला आहे. सदर अभ्यासक्रमासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या शिक्षकांना शिक्षक मान्यता देण्यासाठी कोणतेही शैक्षणिक अर्हतेबाबतचे निकष नसल्याने मा. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान यांनी प्राचार्य डॉ. हुंडेकरी यांची एक सदस्यीय समिती गठित केली होती. सदर समिती सदस्य यांनी B.Sc (Fashion Design) Choise Based Credit System या अभ्यासक्रमासाठी शिक्षक मान्यता देताना शैक्षणिक अर्हतेबाबतचे निकष खालीलप्रमाणे नमूद केलेले आहेत.

Assistant Professor :- M.Sc. in Fashion Design / Textile Design with a minimum of 55% marks.

Experience in Teaching / Research / Industry- Minimum 5 years. (Since NET is not available in Fasion Design at present it is not mentioned in the criteria.

.MA or MFA in fashion or any equivalent qualification / Industry experience of minimum 5 years + NET / SET in Fine Arts

.M.Sc. Clothing and Textiles from reputed University with the only specialization of Textiles and Clothing or Equivalent and no other subjects such as Child Development, FRM, Food & Nutrition. All subjects of Post - Graduation should be of Textiles and Clothing Exprience Of Teaching / Research / Industry - Minimum 5 years. (Related to Fashion Design)

.M. Des in Fashion Design or Textile Design with a minimum of 55% marks. Experience in Teaching / Research / Industry - Minimum 5 years.

.Masters degree in Fashion or Equivalent

Associate Professor :- **.** Ph.D in Fashion Design or Equivalent field

.Ph.D appeared with 10+ years of experience in teaching

.Masters in Fashion or Textile and Clothing with minimum 55 % and 10+ years of experience in teaching and relevant experience in research and development

उपरोक्त नमूद करण्यात आलेल्या शैक्षणिक अर्हतेबाबतच्या निकषास मा. विद्याशाखा व अभ्यास मंडळाच्या वतीने मा. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान यांनी मान्यता दिलेली असल्याने सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेपुढे मान्यतेसाठी सादर.)

ठराव

वि. प. क्र. अ १३ पीए/१३/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत B.Sc (Fashion Design) Choise Based Credit System या अभ्यासक्रमासाठी शिक्षक मान्यता देण्याबाबत, प्राचार्य हुंडेकरी यांच्या समितीने तयार केलेल्या शिक्षकांच्या शैक्षणिक अर्हतेबाबतच्या निकषामध्ये ही अर्हता जेव्हापासून उक्त विषयाची नेट/सेट परीक्षा घेतली जाईल त्यापुढे नेट/सेट लागू करण्यासंबंधीच्या तरतुदींचा समावेश करून दुरूस्तीसह निकषास मान्यता देण्यात येत आहे.

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, वरील शैक्षणिक अर्हता महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१ ( ) नुसार मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

Assistant Professor :- M.Sc. in Fashion Design / Textile Design with a minimum of 55% marks.

Experience in Teaching / Research / Industry- Minimum 5 years. (Since NET is not available in Fasion Design at present it is not mentioned in the criteria.

MA or MFA in fashion or any equivalent qualification / Industry experience of minimum 5 years + NET / SET in Fine Arts

M.Sc. Clothing and Textiles from reputed University with the only specialization of Textiles and Clothing or Equivalent and no other subjects such as Child Development, FRM, Food & Nutrition. All subjects of Post - Graduation should be of Textiles and Clothing Exprience Of Teaching / Research / Industry - Minimum 5 years. (Related to Fashion Design)

M. Des in Fashion Design or Textile Design with a minimum of 55% marks. Experience in Teaching / Research / Industry - Minimum 5 years.

Masters degree in Fashion or Equivalent

Associate Professor :- Ph.D in Fashion Design or Equivalent field

Ph.D appeared with 10+ years of experience in teaching

Masters in Fashion or Textile and Clothing with minimum 55% and 10+ years of experience in teaching and relevant experience in research and development

अ १४ पीए/१४ /२०२१ **इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेला विद्यार्थी प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयातील प्रवेश क्षमतेअभावी वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या दृष्टीने विद्यापीठांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार प्रवेश क्षमतेबाबत आवश्यक कार्यवाही करणेबाबत.....**

(टिप: मा. कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ४०० ०३२ यांचे पत्र क्र. बैठक—२०२१/प्र. क्र. १६१/विशि—३, दिनांक ५ ऑगस्ट, २०२१

इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेला विद्यार्थी प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयातील प्रवेश क्षमतेअभावी वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या दृष्टीने विद्यापीठांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार प्रवेश क्षमतेबाबत आवश्यक कार्यवाही करणेबाबत उपरोक्त शासन पत्र दिनांक ५ ऑगस्ट, २०२१ अन्वये निर्देश देण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ३३ तसेच कलम १०८, १०९ आणि ११० मधील तरतूदींनुसार अभ्यासक्रमास प्रवेशित करावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या/प्रवेश क्षमता निर्धारित करण्याचे व त्यामध्ये वाढ करण्याचे अधिकार हे मा. विद्या परिषदेस आहेत.

उक्त अधिनियमातील आणि उपरोक्त शासन पत्र दिनांक ५ ऑगस्ट, २०२१ अन्वये देण्यात आलेल्या उपरोक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेला विद्यार्थी प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयातील प्रवेश क्षमतेअभावी वंचित राहणार नाही यासंदर्भात तसेच त्यामुळे आर्थिक भार येईल किंवा कसे व अनुषंगिक बाबींसंदर्भातील नियमावली आणि कार्यपध्दती व निकष इत्यादी सुनिश्चित करण्यासाठी एक तज्ज्ञ समिती गठीत करणे आवश्यक आहे, असे वाटते.

सबब, सदर प्रस्ताव मा. विद्या परिषदेस अवलोकनार्थ व आदेशार्थ सादर.)

ठराव

वि. प. क्र. अ १४ पीए/१४/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ४०० ०३२ यांचे पत्र क्र. बैठक—२०२१/प्र. क्र. १६१/विशि—३, दिनांक ५ ऑगस्ट, २०२१ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार

इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेला विद्यार्थी प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयातील प्रवेश क्षमतेअभावी वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या दृष्टीने प्रस्तुत विद्यापीठाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार प्रवेश क्षमतेबाबत आवश्यक कार्यवाही करणेसंदर्भात नियमावली आणि कार्यपध्दती व निकष इत्यादी सुनिश्चित करण्यासाठी अहवाल सादर करणेकरिता तज्ज्ञ समिती नियुक्त करण्याचा अधिकार मा. कुलगुरू यांना देण्यात येत आहे.

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, उक्त समितीचा अहवाल स्वीकारणे आणि त्यासंदर्भातील अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना प्रदान करण्यात येत आहे.

आयत्या वेळेचे विषय :

अ १५ पीए/१५/२०२१ पीएच.डी.चा प्रबंध विद्यापीठाकडे सादर केल्यानंतर संशोधन मार्गदर्शकाकडील संबंधित संशोधक विद्यार्थ्यांची जागा रिक्त दाखविणेबाबत,

ठराव

वि. प. क्र. अ १५ पीए/१५/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, पीएच.डी.चा प्रबंध विद्यापीठाकडे सादर केल्यानंतर संशोधन मार्गदर्शकाकडील संबंधित संशोधक विद्यार्थ्यांची जागा रिक्त दाखविणेबाबत योग्य तो निर्णय घेण्यासाठी चारही विद्याशाखांच्या अधिष्ठात्यांची समिती नेमण्यास मान्यता देण्यात येत आहे.

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, सदर समितीचा अहवाल स्वीकारून पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना प्रदान करण्यात येत आहेत.

अ १६ पीए/१६ /२०२१ १० वर्षांचा व्यावसायिक अनुभव असल्यास पीएच.डी. प्रवेश परीक्षा (PET) मधून सूट देण्याबाबत

ठराव

वि. प. क्र. अ १६ पीए/१६/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, १० वर्षांचा व्यावसायिक अनुभव असणाऱ्यांना पीएच.डी. प्रवेश परीक्षा (PET) मधून सूट देण्याबाबत त्या–त्या विद्याशाखेने नियम/अटी निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, व्यावसायिक (उदा. डॉक्टर, अभियंता, वास्तुविशारद, न्यायाधीश, वकील इ.) तसेच प्रशासकीय (उदा. प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी, पोलीस अधिकारी/कर्मचारी इ.) अनुभवाची अट निश्चित करताना किमान १० वर्षांचा त्या–त्या क्षेत्रातील अनुभव, ज्यापैकी ५ वर्षांचा अनुभव हा पदव्युत्तर पदवीनंतरचा असावा.

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, त्या–त्या विद्याशाखेने प्रस्तावित केलेले निकष/अटी एकत्रित स्वरूपात स्वीकारण्याचे आणि त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना प्रदान करण्यात येत आहेत.

अ १७ पीए/१७/२०२१ **विना अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य नेमण्यासंदर्भात प्रक्रिया निश्चित करणेबाबत.**

ठराव

वि. प. क्र. अ १७ पीए/१७/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, प्रचलित शासन निर्णय विचारात घेऊन विना अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य नेमण्यासंदर्भातील प्रक्रिया निश्चित करण्यासाठी नेमण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना प्रदान करण्यात येत आहेत.

अ १८ पीए/१८/२०२१ **आर्थिक मागासवर्गीयांचे १० टक्के प्रवेश हे मान्य विद्यार्थीसंख्येपेक्षा जास्त असल्याने त्या प्रमाणात अनुदान मंजूर करण्याची मागणी मा. व्यवस्थापन परिषदेमार्फत शासनाला करणेबाबत.**

ठराव

वि. प. क्र. अ १८ पीए/१८/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, आर्थिक मागासवर्गीयांचे १० टक्के प्रवेश हे मान्य विद्यार्थीसंख्येपेक्षा जास्त असल्याने त्या प्रमाणात अनुदान मंजूर करण्याची मागणी मा. व्यवस्थापन परिषदेमार्फत शासनाला करण्याबाबतची शिफारस करण्यात येत आहे.

अ १९ पीए/१९/२०२१ **राष्ट्रीय पातळीवरील संशोधन संस्थांना संशोधन केंद्र म्हणून मान्यता देणेबाबत.**

ठराव

वि. प. क्र. अ १९ पीए/१९/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, सी.एस.आय.आर.ने मान्यता दिलेल्या विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील राष्ट्रीय पातळीवरील संशोधन संस्थांबरोबर सामंजस्य करार (MoU) करून या संस्थांना संशोधन केंद्र म्हणून मंजूरी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

'ब' प्रस्ताव

ब १ पीए/१/२०२१ **विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत बी.व्होक. अभ्यासक्रमांस व अभ्यासक्रम नव्याने प्रस्थापित करण्यास मान्यता देणेबाबत.**

(टीप: विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या मंगळवार, दि. १६ मार्च, २०२१ रोजी झालेल्या सभेमध्ये ठराव क्र. १३ नुसार Life Sciences, Chemical and Pharmacy या व्होकेशनल तदर्थ अभ्यासमंडळाने खालील महाविद्यालयांच्या बी.व्होक. अभ्यासक्रमांस मान्यता देणेबाबत शिफारस केली आहे. तसेच खालील महाविद्यालयांच्या नवीन प्रमाणपत्र/पदवी प्रस्थापित करण्याकरिता मा. अधिष्ठाता मंडळाकडे शिफारस केली असता, खालीलप्रमाणे ठराव झाला:

ठराव क्र. २२५/२४०६२०२१

असा ठराव करण्यात येतो की, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत बी.व्होक. अभ्यासक्रमांस व नवीन प्रमाणपत्र/पदवी प्रस्थापित करण्यास मान्यता देण्याकरिता मा. विद्यापरिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

B.VOC Courses Started from : 2020 - 2021

Sr. No.	College Name	Course Name
1	Mahatma Gandhi Vidyamandir's Loknete Vyankatrao Hiray Arts, Science & Commerce College, Panchavati, Nashik -3	Certificate Course in Apiculture
2	Rayat Shikshan Sansth's, Annasaheb Awate Arts, Commerce, Hutatma Babu Genu Science College & Sou.Kusumben Kantilal Shah Arts, Commerce, Science Junior College, Manchar, Tal. Ambegoan, Dist. Pune- 410 503	B.Voc. (Food Processing and Quality Management)
3	Pune District Education Association's Annasaheb Waghire Arts, Science & Commerce College, Otur, Tal. Junner, Pune- 412 409.	Certificate Course Dairy Technology & Dairy Management
4	Annasaheb Magar College, Arts, commerce and Science College, Hadapsar, Pune- 411028	• B.Voc. (Food Science and Technology) • Certificate Course in Commercial Mushroom Cultivation)
5	Baburaoji Gholap College, Arts, Science and Commerce College, Sangvi, Pune-411027	B.Voc. (Biomedical Instrumentation)
6	Dr. D.Y. Patil Arts, Commerce & Science College, Sant Tukaram Nagar, Pimpri, Punqe-18	Certificate Course - Instrumental Techniques in Chemistry
7	Indapur Taluka Shikshan Prasark Mandal's, Arts, Science & Commerce College, Indapur, Pune	B.Voc. (Fish Farming Processing and Management)

8	Maratha Vidya Prasarak Samaj's, G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar, Tal. Sinnar, Dist. Nashik- 422 103	B.Voc. (Food Processing and Preservation)
9	Shri Gurudeo Shikshan Prasark Mandal's, Swami Muktanand College of Science, Yeola – 423 401.	Certificate course in Organic Farming
10	Mula Education Society's, Shri Dnyaneshwar Mahavidyalaya, Tal. Newasa, Dist. Ahmednagar	Certificate Course in Agriculture Dairy Management
11	Annasaheb Awate Arts, Commerce,Hutatma Babu Genu Science College & Sou. Kusumben Kantilal Shah Arts, Commerce, Science Junior College, Manchar, Tal. Ambegaon, Dist. Pune- 410 503	B.Voc. (Food Processing & Quality Management)

B.VOC Courses Started from : 2019 – 2020

	College Name	Course Name
1	Maratha Vidya Prasark Samaj, Arts, Science & Commerce College, Saikheda, Dist-Nashik	Certificate Course in Common Laboratory Processes and Instruments Handling

सबब सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेस मान्यतेसाठी सादर)

ठराव

वि.प.क्र. ब १ पीए/१/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत खालील बी.व्होक. अभ्यासक्रमांस मान्यता देण्यात येत आहे.

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१(ध) नुसार खालील बी.व्होक. अभ्यासक्रम नव्याने प्रस्थापित करण्यास मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

B.VOC Courses Started from : 2020 - 2021

Sr. No.	College Name	Course Name
1	Mahatma Gandhi Vidyamandir's Loknete Vyankatrao Hiray Arts, Science & Commerce College, Panchavati, Nashik -3	Certificate Course in Apiculture
2	Rayat Shikshan Sansth's, Annasaheb Awate Arts, Commerce, Hutatma Babu Genu Science College & Sou.Kusumben Kantilal Shah Arts, Commerce, Science Junior College, Manchar, Tal. Ambegoan, Dist. Pune- 410 503	B.Voc. (Food Processing and Quality Management)
3	Pune District Education Association's Annasaheb Waghire Arts, Science & Commerce College, Otur, Tal. Junner, Pune- 412 409.	Certificate Course Dairy Technology & Dairy Management

4	Annasaheb Magar College, Arts, commerce and Science College, Hadapsar, Pune- 411028	B.Voc. (Food Science and Technology) Certificate Course in Commercial Mushroom Cultivation)
5	Baburaoji Gholap College, Arts, Science and Commerce College, Sangvi, Pune-411027	B.Voc. (Biomedical Instrumentation)
6	Dr. D.Y. Patil Arts, Commerce & Science College, Sant Tukaram Nagar, Pimpri, Pune-18	Certificate Course - Instrumental Techniques in Chemistry
7	Indapur Taluka Shikshan Prasark Mandal's, Arts, Science & Commerce College, Indapur, Pune	B.Voc. (Fish Farming Processing and Management)
8	Maratha Vidya Prasarak Samaj's, G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar, Tal. Sinnar, Dist. Nashik- 422 103	B.Voc. (Food Processing and Preservation)
9	Shri Gurudeo Shikshan Prasark Mandal's, Swami Muktanand College of Science, Yeola – 423 401.	Certificate course in Organic Farming
10	Mula Education Society's, Shri Dnyaneshwar Mahavidyalaya, Tal. Newasa, Dist. Ahmednagar	Certificate Course in Agriculture Dairy Management
11	Annasaheb Awate Arts, Commerce,Hutatma Babu Genu Science College & Sou. Kusumben Kantilal Shah Arts, Commerce, Science Junior College, Manchar, Tal. Ambegaon, Dist. Pune- 410 503	B.Voc. (Food Processing & Quality Management)

B.VOC Courses Started from : 2019 – 2020

	College Name	**Course Name**
1	Maratha Vidya Prasark Samaj, Arts, Science & Commerce College, Saikheda, Dist-Nashik	Certificate Course in Common Laboratory Processes and Instruments Handling

ब २ पीए/२/२०२१ विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत B.Sc. Blended (Mode) या पदवीचे नाव बदलून B.Sc. (Blended) असे करण्याबाबत...

(टीप:— विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या बुधवार दि. ९ जून, २०२१ रोजी झालेल्या सभेमधील आयत्या वेळेचा ठराव क्र. ३ नुसार विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत B.Sc. Blended (Mode) या पदवीचे नाव बदलून B.Sc. (Blended) असे करण्यास मा. अधिष्ठाता मंडळाकडे शिफारस केली असता खालीलप्रमाणे ठराव झाला:

ठराव क्र. २२५/२४०६२०२१

असा ठराव करण्यात येतो की, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत B.Sc. (Blended) या पदवी अभ्यासक्रमास, आराखडयास व नवीन पदवी प्रस्थापित करण्यास मा. विद्यापरिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

सबब सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेस मान्यतेसाठी सादर)

ठराव
वि.प.क्र. ब २ पीए/२/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत B.Sc. Blended (Mode) या पदवीचे नाव बदलून B.Sc. (Blended) या नावाची नवीन पदवी प्रस्थापित करण्याची महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१(ध) नुसार मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

ब ३ पीए/३/२०२१ विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत यापूर्वी प्रमाणपत्र अभ्यासक्रम अशी मान्यता दिलेले अभ्यासक्रम बंद करून पदविका अभ्यासक्रम म्हणून प्रस्थापित करण्यास मान्यता देणेबाबत.

(टीप:— विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या बुधवार, दि. ९ जून, २०२१ रोजी झालेल्या सभेमधील आयत्या वेळेचा ठराव क्र. ४ नुसार विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत Electronic Science अभ्यासमंडळाने यापूर्वी मान्यता दिलेल्या 1. PG Diploma in Embedded System Design, 2. PG Diploma in Advanced Computing, 3. Diploma in Computer Hardware and Networking या सर्टिफिकेट कोर्सचे नाव बदलून खालीलप्रमाणे डिप्लोमा कोर्स करण्यास मा. अधिष्ठाता मंडळाकडे शिफारस केली असता खालीलप्रमाणे ठराव झाला:

ठराव क्र. २२६/२४०६२०२१

असा ठराव करण्यात येतो की, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत Electronic Science अभ्यासमंडळाने यापूर्वी मान्यता दिलेले प्रमाणपत्र अभ्यासक्रम बंद करून खालीलप्रमाणे पदविका अभ्यासक्रम प्रस्थापित करण्यास मान्यता देण्याकरिता मा. विद्यापरिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

1. PG Diploma in Embedded System Design
2. PG Diploma in Advanced Computing
3. Diploma in Computer Hardware and Networking

सबब सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेस मान्यतेसाठी सादर)

ठराव

वि.प.क्र. ब ३ पीए/३/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत Electronic Science अभ्यासमंडळाने यापूर्वी मान्यता दिलेले खालील नमूद प्रमाणपत्र अभ्यासक्रम बंद करून त्याऐवजी पदविका व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम प्रस्थापित करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१(ध) नुसार मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

अ.क्र.	जुना अभ्यासक्रम (प्रमाणपत्र)	नवीन अभ्यासक्रम (पदविका)
१.	PG Diploma in Embedded System Design	PG Diploma in Embedded System Design
२.	PG Diploma in Advanced Computing	PG Diploma in Advanced Computing
३.	Diploma in Computer hardware and networking	Diploma in Computer Hardware and Network

ब ४ पीए/४/२०२१: कॉलेज ऑफ इंजिनिअरिग, पुणे या स्वायत्त संस्थेमधील नवीन पदव्युत्तर पदवी नव्याने प्रस्थापित करण्यास व पदव्युत्तर पदवीच्या नावात बदल करण्यास शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून मान्यता देणेबाबत....

(टिपणी : मा. अधिष्ठाता मंडळाच्या दि. २४ जून, २०२१ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सभेतील ठराव क्र. १७०/२४०६२०२१ नुसार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शिवाजीनगर, पुणे या स्वायत्त संस्थेची खाली नमूद केलली पदव्युत्तर पदवी नव्याने प्रस्थापित करण्यास व पदव्युत्तर पदवीच्या नावात बदल करण्यास शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून मान्यता देण्यासाठी मा. विद्यापरिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

Sr. No.	Autonomous Colleges	New Degree
1	COEP , Shivajinagar	1. M.Tech. Transportation Engineering

Sr. No.	Autonomous Colleges	Degree Name	Change Degree Name
1	COEP Shivajinagar	M.Tech. Artificial Intelligence and Robotics	M.Tech. Robotics and Artificial Intelligence

सबब, सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या मान्यतेसाठी सादर.)

ठराव

वि. प. क्र. ब ४ पीए/४/२०२१, दि. १० ऑगस्ट,२०२१

असा ठराव करण्यात येतो की, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शिवाजीनगर, पुणे या स्वायत्त संस्थेची खाली नमूद केलेली पदव्युत्तर पदवी नव्याने प्रस्थापित करण्यास व पदव्युत्तर पदवीच्या नावात बदल करण्यास शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून मान्यता देण्यात येत आहे.

पुढे असा ठराव करण्यात येतो की, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शिवाजीनगर, पुणे या स्वायत्त संस्थेची खाली नमूद केलेली पदव्युत्तर पदवी नव्याने प्रस्थापित करण्यास व पदव्युत्तर पदवीच्या नावात बदल करण्यास महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१(ध) नुसार मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

Sr. No.	Autonomous Colleges	New Degree
1	COEP, Shivajinagar	1. M.Tech. Transportation Engineering

Sr. No.	Autonomous Colleges	Degree Name	Change Degree Name
1	COEP Shivajinagar	M.Tech. Artificial Intelligence and Robotics	M.Tech. Robotics and Artificial Intelligence

ब ५ पीए/५/२०२१ : **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत अभियांत्रिकीमध्ये B.E (Computer Science and Design) या नवीन पदवीच्या आराखडयास व अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून मान्यता देणेबाबत....**

(टिपणी : मा. अधिष्ठाता मंडळाच्या दि. २४ जून, २०२१ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सभेतील ठराव क्र. १७१/२४०६२०२१ नुसार B.E. (Computer Science and Design) ही नवीन पदवी प्रस्थापित करण्यास मा. विद्यापरिषदेस शिफारस करण्यात आली आहे.

सबब, सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या मान्यतेसाठी सादर.)

ठराव

वि. प. क्र. ब ५ पीए/५/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत अभियांत्रिकीमध्ये B.E (Computer Science and Design) या नवीन पदवीच्या आराखडयास व अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून मान्यता देण्यात येत आहे.

पुढे असा ठराव करण्यात येतो की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत अभियांत्रिकीमध्ये B.E (Computer Science and Design) ही पदवी शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून नव्याने प्रस्थापित करण्यास महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१(ध) नुसार मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, संबंधित परिनियमामध्ये योग्य ती दुरूस्ती करण्याची मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

ब ६ पीए/६/२०२१ : The Mechanized Infantry Regimental Centre, Ahmednagar या संस्थेच्या खालील पदविका अभ्यासक्रमांना मान्यता देणेबाबत....

(टीप:— मा. विद्यापरिषदेच्या दि. १ एप्रिल, २०२१ रोजी झालेल्या ठराव क्र. वि.प्र.क्र.ब १६/पीए/१६/२०२१ नुसार खालील प्रमाणपत्र/पदविका अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आली होती. परंतु अध्यक्ष, डिफेन्स रिलेटेड टेक्नॉलाजी यांनी सदर सेंटरच्या पदविका अभ्यासक्रमांना AICTE ची मान्यता असल्यामुळे प्रमाणपत्र अभ्यासक्रमांऐवजी पदविका अभ्यासक्रमांना मान्यता देण्यास शिफारस केली आहे.

1. DIPLOMA IN COMBAT ARMAMENT AND WEAPON TECHNOLOGY
2. DIPLOMA IN COMBAT DRIVING AND MAINTENANCE TECHNOLOGY
3. CERTIFICATE IN COMBAT RADIO AND COMMUNICATION TECHNOLOGY
4. CERTIFICATE IN COMBAT RADAR TECHNOLOGY

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या बुधवार, दि. ९ जून, २०२१ रोजी झालेल्या सभेमधील ठराव क्र. ८ नुसार सदर अभ्यासक्रमास AICTE च्या नियमानुसार प्रमाणपत्र अभ्यासक्रमांऐवजी पदविका अभ्यासक्रम अशी मान्यता मिळणेबाबत मा. अधिष्ठाता मंडळाकडे शिफारस केली आहे.

मा. अधिष्ठाता मंडळाच्या सोमवार, दि. २४ जून, २०२१ रोजी झालेल्या सभेमध्ये प्रस्ताव क्र. प्र—अमं/१६९/२४०६२०२१ अन्वये खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.

ठराव क्र. १६९/२४०६२०२१

The Mechanized Infantry Regimental Centre, Ahmednagar या संस्थेकरिता खालील अभ्यासक्रमांस तसेच नवीन पदविका प्रस्थापित करणेबाबत मा. विद्यापरिषदेकडे शिफारस करण्यात येत आहे.

1. DIPLOMA IN COMBAT ARMAMENT AND WEAPON TECHNOLOGY
2. DIPLOMA IN COMBAT DRIVING AND MAINTENANCE TECHNOLOGY
3. DIPLOMA IN COMBAT RADIO AND COMMUNICATION TECHNOLOGY
4. DIPLOMA IN COMBAT RADAR TECHNOLOGY

ठराव

वि.प.क्र. ब ६ पीए/६/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, The Mechanized Infantry Regimental Centre, Ahmednagar या संस्थेच्या खालील पदविका अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात येत आहे.

1. DIPLOMA IN COMBAT RADIO AND COMMUNICATION TECHNOLOGY
2. DIPLOMA IN COMBAT RADAR TECHNOLOGY

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, वरील पदविका प्रस्थापित करण्यास महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१(ध) नुसार मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

ब ७ पीए/७/२०२१ **विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत B.Sc. (Information Technology) पदवी नव्याने प्रस्थापित करणेबाबत....**

(टीप:— विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या बुधवार दि. ९ जून २०२१ रोजी झालेल्या सभेमधील ठराव क्र. ५ नुसार विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत B.Sc. (Information Technology) या पदवीला नव्याने प्रस्थापित करण्यास्तव मान्यता देण्यास मा. अधिष्ठाता मंडळाकडे शिफारस केली असता खालीलप्रमाणे ठराव झाला:

ठराव क्र. २२७/२४०६२०२१

असा ठराव करण्यात येतो की, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत B.Sc. (Information Technology) ही नवीन पदवी प्रस्थापित करण्यास्तव मान्यता देण्यास मा. विद्यापरिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

सबब सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेस मान्यतेसाठी सादर)

ठराव

वि.प.क्र. ब ७ पीए/७/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत B.Sc. (Information Technology) ही पदवी नव्याने प्रस्थापित करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१(ध) नुसार मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, संबंधित परिनियमामध्ये योग्य ती दुरूस्ती करण्याची मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

ब ८ पीए/८/२०२१ **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील IDS (Science) विभागाकरिता विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत T.Y.B.Sc. (Blended) Environmental Science या सुधारित अभ्यासक्रमांस मान्यतेबाबत....**

(टीप:— B.Sc. Blended अभ्यासमंडळाच्या दि. ८ मार्च, २०२१ रोजीच्या सभेमधील ठराव क्र. २ नुसार विद्यापीठातील IDS (Science) विभागाकरिता विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत T.Y.B.Sc. (Blended) Environmental Science या सुधारित अभ्यासक्रमांस मान्यता देणेबाबत तदर्थ अभ्यासमंडळाच्या अध्यक्षांनी विनंती केली आहे.

डॉ. एम. जी. चासकर, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा यांनी सदर ठरावास मा. विद्यापरिषदेस मान्यतेस्तव शिफारस केली आहे.

सबब सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेस मान्यतेसाठी सादर)

ठराव

वि.प.क्र. ब ८ पीए/८/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील IDS (Science) विभागाकरिता विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत T.Y.B.Sc. (Blended) Environmental Science या सुधारित अभ्यासक्रमांस शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून मान्यता देण्यात येत आहे.

ब ९ पीए/९/२०२१ एच.पी.टी.आर्टस ॲण्ड आर.वाय.के. सायन्स कॉलेज, नाशिक येथील हिंदी विभागात 'संगणक और हिंदी' प्रमाणपत्र हा नवीन अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून सुरू करण्यास मान्यता देणेबाबत....

(टिप: मानवविज्ञान विद्याशाखेच्या दि. ३.६.२०२१ रोजी झालेल्या सभेमध्ये एच.पी.टी. आर्टस ॲड आर.वाय.के. सायन्स कॉलेज, नाशिक येथील हिंदी विभागामध्ये 'संगणक और हिंदी' हा (२ श्रेयांकाचा) नवीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात आली असून मा. अधिष्ठाता मंडळास शिफारस केली होती.

मा. अधिष्ठाता मंडळाच्या दि. २४ जून, २०२१ रोजी झालेल्या सभेमधील ठराव क्र. म: १८३/२४०६२०२१ अन्वये 'संगणक और हिंदी' हा नवीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करणेबाबत मा. विद्यापरिषदेस शिफारस केली आहे.

ठराव क्र. म: १८३/ २४०६२०२१

असा ठराव करण्यात येतो की, एच.पी.टी.आर्टस ॲण्ड आर.वाय. के. सायन्स कॉलेज, नाशिक येथे हिंदी विभागात 'संगणक और हिंदी' हा नवीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करणेबाबत मा. विद्यापरिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

सबब, सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या मान्यतेसाठी सादर)

ठराव

वि. प. क्र. ब. ९ पीए/९/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, एच.पी.टी.आर्टस ॲण्ड आर.वाय. के. सायन्स कॉलेज, नाशिक येथील हिंदी विभागात 'संगणक और हिंदी' हा (२ श्रेयांकाचा) नवीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, वरील अभ्यासक्रम नव्याने प्रस्थापित करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१(ध) नुसार मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

ब १०पीए/१०/२०२१ मानवविज्ञान विद्याशाखेंतर्गत मराठी विषयाच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून सुरू करण्यास मान्यता देणेबाबत..

टिप: मानवविज्ञान विद्याशाखेच्या दि. ३.६.२०२१ रोजी झालेल्या सभेमध्ये मराठी विषयाच्या खालील प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून सुरू करण्यास मान्यतेस्तव मा. अधिष्ठाता मंडळास शिफारस केली होती.

संकेतांक	विषयाचे नाव	श्रेयांक
०१	संगणक आणि मराठी	०२
०२	मराठी मुद्रितशोधन आणि संपादन	०२
०३	प्रसारमाध्यमांसाठी मराठी लेखन कौशल्य	०२
०४	प्रसारमाध्यमांसाठी मराठी	०२
०५	मराठी संभाषण कौशल्य	०२
०६	सर्जनशील मराठी लेखन	०२
०७	जहिरात मराठी मसुदा लेखन	०२
०८	नवसमाजमाध्यमासाठी मराठी लेखन कौशल्ये	०२
०९	चित्रपट—माध्यम —चित्रदृश्य कला	०२
१०	नाटक—आस्वाद आणि परीक्षण लेखन	०२
११	चित्रपट—मालिका पटकथा लेखन	०२
१२	चित्रपट—आस्वाद आणि परीक्षण	०२

मा. अधिष्ठाता मंडळाच्या दि. २४ जून, २०२१ रोजी झालेल्या सभेमधील प्रस्ताव क्र. प्र—अमं/१८४/२४०६२०२१ अन्वये वरील अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यासाठी मा. विद्यापरिषदेस शिफारस करण्यात आली आहे.

ठराव क्र. म: १८४/ २४०६२०२१

असा ठराव करण्यात येतो की, मराठी अभ्यासमंडळाने मराठी विषयाच्या खालील प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून सुरू करण्यास मान्यता देण्यासाठी मा. विद्यापरिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

सबब, सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या मान्यतेसाठी सादर)

ठराव

वि. प. क्र. ब. १० पीए/१०/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मानवविज्ञान विद्याशाखेंतर्गत मराठी विषयाच्या खालील प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

पुढे असा ठराव करण्यात येतो की, वरील अभ्यासक्रम नव्याने प्रस्थापित करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१(ध) नुसार मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

संकेतांक	विषयाचे नाव	श्रेयांक
०१	संगणक आणि मराठी	०२
०२	मराठी मुद्रितशोधन आणि संपादन	०२
०३	प्रसारमाध्यमांसाठी मराठी लेखन कौशल्य	०२
०४	प्रसारमाध्यमांसाठी मराठी	०२
०५	मराठी संभाषण कौशल्य	०२
०६	सर्जनशील मराठी लेखन	०२
०७	जहिरात मराठी मसुदा लेखन	०२
०८	नवसमाजमाध्यमासाठी मराठी लेखन कौशल्ये	०२
०९	चित्रपट—माध्यम —चित्रदृश्य कला	०२
१०	नाटक—आस्वाद आणि परीक्षण लेखन	०२
११	चित्रपट—मालिका पटकथा लेखन	०२
१२	चित्रपट—आस्वाद आणि परीक्षण	०२

ब ११ पीए/११/२०२१ **विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत S.Y.B.Sc. (Cyber and Digital Science) या सुधारित अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून मान्यता देणेबाबत....**

(टीप:— Computer Science अभ्यासमंडळाच्या दि. २१ जून, २०२१ रोजीच्या सभेत S.Y.B.Sc. (Cyber and Digital Science) या सुधारित अभ्यासक्रमाच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली आहे.

डॉ. एम. जी. चासकर, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा यांनी दि. २२ जुलै, २०२१ रोजी सदर ठरावास मा. विद्यापरिषदेस मान्यतेस्तव शिफारस केली आहे.

सबब सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेस मान्यतेसाठी सादर)

ठराव

वि.प.क्र. ब ११ पीए/११/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत S.Y.B.Sc. (Cyber and Digital Science) या सुधारित अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून मान्यता देण्यात येत आहे.

ब १२ पीए/१२/२०२१ वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेंतर्गत इंडसर्च, पुणे या स्वायत्त व्यवस्थापन परिसंस्थेमध्ये नवीन पदवी आणि पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम प्रस्थापित करण्यास मान्यता देणेबाबत...

(टिप : वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेंतर्गत इंडसर्च, पुणे (Indian Institute of Cost and Management Studies & Research, Pune) स्वायत्त व्यवस्थापन परिसंस्थेमध्ये अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून प्रस्तावित केले आहेत.

1) Post Graduate Diploma in Business Management (PGDBM) (Trimester) तीन सत्रांचा नवीन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम
2) Bachelor of Management Studies (E-Commerce & Supply Chain Management)
3) Bachelor of Management Studies (Computer Application & Business Analytics)

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या दि. ८ जून, २०२१ रोजी झालेल्या सभेमधील आयत्यावेळचा ठराव क्र. ४ अन्वये मा. अधिष्ठाता मंडळास शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून मा. विद्यापरिषदेच्या मान्यतेस्तव शिफारस केली आहे.

मा. अधिष्ठाता मंडळाच्या दि. २२ जुलै, २०२१ रोजी झालेल्या सभेमधील खालील ठरावान्वये मा. विद्यापरिषदेस मान्यतेची शिफारस केली आहे.

ठराव क्र २६५/२२०७२०२१

असा ठराव करण्यात येतो की, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेंतर्गत खालील अभ्यासक्रम प्रस्थापित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

1) PGDBM (Trimester)

2) Bachelor of Management Studies (E-Commerce & Supply Chain Management)

3) Bachelor of Management Studies (Computer Application & Business Analytics)

सबब, सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या मान्यतेसाठी सादर)

ठराव

वि. प. क्र. ब १२ पीए/१२/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेंतर्गत 1) Post Graduate Diploma in Business Management (PGDBM) (Trimester) तीन सत्रांचा नवीन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम, 2) Bachelor of Management Studies (E-Commerce & Supply Chain Management) आणि 3) Bachelor of Management Studies (Computer Application & Business Analytics) या नवीन पदव्युत्तर पदविका/पदवी प्रस्थापित करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१ (ध) नुसार मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

ब १३ पीए/१३/२०२१ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार MOOC (SWAYAM) ऑनलाईन अभ्यासक्रमांची मर्यादा ४० टक्क्यांपर्यत वाढविण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालामधील शिफारशींना मान्यता देण्याबाबत.

(टिप: विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी पत्र क्र D.O.F.No.1-11/2020(SWAYAM) दि. २६ मार्च, २०२१ अन्वये निर्गमित केलेले पत्र दि. १ एप्रिल, २०२१ रोजी झालेल्या मा. विद्यापरिषदेच्या सभेमध्ये सादर करण्यात आले. सभेत झालेल्या चर्चेनुसार MOOC (SWAYAM) ऑनलाईन अभ्यासक्रम विद्यापीठातील विभागांना आणि महाविद्यालयांना लागू करण्याबाबत ठराव क्र. ब ४० पीए/४०/२०२१ अन्वये डॉ. संजीव सोनवणे, मा. अधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली. सदर समितीच्या अहवालामधील शिफारशी मा. विद्यापरिषदेच्या विचारार्थ सादर)

सबब, सदर अहवाल मा. विद्यापरिषदेस विचारार्थ सादर)

ठराव

वि. प. क्र. ब १३ पीए/१३/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार MOOC (SWAYAM) ऑनलाईन अभ्यासक्रम विद्यापीठातील विभागांना आणि महाविद्यालयांना लागू करण्याबाबत नियुक्त समितीच्या अहवालातील शिफारशींना मान्यता देण्यात येत आहे.

ब १४ पीए/१४/२०२० सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संस्कृत आणि प्राकृत विभागातील सुधारित पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून मान्यता देण्याबाबत.....

(टीप : मानवविज्ञान विद्याशाखेच्या दि. ३ ऑगस्ट, २०२१ रोजी झालेल्या सभेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संस्कृत आणि प्राकृत विभागातील सुधारित पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात येवून मा. विद्यापरिषदेस मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली आहे.

1. Certificate Course in Sanskrit
2. Diploma Course in Sanskrit
3. Advanced Diploma in Sanskrit

सबब सदरचा प्रस्ताव विद्यापरिषदेच्या विचारार्थ सादर)

ठराव

वि. प. क्र. ब १४ पीए/१४/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संस्कृत आणि प्राकृत विभागातील खालील सुधारित पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून मान्यता देण्यात येत आहे.

1. Certificate Course in Sanskrit
2. Diploma Course in Sanskrit
3. Advanced Diploma in Sanskrit

ब १५ पीए/१५/२०२० **मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत 'पाली वाङमय व संस्कृती' या तदर्थ अभ्यासमंडळाच्या नावात बदल करून 'पाली व बौद्ध अध्ययन' तदर्थ अभ्यासमंडळ असे करण्यास मान्यता देण्याबाबत.....**

(टीप: मानवविज्ञान विद्याशाखेच्या दि. ३ ऑगस्ट, २०२१ रोजी झालेल्या सभेमध्ये मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत 'पाली वाङमय व संस्कृती' या तदर्थ अभ्यासमंडळाच्या नावात बदल करून 'पाली व बौद्ध अध्ययन' तदर्थ अभ्यासमंडळ असे करण्यासाठी मा. विद्यापरिषदेस मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली आहे.

(सबब सदरचा प्रस्ताव विद्यापरिषदेच्या विचारार्थ सादर)

ठराव

वि. प. क्र. ब १५पीए/१५/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत 'पाली वाङमय व संस्कृती' या तदर्थ अभ्यासमंडळाच्या नावात बदल करून 'पाली व बौद्ध अध्ययन' तदर्थ अभ्यासमंडळ असा बदल करण्यास शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून मान्यता देण्यात येत आहे.

ब १६ पीए/१६/२०२१ मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत दोन क्रेडिटचे खालील इलेक्टीव अभ्यासक्रम पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांना लागू करण्यास मान्यता देणेबाबत.

(टीप:— मानवविज्ञान विद्याशाखेच्या दि. ३ ऑगस्ट, २०२१ रोजी झालेल्या सभेमध्ये प्रौढ शिक्षण तद्‌र्थ अभ्यासमंडळाने तयार केलेले दोन क्रेडिटचे इलेक्टीव अभ्यासक्रम पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांना लागू करण्यास मान्यता देण्यासाठी मा. अधिष्ठाता मंडळाकडे शिफारस केलेली आहे.

१. आर्थिक साक्षरता (Financial Literacy)
२. ग्रामीण समुदाय विकास (Rural Community Development)
३. सायबर सुरक्षितता (Cyber Security)
४. संगणकीय अध्ययन (Online Teaching)

मा. प्र—कुलगुरू यांनी मा. अधिष्ठाता मंडळाच्यावतीने उपरोक्त अभ्यासक्रमास मान्यता दिलेली असून मा. विद्यापरिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या मान्यतेसाठी सादर.)

ठराव

वि.प.क्र. ब १६ पीए/१६/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत दोन क्रेडिटचे खालील इलेक्टीव अभ्यासक्रम पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांना लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. आर्थिक साक्षरता (Financial Literacy)
२. ग्रामीण समुदाय विकास (Rural Community Development)
३. सायबर सुरक्षितता (Cyber Security)
४. संगणकीय अध्ययन (Online Teaching)

ब १७ पीए/१७/२०२१ मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत NCC as Elective Credit Course (24 Credit) ऐच्छिक अभ्यासक्रम सर्व विद्याशाखांना लागू करण्यास मान्यता देणेबाबत.

(टीप:— मानवविज्ञान विद्याशाखेच्या दि. ३ ऑगस्ट, २०२१ रोजी झालेल्या सभेमध्ये एन.सी.सी. तदर्थ अभ्यासमंडळाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषानुसार तयार केलेला NCC as Elective Credit Course (24 Credit) ऐच्छिक भ्यासक्रम सर्व विद्याशाखांना लागू करण्यास मान्यता देण्यासाठी मा. अधिष्ठाता मंडळाकडे शिफारस केलेली आहे.

मा. प्र—कुलगुरू यांनी मा. अधिष्ठाता मंडळाच्यावतीने सदर अभ्यासक्रमास मान्यता दिलेली असून मा. विद्यापरिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या मान्यतेसाठी सादर.)

ठराव

वि.प.क्र. ब १७ पीए/१७/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत NCC as Elective Credit Course (24 Credit) हा अभ्यासक्रम सर्व विद्याशाखांना शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून ऐच्छिक विषय म्हणून लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

ब १८ पीए/१८/२०२१ शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ मध्ये तयार केलेला पीएच.डी कोर्स वर्क इन इतिहास हा अभ्यासक्रम २० क्रेडिटऐवजी १६ क्रेडिट अशी दुरूस्ती करण्यास मान्यता देणेबाबत.

(टिप: मा. प्राचार्य, इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव यांचे संदर्भ पत्र क्र IMV/2021/34, दि. २१ जून, २०२१ अन्वये मानवविज्ञान विद्याशाखेतील तृतीय वर्ष कला अभ्यासक्रमातील वाणिज्य या विषयाच्या सुधारित अभ्यासक्रमास मान्यता मिळावी अशी विनंती केलेली आहे.

सदर अभ्यासक्रमास डॉ. यशोधन मिठारे, प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, यांनी शिफारस केली आहे. सदर अभ्यासक्रमास मा. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा यांनी मा. विद्याशाखेच्यावतीने मान्यता दिलेली असून मा. विद्यापरिषदेस शिफारस केलेली आहे.

सदर सुधारित अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून लागू करावयाचा असल्याने तसेच नजिकच्या काळात मा. विद्यापरिषदेची सभा नियोजित नसल्याने मा. कुलगुरु यांनी मा. विद्यापरिषदेच्यावतीने टिपणी क्र. **व्हीसी/२४५५, दि. १० जुलै, २०२१** अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार संबंधितांना परिपत्रक क्र. १८९/२०२१, दि.१३ जुलै, २०२१ नुसार कळविण्यात आले आहे.

सबब सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेस माहितीसाठी सादर.)

ठराव

वि.प.क्र. क १२ पीए/१२/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मा. कुलगुरू यांनी मा. विद्यापरिषदेच्यावतीने घेतलेल्या निर्णयाची मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे.

क १३ पीए/१३/२०२१ **वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि संचेती हेल्थकेअर ॲकेडमी, पुणे यांच्या झालेल्या सामंजस्य करारांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून खालील पदवी व प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता मिळण्याबाबत ....**

(टिप: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि संचेती हेल्थकेअर ॲकेडमी, पुणे यांच्या झालेल्या सामंजस्य करारांतर्गत वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेंतर्गत 1) Certificate Course in Health Insurance Services (6 Months), 2) Certificate Course in Quality Management in Healthcare & Hospital Services (6 Months), 3) B.B.A. (Hospital Administration & Healthcare Services) या नवीन अभ्यासक्रमांना वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या दि. ८ जून, २०२१ रोजी झालेल्या सभेमधील ठराव क्र. ६ अन्वये मा. अधिष्ठाता मंडळास मान्यतेस्तव शिफारस केली. मा. अधिष्ठाता मंडळाच्या दि. २४ जून, २०२१ रोजी झालेल्या सभेत ठराव क्र. १८५/ २४०६२०२१ अन्वये मा. विद्यापरिषदेस शिफारस करण्यात आली.

सदर प्रमाणपत्र व पदवी अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून सुरू करावयाचा असल्याने आणि उपरोक्त प्रमाणपत्र व पदवी अभ्यासक्रम नव्याने प्रस्थापित करावयाचे असल्याने मा. कुलगुरू यांना टिपणी सादर केली असता मा. कुलगुरु यांनी टिपणी क्र. व्हीसी/ २५८८, दि. २२ जुलै, २०२१ अन्वये मा. विद्यापरिषदेच्यावतीने मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली आहे.

सबब सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेस माहितीसाठी सादर.)

ठराव

वि.प.क्र. क १३ पीए/१३/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मा. कुलगुरू यांनी मा. विद्यापरिषदेच्यावतीने घेतलेल्या निर्णयाची मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे.

क १४ पीए/१४/२०२१ विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत बी.व्होक. अभ्यासक्रमांस (B.Voc. Course) मान्यतेबाबत मा. कुलगुरू यांनी केलेली कार्यवाही...

(टिपणी : — विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी *NSQF* या योजनेंतर्गत बी. व्होक. *(B.Voc.)* अभ्यासक्रमांस मंजूरी दिली आहे. अशा विज्ञान महाविद्यालयांमार्फत मान्यतेस्तव सादर केलेल्या बी.व्होक. अभ्यासक्रमांना मान्यता देण्यासाठी Science B.Voc. या तदर्थ अभ्यासमंडळाच्या दि. १९ मार्च, २०२१ रोजी झालेल्या सभेतील ठरावानुसार सोबत जोडलेल्या बी.व्होक. अभ्यासक्रमांस विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत मान्यतेस्तव विनंती केली आहे.

सबब उपरोक्त विषयास अनुसरून निर्णय घेण्यासाठी मा. कुलगुरू यांना टिपणी सादर केली असता टिपणी क्र. व्ही.सी. २६०५, दि. १२/०७/२०२१ नुसार मान्यता देण्यात आली. त्यानुसार संबंधितांना परिपत्रक क्र. १९७/२०२१, दि. २६/०७/२०२१ नुसार कळविण्यात आले आहे.

सबब सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेस माहितीसाठी सादर.)

ठराव

वि.प.क्र. क १४ पीए/१४/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मा. कुलगुरू यांनी मा. विद्यापरिषदेच्यावतीने घेतलेल्या निर्णयाची मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे.

क १५ पीए/१५/२०२१ कला, वाणिज्य, विज्ञान, ललित कला व हस्तकला, मानस नीती व समाज विज्ञान, प्रयोगजिवी कला इ. अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या/ परिसंस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० आणि २०२०—२०२१ साठी संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्याच्या परवानगीबाबत.....

(टिप : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा दिनांक १ मार्च, २०१७ पासून अंमलात आला असून सदरहू अधिनियमाचे कलम ३३ (ढ) तसेच कलम ११४ मधील तरतूदींनुसार महाविद्यालयांची/परिसंस्थांची संलग्नता/ मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्यास परवानगी देण्याचे अधिकार हे 'मा. विद्या परिषदेस' आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ११० आणि ११४ मधील तरतूदींनुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या मा. विद्या परिषदेने ठराव क्र. वि. प. क्र. अ २१ पीए/२१/१७, दिनांक १३ जुलै, २०१७ आणि ठराव क्र. वि. प. क्र. अ २४ पीए/२४/२०१७, दिनांक १३ जुलै, २०१७ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१७—२०१८ पासून विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गतच्या कला, वाणिज्य, विज्ञान, ललित कला व हस्तकला, मानस नीती व समाज विज्ञान, प्रयोगजिवी कला इ. अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांस/परिसंस्थांस त्यांनी सादर केलेल्या स्वयं मूल्यमापन अहवालांच्या (Self Appraisal Report) तज्ज्ञ समितीकडून करण्यात आलेल्या छाननी व कागदपत्रांच्या प्रत्यक्ष तपासणीस अनुसरून दोन शैक्षणिक वर्षांसाठी संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्यास, संबंधित अटी व शर्तींची पूर्तता संबंधित संलग्नीकरणाचे पत्र निर्गमित केलेल्या दिनांकापासून सहा महिन्यात पूर्ण करण्याच्या (लागू असल्यास) परवानगी देण्यात येते.

विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गतच्या उपरोक्त अभ्यासक्रमांच्या संलग्नित महाविद्यालयांनी/ मान्यताप्राप्त परिसंस्थांनी शैक्षणिक विभागाच्या पत्र संदर्भ क्र. सीए/१८१८, दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ ला अनुसरून, शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० आणि २०२०—२०२१ साठी संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवणेकामी स्वयं मूल्यमापन अहवाल अनुषंगिक कागदपत्रांसह सादर केले आहेत.

मा. विद्या परिषदेच्या उपरोक्त ठराव क्र. वि. प. क्र. अ १७ पीए/१७/२०२० अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मा. कुलगुरू यांनी प्रस्तुत विभागाच्या टिपणी क्र. सीए/४४, दिनांक ५ जून, २०२० अन्वये उपरोक्त स्वयं मूल्यमापन अहवालांच्या छाननी व कागदपत्रांच्या तपासणीसाठी गठीत केलेल्या जिल्हानिहाय तज्ज्ञ समित्यांनी 'कोविड—१९ (कोरोना)' या विषाणूच्या प्रादुर्भाव व संसर्गाने उद्भवलेल्या परिस्थितीमुळे दिनांक २५ जून, २०२१ ते दिनांक ७ जुलै, २०२१ या कालावधीत उपरोक्त स्वयं मूल्यमापन अहवालांची छाननी व त्यासोबतच्या कागदपत्रांची तपासणी करून महाविद्यालय/परिसंस्थानिहाय अहवाल सादर केले आहेत.

प्रस्तुत विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गतच्या संबंधित महाविद्यालयांची/परिसंस्थांची शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० आणि २०२०—२०२१ साठी संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्यास परवानगी देणेकामी उपरोक्त स्वयं मूल्यमापन अहवालांवर नमूद केलेल्या अटी व शर्तींचा संक्षिप्त तपशील पुढीलप्रमाणे :

1. Qualified approved regular Principal/Director/Physical Director/Librarian should be appointed or procedure for the same should be initiate.

2. NAAC accreditation/re- accreditation should be done or procedure for the same should be initiate.

3. Appointment of Teaching and Non-Teaching staff for Granted and Non-Granted Course should be done as per relevant rules and regulations or procedure for the same should be initiate.

4. College Development Committee should be appointed and minimum meetings of the said committee must be organized.

शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० आणि २०२०—२०२१ साठी संलग्नता/मान्यता/ नैसर्गिक वाढ चालू ठेवण्याच्या परवानगी पत्रासंदर्भात संबंधित महाविद्यालयांकडून/ परिसंस्थांकडून वारंवार विचारणा होत असल्याने व नजीकच्या काळात मा. विद्यापरिषदेची सभा होणार नसल्याने उद्‌भवलेल्या तातडीच्या परिस्थितीमुळे मा. कुलगुरू यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) मधील तरतूदींनुसार प्रस्तुत विभागाच्या टिपणी क्र. सीए/१२६, दिनांक १९ जुलै, २०२१ अन्वये मा. विद्या परिषदेच्या वतीने पुढील बाबींस मान्यता दिलेली आहे.

१) कला, वाणिज्य, विज्ञान, ललित कला व हस्तकला, मानस नीती व समाज विज्ञान, प्रयोगजिवी कला इ. अभ्यासक्रमांच्या संबंधित संलग्नित महाविद्यालयांची/ मान्यताप्राप्त परिसंस्थांची शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० आणि २०२०—२०२१ साठीची संलग्नता/ मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्यासंदर्भात उपरोक्त तज्ज्ञ समित्यांनी सादर केलेले अहवाल स्वीकारणे.

२) ज्या संलग्नित महाविद्यालयांची/मान्यताप्राप्त परिसंस्थांची शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० आणि २०२०—२०२१ साठीची संलग्नता/ मान्यता /नैसर्गिक वाढ चालू ठेवण्यास तज्ज्ञ समित्यांनी विनाअट शिफारस केलेली आहे, त्या संलग्नित महाविद्यालयांची/ मान्यताप्राप्त परिसंस्थांची उपरोक्त शैक्षणिक वर्षांची संलग्नता/ मान्यता /नैसर्गिक वाढ चालू ठेवण्यास परवानगी देणे.

३) 'कोविड—१९ (कोरोना)' या विषाणूच्या प्रादुर्भाव व संसंर्गाने उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे तसेच शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ आणि २०२२—२०२३ ची संबंधित संलग्नित महाविद्यालयांची/

मान्यताप्राप्त परिसंस्थांची संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्यासंदर्भातील प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करणे आवश्यक असल्याने उपरोक्त स्वयं मूल्यमापन अहवालावर तज्ज्ञ समित्यांनी नमूद केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता दिनांक १४ ऑगस्ट, २०२१ पर्यंत करण्याच्या अटीवर संबंधित संलग्नित महाविद्यालयांची/मान्यताप्राप्त परिसंस्थांची शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० आणि २०२०—२०२१ साठीची संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्यास परवानगी देणे.

४) संबंधित संलग्नित महाविद्यालयांकडून/मान्यताप्राप्त परिसंस्थांकडून शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० आणि २०२०—२०२१ साठीच्या संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्याच्या अटी व शर्तींच्या पूर्ततेसंदर्भात सादर करण्यात येणाऱ्या अहवालांची उपरोक्त तज्ज्ञ समितीकडून तपासणी करून घेणे.

मा. कुलगुरू यांनी उपरोक्त टिपणीन्वये मा. विद्या परिषदेच्यावतीने वरीलप्रमाणे दिलेल्या मान्यतेनुसार संबंधित संलग्नित महाविद्यालयांची/मान्यताप्राप्त परिसंस्थांची शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० आणि २०२०—२०२१ साठीची संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्याच्या परवानगीबाबत कळविण्यात येत आहे.

सबब, मा. कुलगुरू यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२ (७) मधील तरतूदींनुसार मा. विद्या परिषदेच्यावतीने उपरोक्त अभ्यासक्रमांच्या संबंधित संलग्नित महाविद्यालयांची/मान्यताप्राप्त परिसंस्थांची शैक्षणिक वर्ष २०१९— २०२० आणि २०२०—२०२१ साठीची संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्याबाबत वरीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयासंदर्भात सदरचा प्रस्ताव मा. विद्या परिषदेस माहितीसाठी सादर.)

ठराव

वि. प. क्र. क १५ पीए/१५/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, कला, वाणिज्य, विज्ञान, ललित कला व हस्तकला, मानस नीती व समाज विज्ञान, प्रयोगजिवी कला इ. अभ्यासक्रमांच्या प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांच्या/मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० आणि २०२०—२०२१ साठीची संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्याच्या परवानगीबाबत मा. कुलगुरू यांनी विद्या परिषदेच्यावतीने वरीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयाची मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे.

पुढे असाही ठराव करण्यात येतो की, 'कोविड—१९ (कोरोना)' या विषाणूच्या प्रादुर्भाव व संसर्गाने उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० आणि २०२०—२०२१ साठीची संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्याच्या स्वयं मूल्यमापन अहवालावर तज्ज्ञ समित्यांनी नमूद केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता पत्र निर्गमित झाल्यापासून १५ दिवसात करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

क १६ पीए/१६/२०२१ शैक्षणिक वर्ष २०२२—२०२३ साठीच्या प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्वसमावेशक सम्यक योजना आणि उच्च शिक्षणाची महाविद्यालये, परिसंस्था यांच्या ठिकाणाबाबतच्या वार्षिक योजनासंदर्भात मा. कुलगुरू यांनी मा. विद्या परिषदेच्यावतीने मा. अधिसभेस केलेल्या शिफारशींबाबत.....

(टिप : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०७ (५) आणि कलम ३७ (झ) नुसार तसेच शासनाने व प्रस्तुत विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेश, निर्णय, मार्गदर्शक तत्व इ. नुसार आणि नियुक्त केलेल्या विविध समितींच्या शिफारसींनुसार तसेच विद्यापीठ अधिकार मंडळांनी वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार विहित प्रक्रियेद्वारे महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाने (माहेडने) प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० ते शैक्षणिक वर्ष २०२३—२०२४ या पंचवार्षिक सम्यक योजनेस/बृहत आराखड्यास मंजूरी दिलेली असून त्यासंदर्भातील उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन पत्र बृआमा—२०१८/प्र.क्र. २८१/विशि—३, दिनांक १७.०९.२०१८ व दिनांक २८.०९.२०१८ ची प्रत आणि सदरहू पंचवार्षिक सम्यक योजनेची/बृहत आराखड्याची प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०७ (५) नुसार एक वर्षाची सर्वसमावेशक सम्यक/वार्षिक योजना तयार करणे आवश्यक आहे. उक्त अधिनियमातील कलम ३७ (झ) नुसार मा. अधिष्ठाता मंडळाने महाविद्यालये व उच्च शिक्षण परिसंस्था यांच्या ठिकाणासाठी सम्यक योजनेशी अनुरूप तयार केलेली वार्षिक योजना उक्त अधिनियमातील कलम ३१ (म), कलम ३३ (१) (त) व ३३ (१) (थ) आणि कलम २९ (ज) मधील तरतूदींनुसार अनुक्रमे 'मा. व्यवस्थापन परिषद', 'मा. विद्या परिषद' आणि 'मा. अधिसभा' या विद्यापीठ अधिकार मंडळाच्या मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे.

'कोविड—१९ (कोरोना)' या विषाणूच्या संसर्ग व प्रार्दुभावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपरोक्त तरतूदींनुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२२—२०२३ च्या सर्व समावेशक वार्षिक/सम्यक योजना/बृहत आराखड्यासंदर्भात प्रक्रिया सुरू असताना कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ४०० ०३२ यांचे पत्र क्र. मान्यता २०२१/०१/२१/मशि—४, दिनांक १२ जुलै, २०२१ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ मध्ये नवीन महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भातील इरादापत्र नामंजूर करण्यात आलेल्या संस्थांची व संबंधित इरादापत्र नामंजूरीच्या त्रुटींचा व कारणांचा तपशील कळविण्यात आलेला आहे. त्याप्रमाणेच, प्रस्तावांच्या नामंजूरीमुळे बृहत आराखड्यातील नवीन महाविद्यालयाचा बिंदू/ठिकाण रिक्त राहत असल्यास सदर बिंदू/ठिकाण पुढील वर्षाच्या बृहत आराखड्यात समाविष्ट करून महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करणेबाबत निर्देश देण्यात आलेले होते.

तसेच मा. उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ४०० ०३२ यांचे पत्र क्र. संकीर्ण—२०२१/प्र. क्र. ५१/ विशि—५, दिनांक १९ जुलै, २०२१ अन्वये सन २०२२—२०२३ या वार्षिक सम्यक योजनेत बदल असल्यास कोणत्याही परिस्थितीत **दिनांक ३१ जुलै, २०२१ पूर्वी** महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या मान्यतेसाठी शासनास सादर करणेबाबत निर्देश देण्यात आलेले होते.

'मा. विद्या परिषद' या विद्यापीठ अधिकार मंडळाची सभा दिनांक १० ऑगस्ट, २०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. तथापि, उपरोक्त सर्वसमावेश वार्षिक/सम्यक योजना/बृहत आराखडा हा वरील शासन पत्र दिनांक २२ जुलै, २०२१ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३१ जुलै, २०२१ पूर्वी महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या मान्यतेसाठी शासनास सादर करणे आवश्यक असल्याने तसेच नजीकच्या काळात 'मा. विद्या परिषद' या विद्यापीठ अधिकार मंडळांची सभा होणार नसल्याने उद्‌भवलेल्या तातडीच्या परिस्थितीमुळे प्रस्तुत विभागाच्या टिपणी क्र. सीए/१३७, दिनांक २८ जुलै, २०२१ अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२ (७) मधील तरतूदींनुसार **मा. कुलगुरू यांनी, उक्त अधिनियमातील तरतूदींन्वये मा. अधिष्ठाता मंडळाने तयार केल्याप्रमाणे आणि मा. व्यवस्थापन परिषदेने शिफारस केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२२—२०२३ साठीच्या प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्वसमावेशक सम्यक योजनेस आणि उच्च शिक्षणाची महाविद्यालये, परिसंस्था यांच्या ठिकाणाबाबतच्या वार्षिक योजनेस सदरहू अधिनियमातील कलम ३३ (१) (त) आणि कलम ३३ (१) (थ) मधील तरतूदींनुसार 'मा. विद्या परिषद' या विद्यापीठ अधिकार मंडळाच्यावतीने 'मा. अधिसभा' या विद्यापीठ अधिकार मंडळास मान्यतेसंदर्भात शिफारस केलेली आहे. तसेच सदरहू शिफारस मा. अधिसभा या विद्यापीठ अधिकार मंडळाच्यावतीने मा. कुलगुरू यांनी उपरोक्त टिपणीन्वये स्वीकारली आहे.**

मा. कुलगुरू यांनी उपरोक्त टिपणीन्वये 'मा. विद्या परिषद' आणि 'मा. अधिसभा' या विद्यापीठ अधिकार मंडळांच्यावतीने वरीलप्रमाणे दिलेल्या मान्यतेनुसार शैक्षणिक वर्ष २०२२—२०२३ साठीची प्रस्तुत विद्यापीठाची वार्षिक योजना महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग माहेड च्या मान्यतेकामी प्रस्तुत विभागाच्या पत्र संदर्भ क्र. सीए/१०२६, दिनांक २९ जुलै, २०२१ अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करण्यात आलेली आहे.

सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ३३ (१) (त) आणि कलम ३३ (१) (थ) मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२२—२०२३ साठीच्या प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्वसमावेशक सम्यक योजनेस आणि उच्च शिक्षणाची महाविद्यालये, परिसंस्था यांच्या ठिकाणाबाबतच्या वार्षिक योजनेस 'मा. अधिसभा' या विद्यापीठ अधिकार मंडळाच्या मंजूरीसंदर्भात मा. कुलगुरू यांनी उक्त अधिनियमातील कलम १२

(७) मधील तरतूदींनुसार मा. विद्या परिषदेच्या वतीने वरीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयासंदर्भात सदरचा प्रस्ताव मा. विद्या परिषदेस माहितीसाठी सादर.)

ठराव

वि. प. क्र. क १६ पीए/१६/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, शैक्षणिक वर्ष २०२२—२०२३ साठीच्या प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्वसमावेशक सम्यक योजना आणि उच्च शिक्षणाची महाविद्यालये, परिसंस्था यांच्या ठिकाणाबाबतच्या वार्षिक योजनेसंदर्भात मा. कुलगुरू यांनी मा. विद्या परिषदेच्यावतीने मा. अधिसभेस केलेल्या शिफारशींबाबत वरीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयाची मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे.

क १७ पीए/१७/२०२१ मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेमध्ये सुधारित M.B.A.(Rev. 2021) कोर्स शैक्षणिक वर्ष जानेवारी २०२१ पासून सुरू करण्यास मान्यता देण्यासाठी मा.कुलगुरू यांनी केलेली कार्यवाही.

(टिप: डॉ. वैभव जाधव, संचालक, मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा यांनी पाठविलेले पत्र क्र. मु.अ.प्र./टिपणी क्र./५४७, दि. ०४/०१/२०२१ अन्वये मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा विभागामध्ये M.B.A.(Rev. 2021) हा ११० Credit चा कोर्स शैक्षणिक वर्ष जानेवारी २०२१ पासून सुरू करण्यास मान्यता देण्याबाबत विनंती केलेली होती.

मा. कुलगुरू यांनी विद्याशाखेच्यावतीने सदर आभ्यासक्रमास मान्यता दिलेली असून मा. विद्यापरिषदेस शिफारस केलीली आहे.

मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेमध्ये सुधारित M.B.A.(Rev. 2021) हा ११० Credit चा कोर्स शैक्षणिक वर्ष जानेवारी २०२१ पासून सुरू करण्यास मान्यता देण्यासाठी मा.कुलगुरू यांना टिपणी सादर केली असता टिपणी क्र./५४७, दि.०४/०१/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली असून संबधितांना परिपत्रक क्र. ४/२०२१ दि.१३/०१/२०२१ नुसार कळविण्यात आले आहे.

सबब सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेस माहितीसाठी सादर.)

ठराव

वि. प्र. क्र. क १७ पीए/१७/२०२१, दि. १० ऑगस्ट,२०२१

असा ठराव करण्यात येतो की, मा. कुलगुरू यांनी विद्या परिषदेच्यावतीने घेतलेल्या निर्णयाची मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे.

क १८ पीए/१८/२०२१ विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत अस्तित्वात असलेल्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांमधील अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्रमाच्या नावात बदल करुन शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ पासून पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देणेबाबत..

(टिप : मा. प्रभारी प्राचार्य, सोसायटी फॉर कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च, पुणे इन्स्टिटयूट ऑफ कॉम्प्यूटर टेक्नॉलॉजी, सर्व्हे नं—२७, पुणे सातारा रोड, धनकवडी, पुणे—४३ यांचे संदर्भ क्र. पीआयसीटी/डीएसके/आरजीटीआर/३४५/२०२१, दि. १०/०७/२०२१ रोजीचे पत्रामध्ये त्यांनी शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ पासून शासनाने व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमाच्या नावात बदल झालेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून सुरु करण्यासाठी विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचा शासन निर्णय क्र. टीईएम—२०२०/प्र. क्र.१००/ तांशि—४, दि.०७ ऑगस्ट, २०२० नुसार सदर महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून एम. ई. इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन (द्वितीय पाळी) (प्रवेश क्षमता १८) ऐवजी एम. ई. इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्युनिकेशन (वायरलेस कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी) (प्रवेश क्षमता १८) असा बदल करून हा नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची मान्यता मिळालेली आहे.

उक्त शासन आदेशांन्वये मंजूर करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांस प्रस्तुत विद्यापीठची मान्यता नसल्यामुळे सदर अभ्यासक्रम सोसायटी फॉर कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च, पुणे इन्स्टिटयूट ऑफ कॉम्प्यूटर टेक्नॉलॉजी, सर्व्हे नं—२७, पुणे सातारा रोड, धनकवडी, पुणे—४३ या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ पासून सुरु करता आलेला नाही.

विद्यापीठ परिपत्रक क्र. ५९/२०२१ संदर्भ सीबी/एसॲण्डटी/२२५, दि. २४/०२/२०२१ नुसार उक्त नमूद नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आलेली आहे.

अभियांत्रिकी/वास्तुविद्याशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र व व्यवस्थापनशास्त्र या महाविद्यालये/परिसंस्थांमधील अभ्यासक्रमांची यादी केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेकरिता पाठवावी लागते. त्यानुसार संबंधीत अभ्यासक्रमाचा केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश करण्याकरिता महाविद्यालय/परिसंस्था यांना विद्यापीठाच्या मान्यतेचे पत्र सोबत जोडणे आवश्यक असते.

उक्त शासन आदेशांन्वये मंजूर करण्यात आलेल्या अभ्यासक्रमास संलग्नीकरण देण्याचे अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ३३ (१) (ड), कलम ३३ (१) (ढ) आणि कलम १०९ मधील तरतूदींनुसार विद्यापीठाच्या मा. विद्या परिषदेस आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ११० (१) अनुसार उपरोक्तबाबत मा. विद्यापरिषदेची मान्यता घेणे आवश्यक असून नजीकच्या काळात मा. विद्यापरिषदेची सभा होणार नसल्यामुळे मा. कुलगुरु यांनी टिपणी क्र. सीए/१२३, दि. १५ जुलै, २०२१ नुसार मा. कुलगुरु यांनी मा. विद्यापरिषदेच्या वतीने उपरोक्त शासन निर्णयात नमूद केलेल्या नवीन अभ्यासक्रम (नावात बदल झालेल्या) शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून सुरु करण्यास मान्यता/परवानगी दिलेली आहे. त्यास अनुसरुन संदर्भ पत्र क्र. सीए/१००७, दि. २८ जुलै, २०२१ अन्वये महाविद्यालयास कळविण्यात आलेले आहे.

सदर प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या माहितीसाठी सादर.

ठराव

वि. प. क्र. १८ पीए/१८/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मा. कुलगुरु यांनी मा. विद्यापरिषदेच्या वतीने घेतलेल्या निर्णयाची कार्यवाहीसह नोंद घेण्यात येत आहे.

क १९ पीए/१९/२०२१ विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत अस्तित्वात असलेल्या विनाअनुदानित अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून नवीन अभ्यासक्रमास पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाबाबत..

(टिप : मा. प्राचार्य, विद्या प्रतिष्ठानचे, कमलनयन बजाज इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, विद्यानगरी, भिगवण रोड, बारामती जि. पुणे ४१३ १३३ यांचे संदर्भ क्र.व्हिपीकेबीआयईटी/नवीन अभ्यासक्रम/०३/२०२१/२३१, दि. २४/०३/२०२१ रोजीचे पत्रामध्ये त्यांनी शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ पासून शासनाने व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून सुरु करण्यासाठी विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

सदर महाविद्यालयास अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचा शासन निर्णय क्र. टीईएम—२०२०/प्र.क्र. १०२/तांशि—४, दि. १३ ऑगस्ट, २०२० नुसार शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ पासून एम. ई. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग (आर्टिफिशीअल इंटेलिजन्स ॲण्ड डाटा सायन्स) (प्रवेश क्षमता १८) आणि एम. ई. मेकॅनिकल इंजिनिअरिंग (रोबोटिक्स ॲण्ड ऑटोमेशन) (प्रवेश क्षमता १८) हा नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची मान्यता मिळालेली आहे.

उक्त शासन आदेशांन्वये मंजूर करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांस प्रस्तुत विद्यापीठची मान्यता नसल्यामुळे सदर अभ्यासक्रम कमलनयन बजाज इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, विद्यानगरी, भिगवण रोड, बारामती जि. पुणे ४१३ १३३ या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ पासून सुरु करता आले नाहीत.

विद्यापीठ परिपत्रक क्र. ५९/२०२१ संदर्भ सीबी/एसॲण्डटी/२२५, दि. २४/०२/२०२१ नुसार उक्त नमूद नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आलेली आहे.

अभियांत्रिकी/वास्तुविद्याशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र व व्यवस्थापनशास्त्र या महाविद्यालये/ परिसंस्थांमधील अभ्यासक्रमांची यादी केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेकरिता पाठवावी लागते. त्यानुसार संबंधीत अभ्यासक्रमाचा केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये

समावेश करण्याकरिता महाविद्यालय/परिसंस्था यांना विद्यापीठाच्या मान्यतेचे पत्र सोबत जोडणे आवश्यक असते.

उक्त शासन आदेशांन्वये मंजूर करण्यात आलेल्या अभ्यासक्रमास संलग्नीकरण देण्याचे अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ३३ (१) (ड), कलम ३३ (१) (ढ) आणि कलम १०९ मधील तरतूदींनुसार विद्यापीठाच्या मा. विद्या परिषदेस आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ११० (१) अनुसार उपरोक्तबाबत मा. विद्यापरिषदेची मान्यता घेणे आवश्यक असून नजीकच्या काळात मा. विद्यापरिषदेची सभा होणार नसल्यामुळे मा. कुलगुरु यांनी टिपणी क्र. सीए/९०, दि. १० जून, २०२१ नुसार मा. विद्यापरिषदेच्या वतीने उपरोक्त शासन निर्णयात नमूद केलेले नवीन अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून सुरु करण्यास मान्यता/मंजूरी दिलेली आहे. संबंधित महाविद्यालयाचे नाव केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट करण्याकरिता संलग्नतेचे पत्र संदर्भ क्र. सीए/६६७, दि. २१ जून, २०२१ नुसार देण्यात आलेले आहे.)

सदर प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या माहितीसाठी सादर.

ठराव

वि. प. क्र. १९ पीए/१९/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मा. कुलगुरु यांनी मा. विद्यापरिषदेच्या वतीने घेतलेल्या निर्णयाची कार्यवाहीसह नोंद घेण्यात येत आहे.

क २० पीए/२०/ २०२१ मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे इन्स्टिटयुट ऑफ इंजिनिअरिंग, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक—४२२००३ या अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील बी.व्होक. अभ्यासक्रमाच्या मान्यतेबाबत ...

(टिप : मुंबई एज्युकेशनल ट्रस्टचे इन्स्टिटयुट ऑफ इंजिनिअरिंग, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव, नाशिक—४२२००३ या अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१९—२० पासून उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांनी शासन निर्णय क्र. टीईएम—२०१९/प्र.क्र. १६५/तांशि—४, दि. २५ जून, २०१९ अन्वये एनएसक्यूएफ (NSQF) अंतर्गत बी. व्होक अभ्यासक्रमाच्या खालील नमूद अभ्यासक्रमांस मान्यता दिलेली आहे.

विद्यापीठ परिपत्रक क्र. १७७/२०२० संदर्भ सीबी/एसअॅण्डटी/३६४, दि. २९/०६/२०२० नुसार अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र या अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांमधील बी. व्होक अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आलेली आहे.

अनु क्र.	बी. व्होक. अभ्यासक्रम	विद्यार्थी प्रवेश क्षमता
१	इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग सर्व्हीसेस	२५
२	ग्राफिक्स अॅण्ड मल्टीमिडीया	२५

मा. अधिष्ठाता मंडळाने छाननी व पडताळणी करुन संबंधित महाविद्यालयात उक्त बी. व्होक. अभ्यासक्रम सुरु करण्याची परवानगी/संलग्नीकरण देणेबाबत (डॉ.) वर्षा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीने महाविद्यालयास दि. १२ मार्च, २०२१ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन दि. १७ मार्च, २०२१ रोजी अहवाल कार्यालयात सादर केलेला आहे. समितीने महाविद्यालयास उक्त बी. व्होक अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ पासून सुरु करण्यास संलग्नीकरणाच्या परवागीची शिफारस केलेली आहे.

तसेच मा. अधिष्ठाता मंडळाच्या दि. २२ मार्च, २०२१ रोजी झालेल्या सभेमधील ठराव क्र. १४६/२२०३२०२१ नुसार मा. विद्यापरिषदेकडे बी. व्होक अभ्यासक्रमांस पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणास परवानगीची शिफारस करण्यात आलेली आहे.

उक्त शासन आदेशांन्वये मंजूर करण्यात आलेल्या बी. व्होक. अभ्यासक्रमास संलग्नीकरण देण्याचे अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ३३ (१) (ड), कलम ३३ (१) (ढ) आणि कलम १०९ मधील तरतूदींनुसार मा. विद्यापरिषदेची मान्यता असणे आवश्यक आहे.

तथापि, नजीकच्या काळात मा. विद्यापरिषदेची सभा होणार नसल्यामुळे मा. कुलगुरु यांनी टिपणी क्र. सीए/८१, दि. २५/०५/२०२१ नुसार मा. विद्यापरिषदेच्या वतीने उपरोक्त महाविद्यालयास **पहिल्या वेळेच्या मान्यतेचे/परवानगी** पत्र देण्याबाबत मान्यता/मंजूरी दिलेली आहे. त्यास अनुसरून

संबंधित महाविद्यालयास संदर्भ पत्र क्र. सीए/६२९, दि. १२ जून, २०२१ नुसार कळविण्यात आलेले आहे.

सदर प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या माहितीसाठी सादर.

ठराव

वि. प. क्र. २० पीए/२०/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मा. कुलगुरु यांनी मा. विद्यापरिषदेच्या वतीने घेतलेल्या निर्णयाची कार्यवाहीसह नोंद घेण्यात येत आहे.

क २१ पीए/२१/२०२१ पदवी प्रमाणपत्र छपाईच्या प्रचलित पध्दतीत बदल करून पदवी प्रदान समारंभाची तारीख न घेता 'Winter' किंवा 'Summer' असा उल्लेख करून पदवी प्रमाणपत्र प्रिंट करण्यास मान्यता मिळणेबाबत...

(टिप: विद्यापीठाच्या ११८ वा पदवी प्रदान समारंभ एप्रिल/मे, २०२१ मध्ये होणे अपेक्षित होते. परंतु कोरोना (कोव्हिड १९) च्या वाढत्या प्रार्दुभावामुळे महाराष्ट्र शासनाने केलेल्या टाळेबंदीतील निर्बंधांमुळे सदर समारंभ दि. २४/०४/२०२१ रोजी न घेता पुढे घेण्याबाबत मा.कुलपतींनी सुचित केले. सदर पदवी प्रदान समारंभासाठी पहिल्यांदाच यावर्षी मोठया प्रमाणावर अर्ज प्राप्त झाले. पदवी प्रदान समारंभ कधी होईल याची निश्चितता नसल्यामुळे व तारीख प्राप्त झाल्यानंतर कमी वेळामध्ये १,६१,००० पदवी प्रमाणपत्रांची छपाई होणे अडचणीचे झाले होते.

सबब पदवी प्रमाणपत्रांवर विद्यापीठाच्या प्रचलित पध्दतीनुसार पदवी प्रदान समारंभाची तारीख न घेता **'Winter' किंवा 'Summer' असा उल्लेख करून पदवी प्रमाणपत्र छपाई करण्यात यावी, याबाबत मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि. १५/०५/२०२१ रोजी झालेल्या सभेत वरील विषयानुसार प्रस्ताव सादर करण्यात आला होता.**

सदर प्रस्तावास मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने ठराव क्र. ३३/२०२१ (१५.०५.२०२१) अन्वये मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे ११८ व्या पदवी प्रदान समारंभाच्या पदवी प्रमाणपत्रांची छपाई करण्याची कार्यवाही सुरू करण्यासाठी सदर प्रस्तावास मा. विद्यापरिषद व मा. व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक होते.

परंतु नजीकच्या काळात मा.विद्यापरिषद व मा.व्यवस्थापन परिषदेची सभा होणार नसल्याने विशेष बाब म्हणुन ११८ व्या पदवी प्रदान कार्यक्रमासाठी पदवी प्रमाणपत्रांची छपाई करण्याची पुढील आवश्यक ती कार्यवाही सुरू करणेबाबत मा.कुलगुरू यांनी दि. २०/०५/२०२१ रोजी सादर केलेल्या टिपणी क्र. परीक्षा/प्रमाणपत्र/२१२५ अन्वये मा.विद्यापरिषद व मा.व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे. संबंधित प्रस्तावावर कार्योत्तर मान्यतेसाठी मा. विद्यापरिषदेस प्रस्ताव सादर.)

ठराव

वि. प. क्र. २१ पीए/२१/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, ११८ व्या पदवी प्रदान समारंभापासून पदवी प्रमाणपत्रांवर समारंभाची तारीख न घेता 'Winter' किंवा 'Summer' असा उल्लेख करून पदवी प्रमाणपत्र छपाई करण्यात यावी, यास मा. कुलगुरू यांनी मा. विद्यापरिषदेच्यावतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात येत आहे.

क २२ पीए/२२/२०२१ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ११८ वा पदवी प्रदान समारंभासाठी पदवी, पदव्युत्तर, पदविका, इ. प्रमाणपत्रे वितरीत करण्यासाठी मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्याबाबत...

(टिप: विद्यापीठाचा ११८ वा पदवी प्रदान समारंभ १५ जून, २०२१ रोजी आयोजित करण्यात आला होता. सदर समारंभ १५ जून, २०२१ रोजी आयोजित करण्यासाठी मा. कुलपती कार्यालयाकडून पत्र क्र.RB/SPPU-2021/CR-132/Edn-1/570 दि. ११/०६/२०२१ अन्वये मा. कुलपती यांनी परवानगी दिल्याचे कळविले होते.

सदरच्या पदवी प्रमाणपत्र समारंभासाठी मार्च/एप्रिल, २०२० व त्यापूर्वीच्या वर्षामध्ये विविध परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी दि. ०८ डिसेंबर, २०२० ते ३१ जानेवारी, २०२१ या मुदतीत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले होते. एकुण १,६१,५९१ विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१(ध), १२८ (१) नूसार पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे, इ. प्रदान करण्यासाठी विद्यापरिषदेकडून मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्याच्या तरतूदी आहेत. त्या खालीलप्रमाणे आहेत.

कलम ३१(ध) विद्यापरिषदेकडून शिफारशी करण्यात आल्या असतील अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधी सुरू करणे व प्रदान करणे आणि आदेशाद्वारे तरतूद केल्यानूसार त्यांचे प्रदान करण्याकरिता दीक्षांत समारंभाची व्यवस्था करणे.

कलम १२८(१) व्यवस्थापन परिषदेस, विद्यापरिषदेकडून शिफारस करण्यात येतील अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी सुरू करता येईल आणि प्रदान करता येतील.

वरील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यासाठी मा. कुलगुरूनी विद्यापरिषदेच्या वतीने मा. व्यवस्थापन परिषदेस प्रस्ताव सादर करण्यासाठी दि. १४/०६/२०२१ रोजी सादर केलेल्या टिपणी क्र. परीक्षा/पदवीप्रमाणपत्र/२४२० अन्वये मान्यता दिलेली आहे.

सबब ११८ व्या पदवीप्रदान समारंभात पदवी/पदव्युत्तर प्रमाणपत्रे सर्व संबंधित विद्यार्थ्यांना प्रदान करण्यासाठीच्या प्रस्तावावर कार्योत्तर मान्यतेसाठी मा. विद्यापरिषदेस प्रस्ताव सादर.)

ठराव

वि. प. क्र. २२ पीए/२२/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ११८ वा पदवी प्रदान समारंभासाठी पदवी, पदव्युत्तर, पदविका, इ. प्रमाणपत्रे वितरीत करण्यासाठी मा. कुलगुरू यांनी मा. विद्यापरिषदेच्यावतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात येत आहे.

क २३ पीए/२३/२०२१ विद्यापीठाच्या स्कील डेव्हलपमेंट सेंटर येथे सुरू असलेल्या B.Voc पदवी अभ्यासक्रमांच्या नावातील बदलास मान्यता देण्यासाठी मा. कुलगुरू यांनी केलेली कार्यवाही.

(टिप: मा. अधिष्ठाता मंडळाच्या दि. २४ जून, २०२१ रोजी झालेल्या सभेमध्ये प्रस्ताव क्र. प्र—अमं/१८२/२४०६२०२१ ठराव क्र. १८२/२४०६२०२१ अन्वये खालीलप्रमाणे ठराव करण्यात आलेला आहे.

ठराव क्र. १८२/२४०६२०२१

आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेअंतर्गत स्कील डेव्हलपमेंट सेंटर येथे सुरू असलेल्या B.Voc in Automotive Automation and B.Voc in Automotive Manufacturing या पदवीचे नाव बदलून B.Voc (Automotive Manufacturing Skills) असे करण्यास आणि B.Voc in Renewable Energy या पदवीचे नाव बदलून B.Voc (Renewable Energy Skills) असे करून नव्याने प्रस्थापित करण्याची मा. विद्यापरिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

परंतु मा. संचालक, स्कील डेव्हलपमेंट सेंटर यांनी पत्र क्र. SDC/2021/140 दि. १२ जुलै, २०१७ अन्वये B.Voc in Automotive Manufacturing Skills या पदवी अभ्यासक्रमाच्या नावात B.Voc in Manufacturing Skills असा बदल करण्यास मा. कुलगुरू यांची मान्यता घेतलेली आहे.

मा. विद्यापरिषदेच्या दि. १ एप्रिल, २०२१ रोजी झालेल्या सभेमध्ये प्रस्ताव व ठराव क्र. ब ३० पीए/३०/२०२१ अन्वये B.Voc in Retail Management हा अभ्यासक्रम (As per Graded System) ने सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली होती.

परंतु इंटरडिसिप्लीनरी स्कील डेव्हलपमेंट तदर्थ अभ्यासमंडळाच्या दि. ३० जून, २०२१ रोजी झालेल्या सभेमध्ये B.Voc in Retail Management हा अभ्यासक्रम (without Graded System) ने सुरू करण्यास मान्यता देणेबाबत विनंती केलेली आहे.

सबब उपरोक्त नमूद अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून सुरू करावयाचे असल्याने सदर पदवीच्या नावातील बदलास तसेच B.Voc in Retail Management हा अभ्यासक्रम (without Graded System) ने सुरू करण्यास मान्यता देण्यासाठी मा. कुलगुरू यांना टिपणी सादर केली असता टिपणी क्र. व्हीसी/२७०७, दि. २९.७.२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली असून पदवीच्या नावातील बदलाचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन परिषदेस सादर करण्यात आला आहे. तसेच B.Voc in Retail Management हा अभ्यासक्रम (without Graded System) ने सुरू करण्यासंदर्भात परिपत्रक क्र. २०१/२०२१ दि. ३.८.२०२१ नुसार संबंधितांना कळविण्यात आले आहे.

सबब सदरचा प्रस्ताव मा. विद्यापरिषदेस माहितीसाठी सादर.)

ठराव

वि.प.क्र. क २३ पीए/२३/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मा. कुलगुरू यांनी मा. विद्यापरिषदेच्यावतीने घेतलेल्या निर्णयाची मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे.

क २४ पीए/२४/२०२१ **शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी कला, वाणिज्य, विज्ञान, ललित कला व हस्तकला, मानस नीती व समाज विज्ञान, प्रयोगजिवी कला, विधी इ. अभ्यासक्रमांच्या संलग्नित महाविद्यालयांमध्ये आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये महाराष्ट्र शासनाने मंजूरी दिलेल्या नवीन पाठ्यक्रम/अभ्यासक्रम, नवीन विषय, विशेषस्तर विषय, नवीन अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा इत्यादींकरिता शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठीच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाच्या परवानगीबाबत.....**

(टिप : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि—४, दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ तसेच 'कोवीड (कोरोना—१९)' या विषाणूच्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर उद्‌भवलेल्या परिस्थितीच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाकडून निर्गमित करण्यात आलेल्या महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. ८६, दिनांक ८ डिसेंबर, २०२० मधील तरतूदींनुसार विहित प्रक्रियेद्वारे विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शासनास प्रस्तुत विभागाच्या पत्र संदर्भ क्र. सीए/४१९, दिनांक १ एप्रिल, २०२१ अन्वये सादर करण्यात आलेल्या विषयांकित बाबी विषयांच्या प्रस्तावांच्या शिफारशींच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पुढील विवरणात नमूद केलेल्या आदेशाच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

अ. क्र.	**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आदेश/पत्र क्रमांक व दिनांक**	**शासन आदेशाचा/पत्राचा विषय**
१	शासन आदेश क्रमांक : एनजीसी—२०२१/(१०५/२१)/मशि—४, दिनांक १५ जून, २०२१	शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये नवीन पाठ्यक्रम/ अभ्यासक्रम, विषय, विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखांना मान्यता देणेबाबत.....
२	शासन आदेश क्रमांक : एनजीसी—२०२१/(१११/२१)/मशि—४, दिनांक १५ जून, २०२१	

उपरोक्त शासन आदेशांन्वये शैक्षणिक वर्ष नवीन पाठ्यक्रम/अभ्यासक्रम, विषय, विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा इत्यादींना मंजूरी देण्यात आलेल्या प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांची/मान्यताप्राप्त परिसंस्थांची संख्या पुढीलप्रमाणे:

अ. क्र.	शासन मंजूरीचा प्रकार	संलग्नित महाविद्यालयांची/मान्यताप्राप्त परिसंस्थांची संख्या			एकूण
		विवरणपत्र 'अ'	विवरणपत्र 'ब'	विवरणपत्र 'क'	
१	नवीन पाठ्यक्रम/अभ्यासक्रम/ विषय, विशेषस्तर विषय	५६	०८	०७	**७१**
२	नवीन अतिरिक्त तुकडी	२२	०९	०४	**३५**
३	नवीन विद्याशाखा	०३	०६	०५	**१४**
एकूण		**८१**	**२३**	**१६**	**१२०**

उपरोक्त शासन आदेशांतील अटी व शर्तींची तसेच प्रकरणपरत्वे त्यामधील संबंधित बाबींची पूर्तता करणाऱ्या संलग्नित महाविद्यालयांना/मान्यताप्राप्त परिसंस्थांना उपरोक्त शासन आदेशांन्वये मंजूरी देण्यात आलेल्या नवीन अभ्यास पाठ्यक्रम/अभ्यासक्रम, विषय, विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, विद्याशाखा यांस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० तसेच उपरोक्त शासन आदेश व पत्र यांमधील अटी व शर्तींच्या अधीन राहून पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० (१) मधील तरतूदींनुसार नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, विद्याशाखा इत्यादींना पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्याचे अधिकार विद्यापीठाच्या मा. विद्या परिषदेस आहेत.

तथापि, नजीकच्या काळात मा. विद्या परिषदेची सभा होणार नसल्याने व शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी मान्यता देण्यात आलेल्या नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, विद्याशाखा, यांना पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देणे आवश्यक असल्याने व त्याबाबत संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेकडून वारंवार मागणी व विचारणा होत असल्याने उद्भवलेल्या परिस्थितीमुळे, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) मधील तरतूदींनुसार मा. कुलगुरू यांनी प्रस्तुत विभागाच्या टिपणी क्र. सीए/१२२, दिनांक १५ जुलै, २०२१ अन्वये मा. विद्या परिषदेच्यावतीने, पुढील बाबींस मान्यता दिलेली आहे.

१. उपरोक्त शासन आदेश दिनांक १५ जून, २०२१ मधील अटी व शर्तींनुसार मा. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन यांचे संबंधित प्रमाणपत्र प्राप्त होणाऱ्या सदरहू शासन आदेशांतील विवरणपत्र 'अ' मधील नमूद प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना/मान्यताप्राप्त परिसंस्थांना महाराष्ट्र

सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० तसेच उपरोक्त शासन आदेश आणि पत्रं यांमधील अटी व शर्तींच्या अधीन राहून संबंधित नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, विद्याशाखा इत्यादींना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देणे.

२. उपरोक्त शासन आदेश दिनांक १५ जून, २०२१ मधील अटी व शर्तींनुसार विवरणपत्र 'ब' व 'क' मधील नमूद महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी शासन स्तरावरून स्वतंत्रपणे कळविण्यात येणाऱ्या पूर्ततेसंदर्भात प्राप्त होणाऱ्या त्रुटी पूर्तता अहवालांची छाननी व पडताळणी करून संबंधित महाविद्यालयांना/ परिसंस्थांना संबंधित नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, विद्याशाखा इत्यादींना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्यात यावे किंवा कसे यासंदर्भातील शिफारशी करण्यासाठी तज्ज्ञ समिती गठीत करणे.

३. उपरोक्त तज्ज्ञ समितीने केलेल्या शिफारशींनुसार त्रुटींची पूर्तता करणाऱ्या तसेच उपरोक्त शासन आदेश दिनांक १५ जून, २०२१ मधील अटी व शर्तींनुसार मा. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन यांचे संबंधित प्रमाणपत्र प्राप्त होणाऱ्या प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना/मान्यताप्राप्त परिसंस्थांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० तसेच उपरोक्त शासन आदेशांमधील अटी व शर्तींच्या अधीन राहून संबंधित नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, विद्याशाखा इत्यादींना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देणे.

मा. कुलगुरू यांनी उपरोक्त टिपणीन्वये मा. विद्या परिषदेच्यावतीने वरीलप्रमाणे दिलेल्या मान्यतेनुसार संबंधित संलग्नित महाविद्यालयांना/मान्यताप्राप्त परिसंस्थांना उक्त शासन आदेशांन्वये मंजूरी देण्यात आलेल्या संबंधित नवीन पाठ्यक्रम/ अभ्यासक्रम, नवीन विषय, विशेषस्तर विषय, नवीन अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा इत्यादींकरिता शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठीच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरण परवानगीबाबत व अनुषंगिक बाबींबाबत कळविण्यात येत आहे.

सबब, उक्त शासन आदेशांन्वये मंजूरी देण्यात आलेल्या संबंधित संलग्नित महाविद्यालयांना/मान्यताप्राप्त परिसंस्थांना संबंधित नवीन पाठ्यक्रम/ अभ्यासक्रम, नवीन विषय, विशेषस्तर विषय, नवीन अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा इत्यादींकरिता सदरहू अधिनियमातील कलम ११० मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठीच्या

पहिल्या वेळेच्या संलग्नीकरण परवानगीबाबत मा. कुलगुरू यांनी मा. कुलगुरू यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२ (७) मधील तरतूदींनुसार मा. विद्या परिषदेच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठीच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाच्या परवानगीबाबत व अनुषंगिक बाबींबाबत वरीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयासंदर्भात सदरचा प्रस्ताव मा. विद्या परिषदेस माहितीसाठी सादर.)

ठराव

वि. प. क्र. क २४ पीए/२४/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्रमांक : एनजीसी—२०२१/(१०५/२१)/मशि—४, दिनांक १५ जून, २०२१ आणि शासन आदेश क्रमांक : एनजीसी—२०२१/(१११/२१)/मशि—४, दिनांक १५ जून, २०२१ अन्वये मंजूरी देण्यात आलेल्या संबंधित संलग्नित महाविद्यालयांना/मान्यताप्राप्त परिसंस्थांना संबंधित नवीन पाठ्यक्रम/अभ्यासक्रम, नवीन विषय, विशेषस्तर विषय, नवीन अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा इत्यादींकरिता सदरहू अधिनियमातील कलम ११० मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठीच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरण परवानगीबाबत मा. कुलगुरू यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२ (७) मधील तरतूदींनुसार मा. विद्या परिषदेच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठीच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाच्या परवानगीबाबत व अनुषंगिक बाबींबाबत विद्या परिषदेच्यावतीने वरीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयाची मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे.

क २५ पीए/२५/२०२१ शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ साठी इरादापत्र मंजूर करण्यात आलेल्या नवीन महाविद्यालयांपैकी शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी अंतिम मान्यता देण्यात आलेल्या नवीन महाविद्यालयांच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाच्या परवानगीबाबत.....

(टिप : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०९ मधील तरतूदींनुसार आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि—४, दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ अन्वये विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दती आणि निकषांनुसार उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. मान्यता—२०१९/ (२४९/१९) / मशि—४, दिनांक ३१ जानेवारी, २०२० अन्वये विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ साठी पदवी अभ्यासक्रमांच्या नवीन महाविद्यालयांना सुरू करण्यासाठी इरादापत्र मंजूर करण्यात आलेल्या पुढील विवरणात नमूद संस्थांना सदरहू नवीन महाविद्यालये शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी सुरू करण्यास उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. एनजीसी २०२१/(२२/२१)/मशि—४, दिनांक १५ जून, २०२१ अन्वये अंतिम मंजूरी देण्यात आलेली आहे.

अ. क्र.	**संस्थेचे ना व ठिकाण आणि नवीन महाविद्यालयाचे नाव, ठिकाण व प्रस्ताव क्र.**	**प्रस्तावित विद्याशाखा : अभ्यासक्रम**
१	**<u>संस्थेचे नाव व ठिकाण :</u>** **राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ** ठिकाण : लांडेवाडी, भोसरी, तालुका पिंपरी—चिंचवड (महानगरपालिका हद्द), जिल्हा पुणे. पिन—४११ ०३९ **<u>नवीन महाविद्यालयाचे नाव व ठिकाण :</u>** **कला, वाणिज्य रात्र महाविद्यालय** ठिकाण : लांडेवाडी, भोसरी, तालुका पिंपरी—चिंचवड (महानगरपालिका हद्द), जिल्हा पुणे. पिन — ४११ ०३९ प्रस्ताव क्र. : पीसी २०१९००५४	१) मानवविज्ञान : बी. ए. २) वाणिज्य व व्यवस्थापन : बी. कॉम्.

अ. क्र.	संस्थेचे नाव ठिकाण आणि नवीन महाविद्यालयाचे नाव, ठिकाण व प्रस्ताव क्र.	प्रस्तावित विद्याशाखा : अभ्यासक्रम
२	**संस्थेचे नाव व ठिकाण :** **किसान बहुउद्देशीय संस्था** ठिकाण/पत्ता : पारनेर, तालुका पारनेर, जिल्हा अहमदनगर पिन — ४१४ ३०२ **नवीन महाविद्यालयाचे नाव व ठिकाण :** **किसान कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय** ठिकाण/पत्ता : पारनेर,तालुका पारनेर, जिल्हा अहमदनगर पिन — ४१४ ३०२ प्रस्ताव क्र. : पीसी २०१९००१०	१) मानवविज्ञान : बी. ए. २) वाणिज्य व व्यवस्थापन : बी. कॉम्. ३) विज्ञान व तंत्रज्ञान : बी. एस्सी.
३	**संस्थेचे नाव व ठिकाण :** **श्री महावीर जैन विद्यालय,** महावीर नगर, कॉलेज रोड, लासलगाव, तालुका निफाड, जिल्हा नाशिक. पिन — ४२२ ३०६ **नवीन महाविद्यालयाचे नाव व ठिकाण :** **श्री महावीर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय** ठिकाण : लासलगाव, तालुका निफाड, जिल्हा नाशिक. पिन — ४२२ ३०६ प्रस्ताव क्र. : पीसी २०१९०००४	१) मानवविज्ञान : बी. ए. २) वाणिज्य व व्यवस्थापन : बी. कॉम्. ३) विज्ञान व तंत्रज्ञान : बी. एस्सी.
४	**पुरंदर टेक्निकल एज्युकेशन सोसायटी** ठिकाण : पाषाणकर—गोडसे असो., श्रीरंग हाऊस, दुसरा मजला, जंगली महाराज रोड, शिवाजीनगर, पुणे — ४११ ०३९ **पुणे केंब्रिज वरिष्ठ महाविद्यालय** ठिकाण : धनकवडी, आंबेगाव पठार, तालुका पुणे (महानगरपालिका हद्द), जिल्हा पुणे. पिन — ४११ ०४६ प्रस्ताव क्र. : पीसी २०१९००६७	१) मानवविज्ञान : बी. ए. २) वाणिज्य व व्यवस्थापन: बी. कॉम्. ३) विज्ञान व तंत्रज्ञान : बी. एस्सी.

उपरोक्त शासन आदेश दिनांक १५ जून, २०२१ अन्वये अंतिम मान्यता देण्यात आलेल्या नवीन महाविद्यालयापैकी संबंधित नवीन महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भातील मा. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन, पुणे — ४११ ००१ यांचेकडून संबंधित प्रमाणपत्र प्राप्त झालेली असून संबंधित नवीन महाविद्यालये शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून सुरू करण्याकरिता संलग्नीकरणाची प्रक्रिया सुरू करणेबाबत सदरहू प्रमाणपत्रांन्वये शिफारस करण्यात आलेली आहे तसेच उर्वरित नवीन महाविद्यालये शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून सुरू करण्यासंदर्भात आगामी काळात संबंधित प्रमाणपत्रं प्राप्त होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ११० मधील तरतूदींनुसार नवीन महाविद्यालयांना पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्याचे अधिकार हे विद्यापीठाच्या मा. विद्या परिषदेस आहेत.

मा. विद्या परिषदेची सभा दिनांक १० ऑगस्ट, २०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. तथापि, सदरहू सभेतील निर्णयांच्या/ठरावांच्या कार्यवाहीसाठी लागणारा अवधी विचारात घेता तसेच उपरोक्त अधिनियम, शासन निर्णय/आदेश तसेच विद्यापीठ अनुदान आयोग, संबंधित शिखर संस्था/परिषद/नियामक मंडळ, केंद्र शासन, राज्य शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित/निर्धारित करण्यात आलेल्या नियम, मार्गदर्शक तत्वे, अध्यादेश, परिनियम इ. मधील तरतूदींनुसार उक्त नवीन महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देणे आवश्यक असून सदरहू संलग्नीकरण लवकरात लवकर देणेबाबत संबंधित संस्थांकडून विनंती व विचारणा करण्यात येत असल्याने उद्भवलेल्या तातडीच्या परिस्थितीमुळे **प्रस्तुत विभागाच्या टिपणी क्र. सीए/१२८, दिनांक २० जुलै, २०२१ अन्वये, मा. कुलगुरू यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२ (७) मधील तरतूदींनुसार 'मा. विद्या परिषदेच्यावतीने' उक्त शासन आदेश दिनांक १५ जून, २०२१ अन्वये अंतिम मान्यता देण्यात आलेल्या व त्यासंदर्भात संबंधित मा. विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांचे प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या व आगामी काळात संबंधित प्रमाणपत्र प्राप्त होणाऱ्या नवीन महाविद्यालयांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ११० तसेच विद्यापीठ अनुदान आयोग, संबंधित शिखर संस्था/परिषद/ नियामक मंडळ, केंद्र शासन, राज्य शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित/निर्धारित करण्यात आलेल्या नियम, मार्गदर्शक तत्वे, अध्यादेश, परिनियम इ. मधील तरतूदींनुसार तसेच उपरोक्त शासन आदेश दिनांक १५ जून, २०२१ मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून संबंधित नवीन महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्यास परवानगी दिलेली आहे.**

मा. कुलगुरू यांनी उपरोक्त टिपणीन्वये मा. विद्या परिषदेच्यावतीने वरीलप्रमाणे दिलेल्या मान्यतेनुसार संबंधित नवीन महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठीच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरण परवानगीबाबत कळविण्यात येत आहे.

सबब, मा. कुलगुरू यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२ (७) मधील तरतूदींनुसार उपरोक्त संबंधित नवीन महाविद्यालयांना सदरहू अधिनियमातील कलम ११० मधील तरतूदींनुसार मा. विद्या परिषदेच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठीच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाच्या परवानगीबाबत वरीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयासंदर्भात सदरचा प्रस्ताव मा. विद्या परिषदेस माहितीसाठी सादर.)

ठराव

वि. प. क्र. क २५ पीए/२५/२०२१, दि. १० ऑगस्ट, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. एनजीसी २०२१/(२२/२१)/मशि—४, दिनांक १५ जून, २०२१ अन्वये अंतिम मंजूरी देण्यात आलेल्या संबंधित नवीन महाविद्यालयांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ११० तसेच विद्यापीठ अनुदान आयोग, संबंधित शिखर संस्था/परिषद/नियामक मंडळ, केंद्र शासन, राज्य शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित/निर्धारित करण्यात आलेल्या नियम, मार्गदर्शक तत्वे, अध्यादेश, परिनियम इ. मधील तरतूदींनुसार तसेच उपरोक्त शासन आदेश दिनांक १५ जून, २०२१ मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणास परवानगीबाबत मा. कुलगुरू यांनी विद्या परिषदेच्यावतीने वरीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयाची मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे.

क २६ पीए/२६/२०२१ **अभियांत्रिकी, वास्तूशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, विधी, शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठीच्या संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ सुरू ठेवण्याच्या/नूतनीकरणाच्या परवानगीबाबत...**

(टिप : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा दिनांक १ मार्च, २०१७ पासून अंमलात आला असून सदरहू अधिनियमाचे कलम ३३ (ढ) मधील तरतूदींनुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गतच्या महाविद्यालयांची व परिसंस्थांची संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्यास परवानगी देण्याचे अधिकार हे 'मा. विद्यापरिषद' या विद्यापीठ अधिकार मंडळास आहेत.

'मा. विद्यापरिषद' या विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, शैक्षणिक वर्ष २०१७—२०१८ पासून विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गतच्या अभियांत्रिकी, वास्तूशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, विधी, शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांस/परिसंस्थांस त्यांनी सादर केलेल्या स्वयं मूल्यमापन अहवालांच्या (Self Appraisal Report) तज्ज्ञ समितीकडून करण्यात आलेल्या छाननी व कागदपत्रांच्या प्रत्यक्ष तपासणीस अनुसरून संबंधित शैक्षणिक वर्षासाठी संलग्नता/मान्यता/ नैसर्गिक वाढ चालू ठेवण्यास परवानगी देण्यात येते.

'कोविड—१९ (कोरोना)' या विषाणूचा प्रादुर्भाव व संसर्ग रोखण्यासाठी शासनाने राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ लागू केलेला असून राज्यात संचारावर निर्बंध/बंदी घालण्यात आलेली आहे तसेच शासकीय, निमशासकीय तसेच अकृषी विद्यापीठे तसेच महाविद्यालये/परिसंस्था/शैक्षणिक संस्था यांमधील सेवकांची कार्यालयीन उपस्थिती नियंत्रित केलेली आहे. अशा अभूतपूर्व व अनिश्चित परिस्थितीतदेखील दैनंदिन कामकाजासोबत पुढील नावीन्यपूर्ण, अभिनव व स्तुत्य उपक्रम संलग्नता कक्षाकडून राबविण्यात आलेला आहे.

१. विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या तसेच परिसंस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९ आणि २०१९—२०२० च्या संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवण्याच्या/नूतनीकरणाच्या अटी व शर्तींच्या पूर्ततांचे अहवाल ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेले असून त्यांची तज्ज्ञ समितीकडून ऑनलाईन पध्दतीने संबंधित तज्ज्ञ समितीकडून तपासणीचे कामकाज करण्यात आलेले आहे.

२. उक्त व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ च्या संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवणे/नूतनीकरण कामीचे संबंधित शिखर संस्थेचे मान्यतापत्र (Extension of Approval) ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेले असून त्यास अनुसरून तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचेकडून मागविण्यात आलेली संबंधित महाविद्यालये/परिसंस्था यांची विद्याशाखा— अभ्यासक्रमनिहाय माहिती संचालनालयास सादर करण्यात आलेली आहे.

३. उक्त व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२०—२०२१ च्या संलग्नता/मान्यता/नैसर्गिक वाढ चालू ठेवणे/नूतनीकरण कामीचे स्वयं मूल्यमापन अहवाल (Self Appraisal Report) आवश्यक त्या कागदपत्रांसह ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेले आहेत.

४. उपरोक्त स्वयं मूल्यमापन अहवालांची व त्यासोबतच्या कागदपत्रांची याकामी गठीत करण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीकडून मा. विद्यापरिषदेच्या ठरावान्वये तपासण्यासंदर्भातील कार्यवाही सुरू आहे.

विषयांकित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संबंधित महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या विस्तारिकरणासंदर्भातील शासन आदेश अद्याप प्राप्त झाले नाहीत. तसेच उक्त स्वयं मूल्यमापन अहवालांच्या व त्यासोबतच्या कागदपत्रांच्या छाननी व तपासणीसाठी अजून कालावधी लागणार आहे. परंतु, उक्त शैक्षणिक वर्षाची संलग्नीकरणविषयक विद्यापीठ परवानगी पत्र त्वरित देणेबाबत संबंधित महाविद्यालयांकडून/संस्थांकडून वारंवार विनंती व विचारणा होत आहे.

परंतु, नजीकच्या काळात मा. विद्यापरिषदेची सभा होणार नसून संबंधित महाविद्यालये व परिसंस्थांना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ च्या संलग्नीकरणविषयक परवानगी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ तसेच संबंधित शिखर संस्था/परिषद/नियामक मंडळ/प्राधिकरण, भारत सरकार, महाराष्ट्र शासन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या तरतूदींनुसार त्याचप्रमाणे संबंधित शासन मान्यतेच्या अधीन (लागू असल्यास) राहून देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२ (७) मधील तरतूदींनुसार मा. कुलगुरू यांना जर, तातडीने कार्यवाही करण्यासारखी निकडीची परिस्थिती आहे असे रास्त कारणांवरून किंवा विद्यापीठाच्या हितासाठी कोणतीही कार्यवाही करणे आवश्यक आहे, असे वाटले तर, ते त्यांस आवश्यक वाटेल अशी कार्यवाही करण्याचे अधिकार आहेत.

सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०८ आणि कलम ११० मधील तरतूदी आणि उपरोक्त शासन आदेशातील तरतूदींच्या तसेच पूर्वी प्रवेशित विद्यार्थी, नियुक्त शिक्षक यांच्या दायित्वाबाबतचे रु.५००/—च्या स्टॅपपेपरवरील नोंदणीकृत हमीपत्र सादर करण्याच्या, शुल्क भरण्याच्या व विद्यार्थी प्रवेश क्षमतेस शासनाची मान्यता घेण्याच्या अधीन राहून पहिल्यावेळेचे संलग्नीकरणास परवानगी देण्याबाबत संदर्भ क्र. सीए/१४११, दि. १४ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये संबंधित संस्थेस कळविण्यात आलेले आहे. तसेच सदर परिसंस्थेचे नाव केंद्रिभूत प्रवेश प्रकियेमध्ये समाविष्ट होण्याकरिता, संलग्नता चालू ठेवण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

सदर प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या माहितीसाठी सादर.

ठराव

वि. प. क्र. १०पीए/१०/२०२१, दि. २८ ऑक्टोबर, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मा. कुलगुरु यांनी मा. विद्यापरिषदेच्या वतीने घेतलेल्या निर्णयाची कार्यवाहीसह नोंद घेण्यात येत आहे.

क ११पीए/११/२०२१ **अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून नवीन संस्था सुरू करणे, तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत अस्तित्वात असलेल्या विनाअनुदानित अभियांत्रिकी, व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ, पूर्वी कमी केलेली प्रवेशक्षमता पूर्ववत करणे, तुकडी पूर्ण करणे, प्रादेशिक भाषेतील नवीन अभ्यासक्रम सुरू करणे इ. च्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाबाबत...**

(टिप : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून मा. अवरसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचा शासन निर्णय क्र. टीईएम—२०२१/प्र.क्र. १२४/तांशि—४, दि. १८ ऑगस्ट, २०२१ सोबतच्या परिशिष्ठ 'अ' 'ब' 'क' आणि 'ड' मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे नवीन संस्था सुरू करणे तसेच विनाअनुदानित अभियांत्रिकी, व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ, पूर्वी कमी केलेली प्रवेश क्षमता पूर्ववत करणे, तुकडी पूर्ण करणे, प्रादेशिक भाषेतील नवीन अभ्यासक्रम सुरू करणे इ. बाबत शासनाची मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार मान्यता मिळालेल्या अभियांत्रिकी व व्यवस्थापनशास्त्र या महाविद्यालये/परिसंस्थांमधील अभ्यासक्रमांची यादी केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेकरिता पाठवावी लागते. त्यानुसार संबंधीत अभ्यासक्रमांचा केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश करण्याकरिता महाविद्यालये/परिसंस्था यांना विद्यापीठाच्या मान्यतेचे पत्र सोबत जोडणे आवश्यक असते.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ११० (१) अनुसार नवीन व्यवस्थापन संस्था सुरू करणे तसेच विनाअनुदानित अभियांत्रिकी, व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ, पूर्वी कमी केलेली प्रवेश क्षमता पूर्ववत करणे, तुकडी पूर्ण करणे, प्रादेशिक भाषेतील नवीन अभ्यासक्रम सुरू करणे इ. बाबत मा. विद्यापरिषदेच्या मान्यतेने परवानगी देण्याबाबत तरतूद आहे.

सदरहू परवानगीचे पत्र त्वरित मिळणेबाबत संबंधित महाविद्यालयांकडून/परिसंस्थांकडून वारंवार विनंती व विचारणा होत असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२ (७) मधील तरतूदींनुसार मा. कुलगुरू यांना जर, तातडीने कार्यवाही करण्यासारखी निकडीची परिस्थिती आहे असे रास्त कारणांवरून किंवा विद्यापीठाच्या हितासाठी कोणतीही कार्यवाही करणे आवश्यक आहे, असे वाटले तर, ते त्यांस आवश्यक वाटेल अशी कार्यवाही करण्याचे अधिकार आहेत.

उपरोक्तनुसार शैक्षणिक वर्ष २०२१—२२ करिता केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत सदर महाविद्यालयांची/परिसंस्थांची नावे समाविष्ट करण्याकरिता संलग्नीकरणाची प्रक्रिया करुन संबंधितांची नावे उच्च शिक्षण, मुंबई यांना कळविण्याकरिता टिपणी सादर केलेली होती. मा. कुलगुरु यांनी मा. विद्यापरिषदेच्या वतीने संलग्नीकरणाची परवानगी/मान्यता देण्याकरिता कार्यालयीन टिपणी क्रमांक सीए/१५३, दि. २४ ऑगस्ट, २०२१ अन्वये मान्यता/मंजूरी दिलेली आहे.

त्यानुसार महाविद्यालयांना/परिसंस्थांना संलग्नीकरणाची पत्र देण्यात आलेली आहेत. सदर प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या माहितीसाठी सादर.)

ठराव

वि. प. क्र. ११पीए/११/२०२१, दि. २८ ऑक्टोबर, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मा. कुलगुरु यांनी मा विद्यापरिषदेच्या वतीने घेतलेल्या निर्णयाची कार्यवाहीसह नोंद घेण्यात येत आहे.

क १२पीए/१२/२०२१ शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिटयूट संचलित समर्थ विधी महाविद्यालय, बेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणेअभ्यासक्रम—बी.ए. एलएल.बी. (विद्यार्थी प्रवेश क्षमता—६०)) या महाविद्यालयाच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाबाबत.

(टिप: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०९ मधील तरतूदींनुसार आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/ मशि—४, दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ अन्वये विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दती आणि निकषांनुसार माहेडने मंजूर केलेल्या पंचवार्षिक योजनेनुसार शैक्षणिक वर्ष २०१९—२० साठी नवीन महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करणेसाठी विद्यापीठ जाहीर प्रकटन/जाहिरात क्र. ६६, दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ प्रसिध्द करण्यात आले होते

उपरोक्त जाहीर प्रकटनास/जाहिरातीस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० साठी पुढील विवरणात नमूद नवीन महाविद्यालयाचा प्रस्ताव उपरोक्त नमूद दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयामधील २.३ (क) मधील तरतूदीनुसार तसेच विहित प्रक्रियेद्वारे विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसारच्या मंजूरीच्या शिफारशींसह विद्यापीठाचे पत्र संदर्भ क्र. सीए/२७३२, दिनांक २९/११/२०१८ अन्वये शासनास सादर करण्यात आला होता.

संस्था व महाविद्यालयाचे नाव व पत्ता	**प्रस्तावित विद्याशाखा/अभ्यासक्रम**
संस्थेचे नाव पत्ता: समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिटयूट, मु.पो. राजुरी, ता. जुन्नर, जि. पुणे **महाविद्यालयाचे नाव व पत्ता:** समर्थ विधी महाविद्यालय, बेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे— ४१२ ४१०	**मानवविज्ञान विद्याशाखा:—** बी.ए.एलएल.बी. (पाच वर्षे कालावधी) (विद्यार्थी प्रवेशक्षमता— ६०)

उपरोक्त पदवी अभ्यासक्रमाचे नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांसंदर्भात विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसारच्या शिफारसींस अनुसरून उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. मान्यता—२०१९/(०१/१९)/मशि—४, दिनांक ३१ जानेवारी, २०१९ नुसार सदरहू महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० साठी इरादापत्र मंजूर करण्यात आलेले आहे.

उक्त शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी, २०१९ अन्वये विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० साठी इरादापत्र मंजूर करण्यात आलेली पदवी अभ्यासक्रमांची संबंधित नवीन महाविद्यालये शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० पासून सुरू करण्यासंदर्भात संबंधित संस्थेकडून प्राप्त झालेले अनुपालन अहवाल हे विहित प्रक्रियेद्वारे विद्यापीठाच्या मंजूरीसंदर्भातील शिफारसी व आवश्यक त्या कागदपत्रांसह शासनाकडे अंतिम मान्यतेकामी विद्यापीठ पत्र संदर्भ क्र. सीए/४३१, दिनांक २४ एप्रिल, २०२० अन्वये सादर करण्यात आले होते.

उक्त अनुपालन अहवालांस व विद्यापीठाच्या शिफारसींस अनुसरून उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र.: मान्यता २०१९/(१३३/१९)/मशि—४, दिनांक १५ जून, २०१९ व शासन शुध्दीपत्र क्र. मान्यता—२०१९/(२४६/१९)/मशि—४, दिनांक २६ ऑगस्ट, २०१९ अन्वये विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० पासून समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिटयूट संचलित समर्थ विधी महाविद्यालय, बेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे (प्रस्तावित अभ्यासक्रम —बी.ए.एलएल.बी.—५ वर्षे, (विद्यार्थी प्रवेश क्षमता—६०)) या महाविद्यालयास अंतिम मान्यता देण्यात आलेली आहे. (सोबत शासन आदेश)

उक्त शासन निर्णय दिनांक १५ जून, २०१९ अन्वये अंतिम मान्यताप्राप्त नवीन महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० पासून सुरू करण्यासंदर्भात संबंधित संस्थेने मा. शिक्षण सह—संचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे यांचे प्रमाणपत्र जा.क्र.ससं/उशि/पुवि/नवीन महा./साफुपुवि/२०१९/१७०४, दिनांक २१ जून, २०१९ सादर केलेले होते.

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शासन आदेशान्वये मंजूर करण्यात आलेले उक्त नमूद नवीन महाविद्यालयास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ११० मधील तरतूदींनुसार तसेच **बार कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता घेण्याच्या अटीवर** शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० साठी पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्यास मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार संबंधित नवीन महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० साठी पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्यात आल्याबाबत संदर्भ क्र. सीए/१०६४, दिनांक ०२/०७/२०१९ रोजीच्या पत्रान्वये संबंधित संस्थेस कळविण्यात आलेले आहे. तथापि, सदर महाविद्यालयास बार कौन्सिल ऑफ इंडियाची परवानगी न मिळाल्याने महाविद्यालय सुरू होऊ शकले नाही.

शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० पासून बार कौन्सिल ऑफ इंडिया (बी.सी.आय.), नवी दिल्ली च्या मंजूरीच्या अधीन राहून संलग्नीकरण देण्यात आलेल्या समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिटयूटचे समर्थ विधी महाविद्यालय, बेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे— ४१२ ४१० या महाविद्यालयास बी.सी.आय यांनी त्यांच्या दिनांक ११ ऑगस्ट, २०१९ (प्रकरण क्र. २४१/२०१९) च्या निर्णयानुसार सदरहू महाविद्यालयास परवानगी नाकारली असून, **सदरहू निर्णयास उक्त संस्थेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ४९४१/२०२० अन्वये आव्हान दिलेले होते. सदर याचिकेवरील दिनांक १० ऑगस्ट, २०२१ व दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ चे आदेश सोबत जोडले आहेत.**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र.: न्यायाप्र—२०२१/(१४/२१)/ मशि—४, दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ नुसार मा. उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेता प्रस्तुत प्रकरणी बार कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या मान्यतेच्या तसेच याचिका क्र. ७४७९/२०२० मधील न्यायालयाच्या अंतिम निर्णयांच्या अधीन राहून उक्त नमूद विधी महाविद्यालयाची अंतिम मान्यता शासनाने विहित केलेल्या तसेच सदर शासन निर्णयातील अटी व शर्तींच्या अधीन राहून कायम विनाअनुदान तत्वावर शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पर्यंत सुरू ठेवण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ अन्वयेच्या शासन आदेशानुसार उक्त संस्थेने मा. शिक्षण सह–संचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे यांचे प्रमाणपत्र जा.क्र. शिससं/उशि/पुवि/पुणे/साफुपुवि/२०२०–२१/३०९४, दिनांक २५/०८/२०२१ सादर केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ११० मधील तरतूदींनुसार उक्त शासन आदेशान्वये अंतिम मान्यता देण्यात आलेल्या नवीन महाविद्यालयांना पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्याचे अधिकार हे विद्यापीठाच्या मा. विद्या परिषदेस आहेत.

नजीकच्या काळात मा. विद्या परिषदेची सभा होणार नव्हती आणि संलग्नीकरणाचे पत्र त्वरीत मिळणेबाबत संबंधित महाविद्यालयांकडून/परिसंस्थांकडून वारंवार विनंती व विचारणा करण्यात येत होती.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) मधील तरतूदींनुसार मा. कुलगुरू यांना जर तातडीने कार्यवाही करण्यासारखी निकडीची परिस्थिती आहे असे रास्त कारणावरून किंवा विद्यापीठाच्या हितासाठी कोणतीही कार्यवाही करणे आवश्यक आहे असे वाटले तर, ते त्यांस आवश्यक वाटेल अशी कार्यवाही करण्याचे अधिकार आहेत.

उपरोक्तनुसार शैक्षणिक वर्ष २०२१–२२ करीता समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिटयूट संचलित समर्थ विधी महाविद्यालय, बेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे (प्रस्तावित अभ्यासक्रम –बी.ए.एलएल.बी.–५ वर्षे, (विद्यार्थी प्रवेश क्षमता–६०)) या नवीन महाविद्यालयास पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्याकरीता टिपणी सादर केलेली होती. मा. कुलगुरू यांनी मा. विद्यापरिषदेच्यावतीने सदर महाविद्यालयास पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्याकरीता टिपणी क्रमांक सीए/१५७(१), दिनांक २७/०८/२०२१ अन्वये मान्यता/मंजूरी दिलेली आहे. तद्नंतर संबंधित महाविद्यालयास संदर्भ पत्र क्र. सीए/१२८८, दि. ३१ ऑगस्ट, २०२१ नुसार संलग्नीकरणाचे पत्र देण्यात आलेले आहे.

सदरचा 'क' प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या माहितीसाठी सादर.

ठराव

वि. प. क्र. १२ पीए/१२/२०२१, दि. २८ ऑक्टोबर, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मा. कुलगुरू यांनी मा. विद्यापरिषदेच्या वतीने घेतलेल्या निर्णयाची कार्यवाहीसह नोंद घेण्यात येत आहे.

क १३पीए/१३/२०२१ शैक्षणिक वर्ष २०२१—२२ पासून एकाच व्यवस्थापनामार्फत सुरु असलेल्या संस्था विलीन करण्यास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर संलग्नीकरणास परवानगी देण्याबाबत...

(टिप : मा. संचालक, जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड मॅनेजमेंट, गट नं. १२००, डोमखेल रोड, वाघोली, पुणे ४१२ २०७ यांनी संदर्भ क्र. जीएचआरसीईएम/ॲडमिन/२०२१/२२४, दि. १७.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये खाली नमूद **एकाच व्यवस्थापनामार्फत सुरु असलेल्या स्वायत्त** अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयामध्ये स्वायत्त अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे आणि व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमाच्या परिसंस्थेचे विलीनीकरण केल्यानंतर सदर महाविद्यालयास संलग्नीकरण मिळण्याबाबत विनंती केलेली होती. सोबत सदरहू पत्र जोडले आहे.

मा. अध्यक्ष, जी एच रायसोनी एज्युकेशनल ॲण्ड मेडीकल फौंडेशन ३४५, श्रध्दा हाऊस, ६ वा मजला, किंग्जवे, नागपूर ४४०००१ यांचे संदर्भ पत्र क्र. जीएचआरईएमएफ/ जीएचआरआयएमआर—पी/२०२०—२१/०१८३, दि. ०७/१०/२०२० रोजीच्या पत्रांन्वये विद्यापीठाचे 'ना हरकत प्रमाणपत्र' देणेबाबत केलेल्या विनंती नुसार संदर्भ पत्र क्र. सीए/५२३, दि. १४ मे, २०२१ 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यात आलेले आहे.

गट नं. १२००, डोमखेल रोड, वाघोली, पुणे—४१२२०७ या एकाच परिसरात चालू असलेल्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता असलेले व प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित **जी एच रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंट, वाघोली, पुणे या स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात,** जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, वाघोली, पुणे **या स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाचे** आणि जी एच रायसोनी इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, वाघोली, पुणे या **मान्यताप्राप्त व्यवस्थापन संस्थेचे एकत्रीकरण** करणे.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ करिता प्रसिध्द केलेल्या प्रोसेस हॅंडबुकमधील मुद्दा क्र. २.१० मध्ये नमूद केल्यानुसार एकाच परिसरामध्ये चालू असलेल्या एकाच ट्रस्ट/सोसायटी/कंपनी संचलित संस्थांचे विलिनीकरण करण्याबाबत तरतूद व कार्यपद्धती विषद करण्यात आलेली आहे.

गट नं. १२००, डोमखेल रोड, वाघोली, पुणे ४१२ २०७ या एकाच परिसरात चालू असलेल्या व प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या **जी एच रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंट, वाघोली, पुणे (पालक संस्था/महाविद्यालय)** या **महाविद्यालयात** जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, वाघोली, पुणे **या स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाचे** आणि जी एच रायसोनी इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, वाघोली, पुणे या **मान्यताप्राप्त व्यवस्थापन संस्थेचे एकत्रीकरण** करून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी पत्र क्र. वेस्टर्न/१—९३२१२०७१२५/ २०२१/इओए/कोरिगेंडम—१, दि. २९ जुलै, २०२१ नुसार मान्यता दिलेली आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्र. टीईएम—२०२१/प्र.क्र.१२७/तांशि—४, दि. १० ऑगस्ट, २०२१ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून एकाच व्यवस्थापनामार्फत सुरू असलेल्या संस्था विलीन करण्यास खालीलप्रमाणे शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

अ. क्र.	शासन निर्णयातील अनु. क्र. (१)	विलीन झालेल्या संस्थांची नावे व विद्यापीठ कोड (२)	विलिनीकरणानंतर संस्थेचे नाव (३)	विलिनीकरणानंतर चालविण्यात येणारे अभ्यासक्रम (४)	प्रवेश क्षमता (५)
१	४	**जी एच रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंट, गट नं. १२००, डोमखेल रोड, वाघोली, पुणे ४१२ २०७ (पालक संस्था)**	**जी एच रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंट, गट नं. १२००, डोमखेल रोड, वाघोली, पुणे ४१२ २०७**	**पदवी** १. मेकॅनिकल इंजिनिअरिंग २. इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजि. ३. इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी ४. सिव्हील इंजिनिअरिंग ५. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग ६. आर्टिफिशिअल इंजिनिअरिंग ७. डाटा सायन्स ८. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग ९. मेकॅनिकल इंजिनिअरिंग १०. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग ११. इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी १२. सिव्हील इंजिनिअरिंग १३. इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन्स इंजिनिअरिंग **पदव्युत्तर पदवी** १४.मेकॅनिकल (कॅडएमई) १५.स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग १६.कॉम्प्युटर इंजिनिअरिंग १७.हिट पॉवर इंजिनिअरिंग १८.व्हीएलएसआय ॲण्ड एम्बेडेड सिस्टीम्स १९.पॉवर सिस्टीम्स २०.कंट्रोल सिस्टीम्स २१.व्हीएलएसआय डिझाईन ॲण्ड एम्बेडेड सिस्टीम्स २२.एमबीए	 ६० ६० ६० ६० १२० १२० ६० ६० ६० ६० ६० ६० ३० २४ २४ २४ १८ २४ २४ १८ १२०
		जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, **गट नं. १२००, डोमखेल रोड, वाघोली, पुणे ४१२ २०७**			
		जी एच रायसोनी इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, **गट नं. १२००, डोमखेल रोड, वाघोली, पुणे ४१२ २०७**			

उपरोक्त अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे आणि व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमाच्या परिसंस्थेचे विलिनीकरण करण्यास अखिल

भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र शासन यांच्याकडून देण्यात आलेल्या मान्यतेनुसार सदर अभ्यासक्रमांच्या संलग्नतेमध्ये बदल झालेला आहे.

अभियांत्रिकी/वास्तुविद्याशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र व व्यवस्थापनशास्त्र या महाविद्यालये/परिसंस्थांमधील अभ्यासक्रमांची यादी केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेकरिता पाठवावी लागते. त्यानुसार संबंधीत अभ्यासक्रमाचा केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश करण्याकरिता महाविद्यालयांना विद्यापीठाच्या मान्यतेचे पत्र सोबत जोडणे आवश्यक असते.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२ (७) मधील तरतूदींनुसार मा. कुलगुरू यांना जर, तातडीने कार्यवाही करण्यासारखी निकडीची परिस्थिती आहे असे रास्त कारणांवरून किंवा विद्यापीठाच्या हितासाठी कोणतीही कार्यवाही करणे आवश्यक आहे, असे वाटले तर, ते त्यांस आवश्यक वाटेल अशी कार्यवाही करण्याचे अधिकार आहेत.

उक्त शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाच्या बदलास मान्यता/परवानगी देण्याचे अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ३३ (१) (ड), कलम ३३ (१) (ढ), कलम ११५ आणि कलम १०९ मधील तरतूदींनुसार विद्यापीठाच्या मा. विद्यापरिषदेस आहेत.

उपरोक्तनुसार शैक्षणिक वर्ष २०२१—२२ करिता केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत सदर महाविद्यालयांची नावे समाविष्ट करण्याकरिता संलग्नीकरणाची प्रक्रिया करुन महाविद्यालयाचे नावे उच्च शिक्षण, मुंबई यांना कळविण्याकरिता टिपणी सादर केलेली होती. मा. कुलगुरु यांनी कार्यालयीन टिपणी क्रमांक सीए/१६०, दि. २८ ऑगस्ट, २०२१ अन्वये मान्यता/मंजूरी दिलेली असल्याने त्यानुसार संदर्भ पत्र क्र. सीए/१३८४, दि. ०८ सप्टेंबर, २०२१ अन्वये महाविद्यालयास कळविण्यात आलेले आहे.

सदर प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या माहितीसाठी सादर.

ठराव

वि. प. क्र. १३ पीए/१३/२०२१, दि. २८ ऑक्टोबर, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मा. कुलगुरु यांनी मा. विद्यापरिषदेच्या वतीने घेतलेल्या निर्णयाची कार्यवाहीसह नोंद घेण्यात येत आहे.

क १४ पीए/१४/२०२१ **अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली दिलेल्या मान्यतेस व महाराष्ट्र शासनाच्या मंजूरीस अनुसरून भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ फाईन आर्ट्स, पुणे – सातारा रोड, पुणे – ४११ ०४३ या संलग्नित महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ पासून 'बॅचलर ऑफ फाईन आर्ट्स (पेंटिंग) (४ वर्षे कालावधी) (विद्यार्थी प्रवेश क्षमता ३०)' या पदवी अभ्यासक्रमास पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्याबाबत.....**

(टिप : मा. प्रभारी प्राचार्य, भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ फाईन आर्ट्स, पुणे – सातारा रोड, पुणे – ४११ ०४३ यांचे पत्र जा. क्र. भावि/कॉऑफाआ/१४१/२०२१–२२, दिनांक २१ सप्टेंबर, २०२१ तसेच मा. प्र. कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई – ४०० ००१ यांचे पत्र क्र. डिओअे–२०२१/दोन/१६१३, दिनांक २० सप्टेंबर, २०२१ सोबत अवलोकनार्थ जोडले आहे.

उपरोक्त संलग्नित महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१६–२०१७ पर्यंत **'बॅचलर ऑफ फाईन आर्ट्स (पेंटिंग) (४ वर्षे कालावधी) (विद्यार्थी प्रवेश क्षमता ३०)'** हा पदवी अभ्यासक्रम राबविण्यात येत होता. सदरहू अभ्यासक्रमास अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता नसल्यामुळे विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सदरहू महाविद्यालयाला उपरोक्त अभ्यासक्रमाला शैक्षणिक वर्ष २०१७–२०१८ पासून प्रवेश देणे बंद करणेबाबत आदेश दिलेले आहेत.

विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे हित लक्षात घेत उक्त संस्थेने व महाविद्यालयाने उपरोक्त अभ्यासक्रमाला शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ साठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता घेण्याचे ठरविले असल्याचे व सदरहू अभ्यासक्रमास उक्त शिखर परिषदेची मान्यता घेण्यासाठी विहित नमुन्यात प्रस्तुत विद्यापीठाचे 'ना हरकत प्रमाणपत्र' देणेबाबत उपरोक्त संलग्नित महाविद्यालयाने दिनांक २५ मार्च, २०२१ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली होती.

उपरोक्त महाविद्यालयाने वरील दिनांक २५ मार्च, २०२१ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने नजीकच्या काळात मा. व्यवस्थापन परिषदेची सभा होणार नसल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२ (७) मधील तरतूदींनुसार मा. कुलगुरू यांनी मा. व्यवस्थापन परिषदेच्यावतीने प्रस्तुत विभागाच्या टिपणी क्र. सीए/६५, दिनांक ९ एप्रिल, २०२१ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार उपरोक्त संलग्नित महाविद्यालयास 'बॅचलर ऑफ फाईन आर्ट्स (पेंटिंग) (४ वर्षे कालावधी) (विद्यार्थी प्रवेश क्षमता ३०)' या पदवी अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ साठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता घेण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठाचे 'ना हरकत प्रमाणपत्र' (संदर्भ क्र. सीए/४३७, दिनांक १२ एप्रिल, २०२१) देण्यात आलेले आहे.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी पत्र क्र. F. No. Western/1-9317851659/ 2021/EOA, दिनांक ३० जून, २०२१ (Extension of approval) अन्वये उपरोक्त संलग्नित महाविद्यालयास 'बॅचलर ऑफ फाईन आर्ट्स (पेंटिंग) (४ वर्षे कालावधी) (विद्यार्थी प्रवेश क्षमता ३०)' या पदवी अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ साठी मान्यता दिलेली आहे. तसेच सदरहू अभ्यासक्रमास उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एडीआर–२०२१/प्र.क्र.५५/तांशि६, दिनांक १ सप्टेंबर, २०२१ अन्वये 'कायम विना अनुदान तत्वावर' मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच मा. प्र. कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई – ४०० ००१ यांनी उपरोक्त महाविद्यालयामध्ये उक्त अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ पासून सुरू करण्यास उक्त शासन निर्णय दिनांक १ सप्टेंबर, २०२१ मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून तसेच संचालनालय व शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे पालन करण्याच्या अटीच्या अधीन राहून मान्यता दिलेली आहे. तसेच उपरोक्त महाविद्यालयाचा उक्त अभ्यासक्रम हा शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये बी. एफ. ए. समाईक प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सदरहू महाविद्यालयास उपरोक्त अभ्यासक्रमास

संलग्नीकरण देणेबाबत वरील महाविद्यालयाने उक्त पत्र दिनांक २१ सप्टेंबर, २०२१ अन्वये विनंती केलेली आहे.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून उपरोक्त पत्रान्वये देण्यात आलेल्या मान्यतेनुसार आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय **क्र. एडीआर–२०२१/प्र.क्र. ५५/तांशि६, दिनांक १ सप्टेंबर, २०२१** अन्वये देण्यात आलेल्या मंजूरीनुसार व **मा. प्र. कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई – ४०० ००१ यांचे पत्र क्र. डिओए–२०२१/दोन/१६१३, दिनांक २० सप्टेंबर, २०२१ अन्वयेच्या मान्यतेनुसार भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ फाईन आर्ट्स, पुणे – सातारा रोड, पुणे – ४११ ०४३ या महविद्यालयास** 'बॅचलर ऑफ फाईन आर्ट्स (पेंटिंग) (४ वर्षे कालावधी) (विद्यार्थी प्रवेश क्षमता ३०)' या पदवी अभ्यासक्रमास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०८ आणि कलम ११० मधील तरतूदी तसेच उपरोक्त शासन निर्णयातील अटी व शर्तींच्या आणि विद्यापीठ अनुदान आयोग/अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद/संबंधित शिखर संस्था/परिषद/नियामक मंडळ/प्राधिकरण व भारत सरकार, महाराष्ट्र शासन, कला संचालनालय, प्रस्तुत विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या व येणाऱ्या नियम, आदेश, परिनियम, अध्यादेश, मार्गदर्शक तत्वे इत्यादींमधील तरतूदींच्या तसेच कला संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या मंजूरीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ साठी पहिल्या वेळेचे संलग्नीकरणविषयक परवानगी देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ३३ (ढ) मधील तरतूदींनुसार महाविद्यालयांना संलग्नीकरण तसेच कलम ११० (१) मधील तरतूदींनुसार नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, विद्याशाखा इत्यादींना पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्याचे अधिकार विद्यापीठाच्या मा. विद्या परिषदेस आहेत.

उपरोक्त अभ्यासक्रमास लवकरात लवकर संलग्नीकरण देणेबाबत उपरोक्त महाविद्यालयाकडून वारंवार विनंती व विचारणा करण्यात येत असल्याने उद्‌भवलेल्या तातडीच्या परिस्थितीमुळे मा. कुलगुरू यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी उपरोक्त दिनांक ३० जून, २०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या मान्यतेनुसार आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एडीआर–२०२१/प्र.क्र.५५/तांशि६, दिनांक १ सप्टेंबर, २०२१ अन्वये देण्यात आलेल्या मंजूरीनुसार **भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ फाईन आर्ट्स, पुणे – सातारा रोड, पुणे – ४११ ०४३ या महविद्यालयास 'बॅचलर ऑफ फाईन आर्ट्स (पेंटिंग) (४ वर्षे कालावधी) (विद्यार्थी प्रवेश क्षमता ३०)' या अभ्यासक्रमास** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०८ आणि कलम ११० मधील तरतूदी तसेच उपरोक्त शासन निर्णयातील अटी व शर्तींच्या आणि विद्यापीठ अनुदान आयोग/अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद/संबंधित शिखर संस्था/परिषद/नियामक मंडळ/प्राधिकरण व भारत सरकार, महाराष्ट्र शासन, कला संचालनालय, प्रस्तुत विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या व येणाऱ्या नियम, आदेश, परिनियम, अध्यादेश, मार्गदर्शक तत्वे इत्यादींमधील तरतूदींच्या अधीन राहून **शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ साठी पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्यास** मा. विद्यापरिषदेच्या वतीने कार्यालयीन टिपणी क्रमांक सीए/१८२, दि. ३०/०९/२०२१ अन्वये उपरोक्त शासन निर्णयात नमूद केलेल्या अभ्यासक्रमास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०८ आणि कलम ११० मधील तरतुदींचे पालन करण्याच्या अटीवर तसेच कायम विनाअनुदानित तत्त्वावर परवानगी देण्यात आलेली आहे.

ठराव

वि. प. क्र. १४ पीए/१४/२०२१, दि. २८ ऑक्टोबर, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मा. कुलगुरु यांनी मा. विद्यापरिषदेच्या वतीने घेतलेल्या निर्णयाची कार्यवाहीसह नोंद घेण्यात येत आहे.

क १५ पीए/१५/२०२१ **शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ या एका वर्षासाठी असामान्य परिस्थितीत विशिष्ट विद्याशाखांच्या नवीन अतिरिक्त तुकड्यांना जलदगती पध्दतीने मंजूर करण्यात आलेल्या नवीन अतिरिक्त तुकडयांना संलग्नीकरण देणेबाबत....**

(टिप : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा दिनांक ०१ मार्च, २०१७ पासून अंमलात आलेला आहे. सदरहू अधिनियमातील कलम १०९ (८) मध्ये असामान्य परिस्थितीत विशिष्ट विद्याशाखांच्या नवीन तुकड्यांच्या मंजूरीसंदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे. (सोबत तरतूदीची प्रत)

मा. शिक्षण सहसंचालक (प्रशासन), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे—०१ यांचे पत्र संदर्भ क्र. युएनआय/(८२/२१)/ विशि—१/८९३१, दिनांक १० ऑगस्ट, २०२१ रोजीच्या पत्रान्वये विद्यापीठांनी अधिनस्थ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांचे जलदगती कार्यपध्दतीने नवीन अतिरिक्त तुकडी मागणीचे प्रस्ताव तात्काळ विद्यापीठ स्तरावरून मागविण्यात यावे तसेच सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी—२०१७/ (१२८/१७)/ मशि—४, दिनांक ०४ जुलै, २०१७ मध्ये नमूद केलेल्या तरतूदीच्या अनुषंगाने छाननी करून शासन निर्णयातील निकष पूर्ण करणारे प्रस्ताव शासनास दिनांक २० ऑगस्ट, २०२१ पर्यंत सादर करण्याबाबत आदेश/निर्देश देण्यात आलेले होते. (सोबत पत्र)

मा. कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई—३२ यांचे पत्र क्र. बैठक—२०२१/प्र.क्र. १६१/विशि—३, दिनांक ०५ ऑगस्ट २०२१ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशनानुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या मा. विद्यापरिषदेच्या ठराव क्र. वि.प.क्र. अ १४ पीए/१४/२०२१, दिनांक १० ऑगस्ट, २०२१ अन्वये समिती नेमण्याचे व समितीच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. यानुसार मा. कुलगुरू यांनी यांनी डॉ. पराग काळकर यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्य डॉ. राजेंद्र झुजारराव आणि डॉ. के. एल. गिरमकर यांची समिती गठीत केली होती. सदर समितीचा अहवाल मा. कुलगुरू यांनी शैक्षणिक विभागाने सादर केलेल्या टिपणी क्र. सीए/१४६, दिनांक १३ ऑगस्ट, २०२१ अन्वये स्वीकारला आहे. सदर अहवालास अनुसरून प्राप्त झालेल्या आदेशानुसार शैक्षणिक विभागाच्या पत्र संदर्भ क्र. सीए/१२०१, दिनांक १३ ऑगस्ट, २०२१ अन्वये सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदी आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी—२०१७/(१२८/१७)/ मशि—४, दिनांक ०४ जुलै, २०१७ अन्वयेच्या निकष आणि कार्यपध्दतीनुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गतची संलग्नित महाविद्यालयांकडून विषयांकित बाबीसंदर्भातील प्रस्ताव मागविण्यात आलेले होते.

प्राप्त आदेशानुसार संबधित प्रस्ताव विद्यापीठ पत्र संदर्भ क्र. सीए/१२३७, दिनांक १९/०८/२०२१ अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनास सादर केले.

उपरोक्त तरतूदीनुसार उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी— २०२१/(१९६/२१)/मशि—४, दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ अन्वये विद्यापीठाशी संलग्नित कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमांच्या एकूण २९ महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी जलदगती पध्दतीने नवीन अतिरिक्त तुकडयांना मंजूरी दिलेली आहे. सोबत सदरहू शासन निर्णयाची प्रत जोडली आहे. (सोबत शासन निर्णय)

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ११० (१) नुसार अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांना नवीन विषय/विशेषस्तर विषय/ अभ्यासक्रम, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडया सुरू करण्यासाठी मा. विद्यापरिषदेकडून पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणास मंजूरी देण्याबाबतची तरतुद आहे.

उपरोक्त शासन निर्णय दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२१ — २०२२ साठी जलदगती पध्दतीने मंजूर करण्यात आलेल्या नवीन अतिरिक्त तुकडयांना पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देणे आवश्यक असल्याने व त्याबाबाबत संबंधित संलग्नित महाविद्यालयांकडून विचारणा व मागणी होत असल्यने उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२ (७) मधील तरतूदींनुसार मा. कुलगुरू यांनी मा. विद्या परिषदेच्यावतीने, उपरोक्त शासन निर्णय दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ मधील अटी व शर्तींनुसार मा. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन यांचे संबंधित प्रमाणपत्र प्राप्त होणाऱ्या संलग्नीत महाविद्यालयांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ११० तसेच उपरोक्त शासन निर्णय आणि पत्रं यांमधील अटी व शर्तींच्या अधीन राहून जलदगती पध्दतीने नवीन अतिरिक्त तुकडयांना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्यास मा. कुलगुरू यांनी टिपणी क्र. सीए/१६४ दिनांक ०३/०९/२०२१ अन्वये मा. विद्यापरिषदेच्या वतीने दिलेल्या मंजूरीनुसार, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ११० तसेच उपरोक्त शासन निर्णय आणि आदेश यामधील अटी व शर्तींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२१ — २०२२ साठी जलदगती पध्दतीने मंजूर करण्यात आलेल्या नवीन अतिरिक्त तुकडयांना संलग्नीकरण देण्यात आलेले आहे.

सदर तुकडीचे नियमितीकरणाच्या तसेच नैसर्गिक वाढ/विस्तारीकरण संदर्भातील प्रस्ताव हे दिनांक ३० सप्टेंबर पूर्वी सादर करण्यासाठी असलेले वेळेचे बंधन विचारात घेऊन मा. कुलगुरू यांनी ‘ मा. विद्या परिषद’ या विद्यापीठ अधिकार मंडळाच्या वतीने केलेल्या कार्यवाहीसंदर्भात सदर प्रस्ताव मा. विद्यापरिषदेस माहितीसाठी सादर.

ठराव

वि. प. क्र. १५ पीए/१५/२०२१, दि. २८ ऑक्टोबर, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मा. कुलगुरु यांनी मा. विद्यापरिषदेच्या वतीने घेतलेल्या निर्णयाची कार्यवाहीसह नोंद घेण्यात येत आहे.

क १६पीए/१६/२०२१ शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी अंतिम मान्यताप्राप्त नवीन महाविद्यालयांच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाबाबत.....

(टिप : विषयांकित बाबीसंदर्भातील प्रस्तुत विभागाची टिपणी क्र. सीए/१६७, दिनांक ०९ सप्टेंबर, २०२१ सोबत अवलोकनार्थ जोडली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०९ मधील तरतूदींनुसार आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि—४, दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ अन्वये विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दती आणि निकषांनुसार विद्यापीठ जाहीर प्रकटन/जाहिरात क्र. २१, दिनांक २२ डिसेंबर, २०२० आणि शुध्दिपत्रक दिनांक २८ डिसेंबर, २०२० ला अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत पदवी अभ्यासक्रमांची नवीन महाविद्यालये सुरू करण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांसंदर्भात विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसारच्या शिफारसींस अनुसरून उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी—२०२१/(१/२१)/मशि—४, दिनांक १५ एप्रिल, २०२१ अन्वये विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी पदवी अभ्यासक्रमाच्या एकूण १२ नवीन महाविद्यालयांना इरादापत्र मंजूर करण्यात आलेले आहे.

उक्त शासन निर्णय दिनांक १५ एप्रिल, २०२१ अन्वये विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी इरादापत्र मंजूर करण्यात आलेली पदवी अभ्यासक्रमांची संबंधित एकूण १० नवीन महाविद्यालये शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून सुरू करण्यासंदर्भात संबंधित संस्थांकडून प्राप्त झालेले अनुपालन अहवाल हे विहित प्रक्रियेद्वारे विद्यापीठाच्या मंजूरीसंदर्भातील शिफारसी व आवश्यक त्या कागदपत्रांसह शासनाकडे अंतिम मान्यतेकामी विद्यापीठ पत्र संदर्भ क्र. सीए/६४९, दिनांक १७ जून, २०२१ सादर करण्यात आले होते. (सोबत पत्रं)

उपरोक्त अनुपालन अहवालांस व विद्यापीठाच्या शिफारसींस अनुसरून उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. एनजीसी २०२१/(१८५/२१)/ मशि—४, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१ अन्वये विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी सदरहू शासन निर्णयात नमूद पदवी अभ्यासक्रमांच्या एकूण १० नवीन महाविद्यालयांना अंतिम मान्यता देण्यात आलेली आहे. (सोबत शासन आदेश)

उक्त शासन निर्णय दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१ अन्वये अंतिम मान्यताप्राप्त नवीन महाविद्यालये शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ पासून सुरू करण्यासंदर्भात महात्मा फुले विद्या प्रतिष्ठान संचलित शांताबाई शिवराम पवार कॉलेज, आंबेगाव (बु.), पुणे महानगरपालिका हद्द, जि. पुणे — ४११ ०४६ या महाविद्यालयास मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, महाराष्टऊ शासन, पुणे — ४११ ००१ यांचे प्रमाणपत्र जा. क्र. ससं/उशि/पुवि/२०२१—२२/नमवि—अभ्यासक्रम—तु.वि./२०२१/३२२९, दिनांक ०३ सप्टेंबर, २०२१ सादर करून संबंधित नवीन महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच उर्वरित संस्थांकडून संबंधित प्रमाणपत्र सादर करण्यात येऊन संबंधित नवीन महाविद्यालयांस शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देणेबाबत आगामी काळात विनंती पत्र सादर होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ११० मधील तरतूदींनुसार नवीन महाविद्यालयांना पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्याचे अधिकार हे विद्यापीठाच्या मा. विद्या परिषदेस आहेत.

सदरहू सभेतील निर्णयांच्या/ठरावांच्या कार्यवाहीसाठी लागणारा अवधी विचारात घेता तसेच उपरोक्त अधिनियम, शासन निर्णय/आदेश तसेच विद्यापीठ अनुदान आयोग, संबंधित शिखर संस्था/परिषद/नियामक मंडळ, केंद्र शासन, राज्य शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित/निर्धारित करण्यात आलेल्या नियम, मार्गदर्शक तत्वे, अध्यादेश, परिनियम इ. मधील तरतूदींनुसार उक्त नवीन महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देणे आवश्यक असून सदरहू संलग्नीकरण लवकरात लवकर देणेबाबत संबंधित संस्थांकडून विनंती व विचारणा करण्यात येत असल्याने उद्‌भवलेल्या तातडीच्या परिस्थितीमुळे **प्रस्तुत विभागाच्या टिपणी क्र. सीए/१६७, दिनांक ०९ सप्टेंबर, २०२१ अन्वये, मा. कुलगुरू यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२ (७) मधील तरतूदींनुसार 'मा. विद्या परिषदेच्यावतीने' उक्त शासन आदेश दिनांक** ३१ ऑगस्ट, २०२१ **अन्वये अंतिम मान्यता देण्यात आलेल्या व त्यासंदर्भात संबंधित मा. विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांचे प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या व आगामी काळात संबंधित प्रमाणपत्र प्राप्त होणाऱ्या नवीन महाविद्यालयांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ११० तसेच विद्यापीठ अनुदान आयोग, संबंधित शिखर संस्था/परिषद/ नियामक मंडळ, केंद्र शासन, राज्य शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित/निर्धारित करण्यात आलेल्या नियम, मार्गदर्शक तत्वे, अध्यादेश, परिनियम इ. मधील तरतूदींनुसार तसेच उपरोक्त शासन आदेश दिनांक** ३१ ऑगस्ट, २०२१ **मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून संबंधित नवीन महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्यास परवानगी दिलेली आहे.**

मा. कुलगुरू यांनी उपरोक्त टिपणीन्वये मा. विद्या परिषदेच्यावतीने वरीलप्रमाणे दिलेल्या मान्यतेनुसार संबंधित नवीन महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठीच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरण परवानगीबाबत कळविण्यात येत आहे.

सबब, मा. कुलगुरू यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२ (७) मधील तरतूदींनुसार उपरोक्त संबंधित नवीन महाविद्यालयांना सदरहू अधिनियमातील कलम ११० मधील तरतूदींनुसार मा. विद्या परिषदेच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठीच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाच्या परवानगीबाबत वरीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयासंदर्भात सदरचा प्रस्ताव मा. विद्या परिषदेस माहितीसाठी सादर.)

ठराव

वि. प. क्र. क १६ पीए/१६/२०२१, दि. २८ ऑक्टोबर, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. एनजीसी २०२१/(१८५/२१)/ मशि—४, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१ अन्वये अंतिम मंजूरी देण्यात आलेल्या संबंधित नवीन महाविद्यालयांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ११० तसेच विद्यापीठ अनुदान आयोग, संबंधित शिखर संस्था/परिषद/नियामक मंडळ, केंद्र शासन, राज्य शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित/निर्धारित करण्यात आलेल्या नियम, मार्गदर्शक तत्वे, अध्यादेश, परिनियम इ. मधील तरतूदींनुसार तसेच उपरोक्त शासन आदेश **दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१** मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२१—२०२२ साठी पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणास परवानगीबाबत मा. कुलगुरू यांनी विद्यापरिषदेच्या वतीने वरीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयाची मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे.

क १७पीए/१७/२०२१ स्वायत्ता दर्जा प्राप्त झालेल्या पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, प्राधिकरण, निगडी, पुणे महाविद्यालयाच्या गुणपत्रकांवर विद्यापीठाचे बोधचिन्ह (Logo) वापरण्याची परवानगी देण्याबाबत.

(टिप: मा. संचालक, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, प्राधिकरण, निगडी, पुणे यांचे दिनांक ०३/०९/२०२१रोजीचे पत्र अवलोकनार्थ सोबत जोडले आहे. सदर पत्रामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे. पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग १९९९साली स्थापन झालेले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संस्थेला कायम संलग्नीकरणाचा दर्जा दिलेला असून AICTE ने मान्यता दिलेली आहे. स्वायता दर्जा प्राप्त झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणपत्रकावर विद्यापीठाचे बोधचिन्ह (Logo) वापरण्याकरिता परवानगी मागितली आहे.

यापूर्वी विद्यापीठान 'स्वायत्ता दर्जा' प्रदान केलेल्या अशा प्रकारच्या महाविद्यालयांना विद्यापीठाचे बोधचिन्ह (Logo) वापरण्याची परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर महाविद्यालयास विद्यापीठाचे बोधचिन्ह (Logo) त्यांच्या गुणपत्रकांवर वापरण्याची परवानगी देण्यासाठी, मा. विद्यापरिषदेस प्रस्ताव सादर.

ठराव

वि. प. क्र. क १७ पीए/१७/२०२१, दि. २८ ऑक्टोबर, २०२१

असा ठराव करण्यात येतो की, मा. कुलगुरु यांनी मा. विद्यापरिषदेच्या वतीने घेतलेल्या निर्णयाची कार्यवाहीसह नोंद घेण्यात येत आहे.

(डॉ. नितीन करमळकर)	(डॉ. एन. एस. उमराणी)	(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलगुरू	प्र–कुलगुरू	कुलसचिव तथा सदस्य सचिव

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, मराठी अभ्यास मंडळ

* बैठक इतिवृत्त *

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाची बैठक बुधवार दिनांक १८ मे २०२२ रोजी सकाळी ११.३० वा. अभ्यासमंडळाचे अध्यक्ष प्रो. शिरीष सांळुखे यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठात संपन्न झाली. या बैठकीचे इतिवृत्त खालीलप्रमाणे.

ठराव क्र. १ - प्रो. डॉ. राजेंद्र सांगळे यांची प्राचार्य म्हणून निवड झाली. त्याबद्दल मराठी अभ्यासमंडळाच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.
सूचक - डॉ. शिरीष सांळुखे
अनुमोदक - डॉ. प्रकाश शेवाळे
ठराव सर्वानुमते समंत करण्यात आला.

ठराव क्र. २. - असाधारण परिस्थितीमध्ये दर्जेदार अभ्यासक्रम देण्यामध्ये अध्यक्षीय जबाबदारी समर्थपणे पार पाडली. त्याबद्दल सर्व सदस्यांच्या वतीने मा. अध्यक्ष डॉ. शिरीष सांळुखे यांचे अभ्यास मंडळाच्या वतीन हार्दिक अभिनंदन करण्यात आले.
सूचक - डॉ. संदीप सांगळे
अनुमोदक - डॉ. भास्कर ढोके
ठराव सर्वानुमते समंत करण्यात आला.

ठराव क्र. ३. T.Y.B.A च्या अंतर्गत परीक्षेबाबत चर्चा करून; मूल्यमापनाचे स्वरूप आहे तसेच ठेवावे असे सर्वानुमते ठरले.

ठराव क्र. ४. १० गुणांसाठी मुलाखत सेथन हा मुद्दा नव्याने समाविष्ठ करण्यात यावा. हे सर्वानुमते ठरले. (TYBA च्यापेपरसाठी)

ठराव क्र. ५. कार्यक्रम संयोजनातील भाषिक कौशल्ये याचे संपादकीय पुस्तक तयार करण्याचे सर्वानुमते ठरले. (SYBA/TYBA - SEC)

ठराव क्र. ६. - संस्कृती प्रकाशनाने वरील ग्रंथ (संपादित) प्रकाशित करावा. असे ठरले.

ठराव क्र.७. संदर्भ ग्रंथांचा सूची मध्ये नव्याने समावेश करण्याचे ठरले.

ठराव क्र.८. - नवीन अभ्यासक्रमाच्या कार्यशाळा घेण्यात याव्या. यावर चर्चा होऊन; सर्वानुमते कार्यशाळा घेण्याचे ठरविण्यात आले.

ठराव क्र.९. क्रेडीट सिस्टीम समजावून घेणेबाबत मराठी विषयाच्या संदर्भात कार्यशाळा घ्याव्यात. यावर चर्चा होऊन; कार्यशाळा घेण्याचे ठरविण्यात आले.

ठराव क्र.१०. संशोधन केंद्रामध्ये मार्गदर्शकाकडे ६० गुण व संशोधन केंद्राकडे - ४० गुण असावेत. असा सर्वानुमते ठराव समंत करण्यात आला.

याशिवाय आयत्या वेळच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

या बैठकीसाठी खालील सदस्य आस्थित होते.

१) डॉ सांताराम चौधरी →
२) डॉ. संदीप सांगळे →
३) डॉ. रमेंद्र सांगळे →
४) डॉ. प्रकाश शेवाळे →
५) डॉ. संजय कोळी →
६) डॉ. भास्कर ढोके →
७) डॉ. गया कदम →
८) सौ. सुनिता राने पवार →

डॉ. शिरीष सांगळे
अध्यक्ष - मराठी अभ्यास मंडळ,
सा.फु.पु.वि.भुसे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

विद्यापरिषद सभा

पुरवणी कार्यक्रमपत्रिका

अ ९ ते २४

ब १ ते १४

क ५ ते ८

==========

दि. १० जानेवारी, २०२२

'अ' प्रस्ताव

अ ९ पीए/९/२०२२ प्रोग्रेसिव एज्युकेशन सोसायटीचे, मॉर्डन कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स, गणेशखिंड, पुणे — ४११ ०१६ या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२२—२०२३ ते २०३१—२०३२ या दहा वर्षांसाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली, यांचेकडून प्रदान करण्यात आलेल्या स्वायत्तता दर्जास मान्यता मिळणेबाबत

(संलग्नता कक्ष)

(टीप : अपर सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे संदर्भ क्र. F.22-1/2017(AC), दिनांक ०७ डिसेंबर, २०२१ रोजीच्या पत्रानुसार प्रोग्रेसिव एज्युकेशन सोसायटीचे, मॉर्डन कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स, गणेशखिंड, पुणे — ४११ ०१६ या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२२—२०२३ ते २०३१—२०३२ या दहा वर्षांसाठी स्वायत्तता दर्जा प्रदान करण्यात आलेला आहे.

तसेच पत्रामध्ये त्यांनी प्रस्तुत विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयास स्वायत्तता दर्जा देण्याबाबत आवश्यक सुचना/आदेश जारी करण्यात यावेत असे निर्देशित केलेले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२२ आणि महाराष्ट्र शासन राजपत्र/अधिसूचना, दिनांक १४ जानेवारी, २०१९ अन्वये विहित करण्यात आलेल्या 'सन २०१९ चा एकरूप परिनियम क्रमांक ३' मधील तरतूदींनुसार उक्त महाविद्यालयाकडून विहित शुल्क घेऊन त्या महाविद्यालयास उपरोक्त कालावधीसाठी मा. विद्यापरिषदेच्या शिफारशीवरुन मा. व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने स्वायत्त दर्जा प्रदान करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ३३ (१) (द) नुसार महाविद्यालयास स्वायतत्ता दर्जा प्रदान करणेबाबत मा. व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्याकरिता प्रस्ताव मा. विद्यापरिषदेच्या विचारार्थ सादर.)

ठरावाचा मसुदा

वि.प. अ.९ पीए/९/२०२२, दि. १० जानेवारी, २०२२

असा ठराव करण्यात येतो की, प्रोग्रेसिव एज्युकेशन सोसायटीचे, मॉर्डन कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स, गणेशखिंड, पुणे — ४११ ०१६ या महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली, यांचे पत्र क्र. F.22-1/2017(AC), दिनांक ०७ डिसेंबर, २०२१ नुसार शैक्षणिक वर्ष २०२२—२०२३ ते २०३१—२०३२ या दहा वर्षांसाठी स्वायत्तता दर्जा प्रदान करण्यासाठी मा. व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहे/नाही.

अ १० पीए/१०/२०२२ विद्या प्रतिष्ठानचे सुपे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सुपे, तालुका बारामती, जिल्हा पुणे — ४१२ २०४ या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१७—२०१८ पासून सुरू असलेल्या बी. ए., बी. कॉम्., बी. एस्सी. अभ्यासक्रमांतील विशेषस्तर विषयांच्या पूर्वलक्षी प्रभावानेच्या मंजूरीच्या शिफारसींबाबत.

(संलग्नता कक्ष)

(टिप: मा. प्राचार्य, विद्या प्रतिष्ठानचे सुपे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सुपे, तालुका बारामती, जिल्हा पुणे — ४१२ २०४ यांची पत्रं जा. क्र. व्हीपी/एसएएससी/६०८/ २०२०—२१, दिनांक ०६/०८/२०२० आणि जा. क्र. व्हीपी/एसएएससी/६२५/ २०२०—२१, दिनांक २८/०८/२०२० सोबत जोडली आहेत.

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी—२०१२/(२४७/१२)/मशि—४, दिनांक २ सप्टेंबर, २०१३ मधील तरतूदीनुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गतच्या संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी नवीन अभ्यासक्रम, विषय, विशेषस्तर विषय, तुकडी, विद्याशाखा इ. विस्तारीकरणाबाबतचे प्रस्ताव हे विहित पध्दतीने विहित मुदतीत सादर करणे आवश्यक व क्रमप्राप्त होते.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा दिनांक १ मार्च, २०१७ पासून अंमलात आलेली आहे. सदरहू अधिनियमातील कलम १०९ (४) आणि त्याखालील परंतुकांमधील तरतूदींस तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी—२०१७/ (२०८/१७)/मशि—४, दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ अन्वये विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दती आणि निकष विहित करण्यात आलेले आहेत.

तथापि, उपरोक्त महाविद्यालयाने वरीलप्रमाणे कार्यवाही केली नसून महाराष्ट्र शासनाच्या मंजूरीशिवाय आणि विद्यापीठाच्या संलग्नीकरणाच्या परवानगीशिवाय उपरोक्त महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१७—२०१८ पासून सुरू असलेल्या पुढील विवरणात नमूद विशेषस्तर विषयांस परवानगी देणेबाबत वरील महाविद्यालयाने उक्त पत्रांन्वये विनंती केलेली आहे.

विशेषस्तर विषयांचा तपशील		
मानवविज्ञान विद्याशाखा (पूर्वीची कला विद्याशाखा)	वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा (पूर्वीची वाणिज्य विद्याशाखा)	विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा (पूर्वीची विज्ञान विद्याशाखा)
अभ्यासक्रम : बी. ए. **विशेषस्तर विषय** : १) अर्थशास्त्र २) भूगोल ३) मराठी ४) राज्यशास्त्र	**अभ्यासक्रम** : बी. कॉम्. **विशेषस्तर विषय** : १) बॅकिंग ॲण्ड फायनान्स २) कॉस्ट ॲण्ड वर्क्स अकाउंटिंग	**अभ्यासक्रम** : बी. एस्सी. **विशेषस्तर विषय** : १) रसायनशास्त्र २) प्राणीशास्त्र ३) वनस्पतीशास्त्र ४) गणित ५) भौतिकशास्त्र ६) संख्याशास्त्र

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्रमांक: मान्यता/(४६/२१) मशि—४, दिनांक २३ मार्च, २०२१ नुसार संबंधित विशेषस्तर विषयंना मंजुरी दिलेली आहे. तसेच मा. शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे — ०१ यांचे पत्र क्र. शिससं/उशि/पुवि/पुणे/साफुपुवि/२०२१/४३४८, दिनांक ०१/१२/२०२१ अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार तसेच अटी व शर्तींनुसार महाविद्यालयाने संबंधित विद्यापीठाने विहित केलेल्या निकषांनुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार अध्यापक/कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक आहे. तसेच, इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी सुविधा उपलब्धतेबाबत तसेच शासन मंजूरी आदेशातील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे अनुपालन करावे. व्यवस्थापनाच्या उपरोल्लेखीत नवीन महाविद्यालयासाठी/अभ्यासक्रमासाठी/विषयासाठी संलग्नीकरण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यास हे कार्यालय शिफारस करीत आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० (१) मधील तरतूदींनुसार नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, विद्याशाखा इत्यादींना पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्याचे अधिकार विद्यापीठाच्या मा. विद्या परिषदेस आहेत.

सबब, उक्त शासन आदेशांन्वये सदरहू अधिनियमातील कलम ११० मधील तरतूदींनुसार विद्या प्रतिष्ठानचे सुपे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सुपे, तालुका बारामती, जिल्हा पुणे — ४१२ २०४ या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१७—२०१८ पासून सुरू असलेल्या विशेषस्तर विषयांस विहित शुल्क, विलंब शुल्क, दंड/शास्ती इत्यादींच्या अधीन राहून पहिल्या वेळेच्या संलग्नीकरण देणेबाबतचा प्रस्ताव मा. विद्या परिषदेस माहितीसाठी सादर.)

ठरावाचा मसूदा

वि. प. क्र. अ १० पीए/१०/२०२२, दि. १० जानेवारी, २०२२

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०९ (४) आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी—२०१७/(२०८/१७)/मशि—४, दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्रमांक : मान्यता /(४६/२१) मशि—४, दिनांक २३ मार्च, २०२१ तसेच शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे — ०१ यांचे पत्र क्र. शिससं/उशि/पुवि/पुणे/साफुपुवि/२०२१/४३४८, दिनांक ०१/१२/२०२१ रोजीच्या पत्रामधील तरतूदींच्या तसेच विहित शुल्क, विलंब शुल्क, दंड/शास्ती इत्यादींच्या अधीन राहून, विद्या प्रतिष्ठानचे सुपे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सुपे, तालुका बारामती, जिल्हा पुणे — ४१२ २०४ या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१७—२०१८ पासून सुरू असलेल्या पुढील विवरणात नमूद विशेषस्तर विषयांस पहिल्या वेळेचे संलग्नीकरण देण्यात येत आहे/नाही.

विशेषस्तर विषयांचा तपशील		
मानवविज्ञान विद्याशाखा (पूर्वीची कला विद्याशाखा)	वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा (पूर्वीची वाणिज्य विद्याशाखा)	विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा (पूर्वीची विज्ञान विद्याशाखा)
अभ्यासक्रम : बी. ए. **विशेषस्तर विषय** : १) अर्थशास्त्र २) भूगोल ३) मराठी ४) राज्यशास्त्र	**अभ्यासक्रम** : बी. कॉम्. **विशेषस्तर विषय** : १) बॅकिंग ॲण्ड फायनान्स २) कॉस्ट ॲण्ड वर्क्स अकाउंटिंग	**अभ्यासक्रम** : बी. एस्सी. **विशेषस्तर विषय** : १) रसायनशास्त्र २) प्राणीशास्त्र ३) वनस्पतीशास्त्र ४) गणित ५) भौतिकशास्त्र ६) संख्याशास्त्र

अ ११ पीए/११/२०२२ **श्री स्वामी समर्थ विद्याप्रसारक मंडळ डांगसौदाणे ता. बागलाण, जि. नाशिक कला वाणिज्य महाविद्यालय, रावळगांव ता. मालेगाव, जि. नाशिक – ४२३२०४ या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२०–२०२१ पासून खाली नमूद विषयांना/ अभ्यासक्रमांच्या स्थायी संलग्नीकरणासाठी आलेल्या अर्जावरील तज्ज्ञ समितीच्या अहवालाचा विचार करणे.**

अ.क्रं.	अभ्यासक्रमाचे नाव	तुकडी	विद्यार्थी संख्या
१	**मानवविज्ञान शाखा –** बी.ए.– इंग्रजी, भूगोल, हिंदी, इतिहास, मराठी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र	तुकडी क्र. ०२	१२०
२	**वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा –** बी.कॉम.– इंग्रजी, बिजनेस ॲडमिनिस्ट्रेशन, बॅकिंग ॲड फाईनान्स, अकाउंटन्सी, अर्थशास्त्र, इंडियन ॲण्ड ग्लोबल इकॉनॉमिक्स डेव्हलपमेंट, बिजनेस रेग्युलेरटी फ्रेमवर्क, मराठी(वाणिज्य), बिजनेस कम्युनिकेशन, कन्ज्यूमर प्रोटेक्शन ॲड बिजनेस इथिक्स, बिजनेस मॅनेजमेंट, ऑडिटिंग ॲड टॅक्सेशन, मॅथेमॅटिक्स ॲड स्टॅटिस्टिक्स, एलिमेंटस ऑफ कंपनी लॉ	तुकडी क्र. ०१	१२०

(संलग्नता कक्ष)

(टीप :

१. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०६ च्या अधिन राहून मा. अधिष्ठाता मंडळाने वरील अर्जाच्या तपासणीसाठी प्रा. डॉ. जोशी सुनिल दत्तात्रय यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

२. सदर समितीने महाविद्यालयास दिनांक १२/१०/२०२१ रोजी प्रत्यक्ष भेट देवून आपला अहवाल दिनांक १८/१०/२०२१ रोजी सादर केलेला आहे.

३. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११६ च्या अधिन राहून मा. अधिष्ठाता मंडळाने दि. ०९/१२/२०२१ रोजीच्या झालेल्या सभेत सदर अहवालाची छाननी करून खालीलप्रमाणे शिफारस केलेली आहे.

मा. अधिष्ठाता मंडळाने ठराव क्र. ४०६/०९१२२०२१ नुसार केलेली शिफारस

असा ठराव करण्यात येतो की, श्री स्वामी समर्थ विद्याप्रसारक मंडळ डांगसौदाणे ता. बागलाण, जि. नाशिक कला वाणिज्य महाविद्यालय, रावळगांव ता. मालेगाव, जि. नाशिक – ४२३२०४ या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२०–२०२१ पासून खालील विवरणात नमूद केलेल्या अभ्यासक्रमास स्थायी संलग्नीकरण देण्यात येत आहे अशी मा. विद्यापरिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

अ.क्रं.	अभ्यासक्रमाचे नाव	तुकडी	विद्यार्थी संख्या
१	**मानवविज्ञान शाखा –** बी.ए.– इंग्रजी, भूगोल, हिंदी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र	तुकडी क्र. ०२	१२०

ठरावाचा मसुदा

वि.प.अ. ११ पीए/११/२०२२ दि. १० जानेवारी, २०२२

असा ठराव करण्यात येतो की, श्री स्वामी समर्थ विद्याप्रसारक मंडळ डांगसौदाणे ता. बागलाण, जि. नाशिक कला वाणिज्य महाविद्यालय, रावळगांव ता. मालेगाव, जि. नाशिक – ४२३२०४ या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२०–२०२१ पासून खालील विवरणात नमूद केलेल्या विषयांना/अभ्यासक्रमांना स्थायी संलग्नीकरण देण्यास परवानगी देण्यात येत आहे/नाही.

अ.क्रं.	अभ्यासक्रमाचे नाव	तुकडी	विद्यार्थी संख्या
१	**मानवविज्ञान शाखा** – बी.ए.– इंग्रजी, भूगोल, हिंदी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र	तुकडी क्र. ०२	१२०

अ १२ पीए/१२/२०२२ शैक्षणिक वर्ष २०२२–२०२३ पासून मुळा एज्युकेशन सोसायटीचे श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय नेवासा, ता. नेवासा, जि. अहमदनगर – ४१४६०३ (युनिपुणे आयडी.: CAAA016130) या महाविद्यालयातील मानवविज्ञान विद्याशाखा – बी.ए. या अभ्यासक्रमाची कायम विना अनुदानित तुकडी शैक्षणिक वर्ष २०२२–२३ पासून टप्प्याटप्प्याने बंद (Progressive Closure) करण्यासाठी आलेल्या अर्जावरील/प्रस्तावावर चौकशी समितीच्या अहवालाचा विचार करणे.

(संलग्नता कक्ष)

(टीप : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२१ च्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२२–२०२३ पासून मुळा एज्युकेशन सोसायटीचे श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय नेवासा, ता. नेवासा, जि. अहमदनगर – ४१४६०३ (युनिपुणे आयडी.: CAAA016130) या महाविद्यालयातील **मानवविज्ञान विद्याशाखा** – बी.ए. या अभ्यासक्रमाची कायम विना अनुदानित तुकडी(विद्यार्थी प्रवेश क्षमता – १२०) बंद करण्यासाठीचा प्रस्ताव विहीत पध्दतीने प्राप्त झालेला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२१ (३) मध्ये संलग्न महाविद्यालये किंवा मान्यताप्रापत परिसंस्था बंद करण्यासाठी परवानगी देण्यात यावी किंवा कसे याचे निर्धारण व निर्णय करण्यासाठी विद्यापरिषदेला योग्य वाटेल अशी चौकशी करण्याची व्यवस्था करेल अशी तरतूद आहे.

मुळा एज्युकेशन सोसायटीचे श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय नेवासा, ता. नेवासा, जि. अहमदनगर – ४१४६०३ (युनिपुणे आयडी.: CAAA016130) या महाविद्यालयातील **मानवविज्ञान विद्याशाखा** – बी.ए. या अभ्यासक्रमाची कायम विना अनुदानित तुकडी(विद्यार्थी प्रवेश क्षमता – १२०) टप्प्या–टप्प्याने बंद (Progressive Closure) करण्यासाठी 'ना हरकत प्रमाणपत्र' द्यावे किंवा कसे याबाबत पाहणी करण्यासाठी प्रा. डॉ. शेलार सुधाकर किसन यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आलेली होती. सदर समितीचा अहवाल दिनांक ०१ डिसेंबर, २०२१ रोजी या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

मा. अधिष्ठाता मंडळाच्या दि. ०९/१२/२०२१ रोजी झालेल्या सभेत सदर अहवालाची छाननी करून ठराव क्र. ४३३/०९१२२०२१ नुसार खालीलप्रमाणे शिफारस केलेली आहे.

असा ठराव करण्यात येतो की, शैक्षणिक वर्ष २०२२–२०२३ पासून मुळा एज्युकेशन सोसायटीचे श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय नेवासा, ता. नेवासा, जि. अहमदनगर – ४१४६०३ (युनिपुणे आयडी.: CAAA016130) या

महाविद्यालयातील खालील विवरणात नमूद करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाची कायम विना अनुदानित तुकडी टप्प्या–टप्प्याने बंद करण्यास (Progressive Closure) 'ना–हरकत प्रमाणपत्र' देण्यास मा. विद्यापरिषदेस शिफारस करण्यात येत आहे.

अ.क्र.	बंद करावयाचा प्रकार	अभ्यासक्रम	विद्यार्थी प्रवेश क्षमता
